# ट्रायल

**( दोन अंकी नाटक )**

**चं. प्र. देशपांडे**



# ट्रायल

**मूळ कादंबरी : फ्रँझ काफ्का**
**मराठी स्वैर नाट्यरूपांतर : चं. प्र. देशपांडे.**

-----------------------

**अंक पहिला**

रोहिणी, स्वाती, अश्विन, कार्तिक -- ही तरुण मुलीमुले. चंद्रभान हा निवेदक. शिवाय काही इतर स्त्रीपुरुष वेळोवेळी. नाटकातील पात्रे व परिचय ओघात येईलच. या नाटकात नेपथ्य व प्रकाशयोजना यांची जादूच लागेल. आपल्या जगण्यात अंतर्गत जग आणि बहिर्गत जग अशी विभागणी असते. तिचे सूचन व्हावे अशी वैताग आयडिया हवी. अनेक दृश्ये असल्यामुळे, नेपथ्य सोपे असणेही आवश्यक आहे. शिवाय, अनेक प्रयोग व्हावेत अशी ही कलाकृती असल्याने, अर्थवाहित्व आणि सोपेपणा यांची मोट लक्षातच ठेवावी. माणसाच्या एकूण जगण्याबाबतची काफ्काची अगाध समज पाहून त्याला सलाम करण्यासाठी सदर लेखक हा रूपांतर-प्रयत्न करत आहे. ही '' मला उमजलेली ' ट्रायल ' '' आहे की काय हा मुद्दा हवेत सोडून देऊ. आजच्या, काहीही न कळता, वेडेपणाने धावत सुटण्याच्या काळात, थांबून पाहावी अशी ही कलाकृती.
नाटक सुरू होते तेव्हा रोहिणी आणि स्वाती येतात.

रोहिणी : हाय स्वाती !

स्वाती : हाय !

रोहिणी : काय, पत्ता काय ?

स्वाती : हाच प्रश्न मीही तुला विचारू शकते !

रोहिणी : ओके ! बरं, अनुभव सांग ! किती झाले असतील ?

स्वाती : नो गणती ! खूप ! मनसोक्त !

रोहिणी : पण, तू निवड कशी करतेस ते सांग ! माझं म्हणशील, तर मला माहीतच असते माझी डिमांड !

स्वाती : म्हणजे ?

रोहिणी : आता मला स्वत:ला प्रश्न पडतात, म्हणजे जगण्याबद्दलचे गं, आपल्या इच्छा वाढत का जातात, आपल्याला व्हरायटी का आवडते, यात हजारदा फ्रस्ट्रेशन का येतं, कधीकधी तर ... जाऊं दे ! तर असे प्रश्न ! तर मला सोबतीसुद्धा तसेच आवडतात ! उथळ, फुटकळ अशा पुरुषांबद्दल मला आकर्षणच वाटत नाही !

स्वाती : माझं उलट आहे ! मला हीरोटाईप, पझेसिव्ह, टपोरी, मरायला, मारायला तयार असणारे पुरुष आवडतात ! त्यातही, तो जर माझ्यासाठी मरायला तयार असेल तर जास्तच बेस्ट ! बरं, ते ठीक, पण, तू कसं ओळखतेस की यही है राईट चॉईस बेबी ! ?

रोहिणी : चेहरा, वागणं -- हे सगळं ! सॉर्ट ऑफ अंतर्मुख गं जरा ! बरोब्बर घडतंच ! आकर्षण !

स्वाती : माफ कर, असं जर असेल तुझं, तर तुझी अनुभवसंख्या नेहमीच कमीच राहील ! मी नेहमीच जास्त

अनुभवी राहीन !

रोहिणी : आणि मी प्रश्न विचारीन की जास्त अनुभवी असण्याचं काय विशेष महत्त्व आहे ?

स्वाती : समज शून्य ! पण भरघोस जगा नं !

रोहिणी : नुसतीच संख्या महत्त्वाची नसते हे एक ! आणि तूच काही फायनल नाहीस !

स्वाती : ओके ! आय डोंट केअर !

रोहिणी : हे तुझं तू म्हण, माझ्यावर अ‍ॅटॅक केल्यासारखं कशाला ?

स्वाती : मला वाटलं, संख्या कमी आणि अंतर्मुख म्हणजे तू जरा श्रेष्ठबिष्ठ वाटतंय की काय तुला !

रोहिणी : नॉट अ‍ॅट ऑल !

स्वाती : मग ठीक आहे. ( इथे निवेदक चंद्रभान, सुमारे साठचा, प्रवेश करतो. )

चंद्रभान : ओके, ओके मुलींनो ! तुमचे स्वभाव वेगवेगळे आहेत ! असतातच ! ते ठीक ! त्यामुळं सुखदु:खांत, वैतागात काही फरक पडतात का हे बघायला पाहिजे !

स्वाती : आय ऍम लीस्ट बॉदर्ड !

चंद्रभान : बरं, हे नाटक फ्रँझ काफ्काच्या ‘ ट्रायल ‘ या कादंबरीवर आधारित आहे. या सदर स्वैर रूपांतरकाराला ती एक अत्यंत महत्त्वाची वाटली कादंबरी. म्हणून तिचं हे नाट्यरूपांतर.

स्वाती : सो व्हॉट ! नोबडी केअर्स !

रोहिणी : हं, हं ! के. जयेशची गोष्ट ! मला त्याची थोडी कल्पना आहे ! माझ्या समोर तो असता तर मला आवडला असता -- अनुभव !

स्वाती : न जाणो, मलाही ! जरा आकर्षक असतातच असे लोक ! नॉट बॅड फॉर अ चेंज ! अशा लोकांना आकर्षून घेण्यात एक वेगळं थ्रिल असतं, एवढं नक्कीच मला माहीत आहे !

चंद्रभान : नुसतीच उत्सुकता बाळगत बसण्यापेक्षा तुम्ही अनुभवच घेता हे फारच बेस्ट ! असो !

आवाज १ : हे जगणं ! आपण क्षणोक्षणी तयार असावं -- कशालाही -- अशी निर्दय अपेक्षा करणारं !

आवाज २ : स्वत:ला तयार समजावं असा एखादा क्षण येऊ शकतो ?

आवाज ३ : हाडांची कवटी सगळा मार्ग अडवते ! आतनं बोंबलत आपटत बसा !

आवाज ४ : याची जी वेदना असते ना, त्यामुळंच कळतं माणसाला की तो जिवंत आहे !

आवाज ५ : आपल्यामध्ये असं काहीतरी आहे, जे नाशवंत नाहीय, अशी श्रद्धा मात्र पाहिजेच ! नाही तर माणूस जगूच शकणार नाही !

चंद्रभान : ( पुढे येऊन -- ) एक दरवाजा. त्या दरवाज्यासमोर उभा असतो तिथला द्वारपाल. आणि त्या द्वारपालासमोर उभी असते के. जयेश ही व्यक्ती. के. जयेश. न्यायाच्या दरबारात प्रवेश मिळण्याची वाट पाहात. तो द्वारपाल त्याला म्हणतो, ‘‘ नाही रे बाबा, एवढ्यात नाही प्रवेश देता येणार ! ‘‘ त्यावर तो विचारतो, ‘‘ पण, नंतर तरी मिळेल ना प्रवेश ? ‘‘ द्वारपाल म्हणतो, ‘‘ शक्य आहे, पण, आत्ता नाही ! ‘‘ ते प्रवेशद्वार तर नेहमीप्रमाणे उघडंच असतं. ते पाहून के धाडसानं आत डोकावतो. द्वारपाल म्हणतो, ‘‘ माझ्या परवानगीशिवाय आत जाता यावं असा मोह होणं ठीक आहे, पण, बघ जरा माझ्याकडे ! माझी ताकद बघ ! आणि मी इथला सगळ्यांत कमी दर्जाचा द्वारपाल आहे, हे लक्षात घे. या हॉलमधून पुढे गेल्यावर तिथे आणखी एक दरवाजा आहे. तोही ओलांडावाच लागतो. तसाच त्याच्या पुढे आणखी एक दरवाजा. आणि त्याच्या पुढे आणखी एक ! आणि पुढच्या

पुढच्या प्रत्येक द्वारपालाचं म्हणशील तर ताकदीमध्ये ते एकसे बढकर एक असे आहेत ! ''  आता त्या केलाच काय कुणालाही असं वाटतंच की न्याय हा प्रत्येकाला उपलब्ध असलाच पाहिजे. पण, तरीही, एकूण विचार करून, वाट पाहावी, असंच तो ठरवतो... आणि पुढं कित्येक वर्षं तो वाट पाहात राहतो... कालांतरानं त्याला बसायला एक स्टूल दिलं जातं... सटरफटर किरकोळ गप्पा मारत तो वर्षानुवर्षं बसून राहतो, पण, त्याला आत प्रवेश मिळतच नाही. शेवटी तो म्हातारा होतो आणि त्याचे डोळे अंधुक होतात... त्याला हेही कळेनासं होतं की त्याचे डोळे त्याला दगा देतायत की जगच अंधारत चाललंय... आणि विशेष म्हणजे, प्रतीक्षेच्या या इतक्या वर्षांत, दुसऱ्या कुठल्याही माणसाला त्या न्यायाच्या दरबारात प्रवेश मिळाल्याचं त्याला दिसत नाही. तो त्या द्वारपालाला याबद्दल विचारायचं ठरवतो. विकलांग झालेला असल्यामुळं त्याला उठणंही अशक्य होतं. द्वारपालालाच तो जवळ बोलावतो आणि शक्ती एकवटून, मलूलपणे विचारतोच त्याला त्याबद्दल. हा माणूस आता संपत आलेला आहे हे लक्षात घेऊन द्वारपाल म्हणतो, '' अरे, दुसरं कुणी इथं येणं शक्यच नव्हतं... हा दरवाजा फक्त तुझ्यासाठीच होता... आता मात्र मी हा बंद करतो आहे... ''
( दरवाजा धाडकन आपटून बंद झाल्याचा आवाज... आता के अनेक बोळकांड्यांतून जातो आहे... या वेळी श्रेयनामावली सांगितली जाते... )

के : लीना ? आणि काकू ? इथं तुम्ही भेटाल असं मुळीच वाटलं नव्हतं !... ओह्... मिस बाबर !

कोरस : आरोपी आहेस तू, आरोपी ! खरं तर तुला अटकच झालेली आहे. यातून पुढे फक्त खटला, शिक्षा आणि त्या शिक्षेची अंमलबजावणी ! आरोपीच आहेस तू ! वस्तुत: अटकेतच आहेस तू ! ( अनेक आवाजांत याचे प्रतिध्वनी. )

के : निश्चितच काहीतरी चूक झालेली आहे. कुणीतरी या जयेश केबद्दल खोटंनाटं काहीतरी पिकवत असणार आहे. शंकाच नाही. कारण कायद्याच्या दृष्टीनं चुकीचं ठरावं असं काही मी केलेलंच नाही. हां, आता क्लेरिकल चूक होऊ शकते एखादी -- एखादा पूर्णविराम मागंपुढं होणं किंवा एखादं दशांशचिन्ह चुकीच्या ठिकाणी पडणं. होऊ शकतं. अहो, अगदी जिवावर उठणाऱ्या म्हणाव्यात अशाही चुका घडतात. मी बँकेत काम करतो, माहिती आहे मला. नुसती एखादी चुकीची फायलिंग सिस्टिमही कशी दगा देऊ शकते, अनुभव आहे मला. मी काही ऐरागैरा नाही. अत्यंत गुंतागुंतीच्या, अवघड अशा अंदाजांच्या बाबतीत मतांची देवाणघेवाण करणारे, अत्युच्च कुवतीचे जे लोक असतात त्यांच्यापैकी मी एक आहे. विश्वास संपादन केलेला असल्याशिवाय मी माझ्या जागेवर राहूच शकलो नसतो. पण, तरीही, अगदी क्वचित का असेना, चुका होतात, होऊ शकतात. आणि त्यात तसा कुणाचा दोष असा नसतो. होऊन जातं. होतं काय, बहुधा, दुपारच्या कडक उन्हामुळं आलेल्या गुंगीत एखादा क्लार्क एखादा पेपर कुठंतरी भलतीकडंच लावून टाकतो... इतकं सहज घडतं ते !.. मी बँकेतला एक ऑफिसर आहे. मी जिवंत आहे. शिवाय आमचा असिस्टंट मॅनेजर माझा दुस्वासही करतो. आमच्या एका महत्त्वाच्या ग्राहकाबरोबर त्यानं मला पाहिलं तेव्हापासून. तो ग्राहक म्हणजे एक प्रख्यात वकील आहे. मी त्या वकिलाच्या हातात हात घालून जाताना त्यानं पाहिलं आणि तो इतका अचंबित झालेला दिसला की काही विचारायलाच नको ! त्या वकिलाची ख्यातीच तशी होती ! तर आमचा असिस्टंट मॅनेजर ! मला म्हणाला, बसा ! त्याला माझ्याशी बोलणं भागच पडलं ! आणि मलाही आता हे मान्यच करावं लागेल की तेव्हापासून मी त्याला प्रियच वाटायला लागलो ! असे क्षण थोडेच असतात म्हणा ! पण मग अशा वेळी तो, माझं एकूण ठीक चाललंय ना आणि माझं भविष्य अधिक चांगलं कसं घडू शकेल अशा विषयांवर बोलतो ! आणि हेही तो स्वत: कामाच्या ओझ्याखाली

पार चेंगरलेला असताना ! पण नंतर बँकेतल्याच एका क्लार्कनं याचं इंगित मला सांगितलं ! त्याची माझ्याबद्दल ही जी तळमळ दिसते ती त्याची एक धूर्त चाल असते ! असे काही क्षण खर्च करून माझ्यासारख्या महत्त्वाच्या असिस्टंट्सना खुश करायचं आणि वर्षानुवर्षं ते आपल्याबरोबर कसे राहतील हे बघायचं ! आता हे पटण्यासारखं असलं तरी त्या वेळी मला जरा वाहून गेल्यासारखं झालंच -- ( इथे आवाजी प्रश्न -- ‘‘ वाहून गेल्यासारखं ? ‘‘ ) आणि प्रतिकारहीन झाल्यासारखं वाटलं ! ( आवाज -- ‘‘ प्रतिकारहीन ? ‘‘ ) आता म्हटलं तर हा माझा एक दुर्गुण किंवा एक कमकुवतपणा आहे हे माझ्या लक्षात येतं, पण, हा काही गुन्हा नाही ठरू शकत !... पण काहीतरी चूकच घडली असणार... ( हे सगळं अतिशय वेगात -- जणू एका दमात. काही क्षणांनी के झोपण्यासाठी खाली पडतो. अश्विन आणि कार्तिक येतात. )

अश्विन : मला तू एक सांग, तुला काय हवंय काय आयुष्यात, कसं हवंय सगळं ?

कार्तिक : अश्विन, असं नाही, प्रश्न तुझा आहे, उत्तर तूच सांगायचंस आधी !

अश्विन : मला तसं साधं जगायचं आहे -- एक साधीशी नोकरी, तशीच नोकरी करणारी बायको, दोन मुलं -- बास ! फार चैन नको, फार ताणतणावही नकोत आणि अती श्रमही नकोत -- आपलं काम बरं, आपण बरं ! -- हे, असं हवंय मला --

कार्तिक : हे मिळेल पण त्याचबरोबर, समाजात फारसा मान नाही, इकडेतिकडे थोडंफार अपमानितच होत राहणं, प्रभाव नसल्यानं अनेक अडचणी येणं, मुलांना शाळाकॉलेजांत ॲडमिशन्स घेता न येणं, हेही सगळं येणार ! आणि एकूणच केस पिकल्यावर मळक्या कपड्यांत, चालत फिरणं -- हेही स्वीकारावंच लागणार !

अश्विन : हो, ही शक्यता आहेच, पण खूप महत्त्वाकांक्षेनं जगणं शहाणपणाचं होईल का, असा मला प्रश्न पडतो. त्याचं मला होकारार्थी उत्तर येतच नाही !

कार्तिक : आता माझं ऐक -- मला चौफेर यश हवंय -- ॲट व्हॉटेव्हर कॉस्ट ! लाईफ हीच कॉस्ट समजलं तरी चालेल ! मानमरातब, प्रसिद्धी, पैसा, चैन ! नो कौटुंबिक प्रॉब्लेम ! भरभराट ! उच्च राहणी ! यासाठी माझं रक्त, मांस, हाडं --सगळं रेडी फॉर एनिथिंग ! म्हातारपणी, कुठं बंगल्यातल्या फुलझाडांना पाणी घाल, कुठं आरामखुर्चीत बसून टीव्हीवर क्रिकेट बघ किंवा आपल्या बंगल्यावर एखाद्या स्वामींची पूर्ण सोय करून त्यांच्याबद्दलच्या आदरात बुडून राहा -- असं पाहिजे मला !

अश्विन : आणि चैन ?

कार्तिक : उच्च राहणीमध्ये आलंच ते ! मुख्यत: तरुणपणात रे ! नो बंधन ! मजा आणि उपभोग ! आपण बुद्धिमान असलो, कर्तबगार असलो म्हणजे आपल्या वागण्याकडे कुणी लक्ष देत नाही ! चालतं ! या सगळ्यासाठी पडेल ते कष्ट, चांगुलपणा, हलकटपणा -- काहीही चालेल ! डोंट थिंक !
( चंद्रभान प्रवेश करतो. )

चंद्रभान : मित्रांनो, मी चंद्रभान. मी बघतोय, ऐकतोय. जगण्याबाबत तुमचे विचारच इतके भिन्न असल्यावर आणि तुमच्या अपेक्षाच इतक्या वरखाली असल्यावर समाजात समता कशी येणार, हेच मला कळेनासं झालंय ! हुकुमशाहीच पाहिजे ! आवडीनिवडी, अपेक्षा, तयारी आणि स्वभाव -- या असल्या गोष्टींवर माणसांचं जगणं अवलंबून ठेवूनच चालणार नाही ! नाही तरी सगळेजण कोणता ना कोणता त्रास भोगायला तयार आहेतच ! मग हुकुमशाहीचा त्रास निदान समता तरी आणू शकेल !

अश्विन/कार्तिक : आम्हाला नाही पटत ! ( जातात. आता -- )

**शहर**

( अश्विन, कार्तिक, रोहिणी, स्वाती -- हे कोरसही आहेत. कोरस घड्याळाची टिकटिक उच्चारत राहतो. नंतर ‘ जयेश के. ‘ असे लयीत म्हणत राहतो. )

चंद्रभान : सकाळचे आठ वाजले होते. शहर जागं झालं होतं. ( शहरी गोंगाट. )

अश्विन : ( प्रवेशून -- ) जयेश के.बद्दल निश्चितच कुणीतरी कान फुंकत होतं --

कार्तिक : ( प्रवेशून -- ) कारण, कोणतंच दुष्कृत्य केलेलं नसताना --

रोहिणी : ( प्रवेशून -- ) त्याला एका सुप्रभाती अटक झाली !

स्वाती : ( प्रवेशून -- ) त्याची काकू, जिच्या इमारतीत तो राहात होता, ती त्याला रोज सकाळी आठ वाजता नाश्ता आणून द्यायची --

चंद्रभान : त्या दिवशी, त्या वेळी ती आलीच नाही !

जयेश के. : ( प्रवेशून -- ) यापूर्वी असं कधी झालं नव्हतं --

अश्विन : केनं आणखी थोडी वाट पाहिली --

कार्तिक : समोरच्या बाजूला राहणारे लोक त्याच्याकडे विचित्र उत्सुकतेनं पाहात होते --

रोहिणी : शेवटी त्याचा धीर खचला, पोटातले कावळे स्वस्थ बसू देईनात, त्यामुळं मग त्यानं बेल दाबली -- ( ‘ टिंग टाँग ‘ असा बेलचा आवाज कोरस तोंडाने टिपेला नेत जातो. थांबतो. हॅट घातलेले दोन रक्षक प्रवेश करतात. )

रक्षक १ : तू बेल मारलीस ?

के : माझ्या काकूची स्वैपाकीण -- तिच्यासाठी --

रक्षक १ : नाव काय तुझं ?

के : जयेश के.

रक्षक २ : हाच तो !

रक्षक १ : हे सहज कळण्यासारखं आहे --

रक्षक २ : भीतीनं पांढराफटक पडलाय.

रक्षक १ : काय रे के, तुला भीती वाटते ?

के : का ? कशाची ? मी काय केलंय ? --

रक्षक १ : त्याबद्दल बोलायचा आम्हाला कुठाय अधिकार ? ( क्षणभराने -- ) तुझ्याविरुद्ध केस चालणार आहे... आणि काळाच्या ओघात तुला सगळी माहिती दिली जाईल.

के : तुम्ही कोण आहात ?

रक्षक २ : आम्ही तुझे मित्रवर्य पहारेकरी आहोत -- आम्ही तुला मिळालोय हे तुझं भाग्यच समज --

के : नावं काय तुमची ?

रक्षक १ : मी जरा किडकिडीत आहे आणि तो बांधेसूद.

रक्षक २ : मी टाईट काळा सूट घातलाय. बिनप्लेटींचा.

रक्षक १ : आणि मी प्लेटीवाला.

रक्षक २ : याला खिसे आहेत, बक्कल्स आणि बटणं आहेत आणि पट्टाही आहे --

के : पर्यटकांसारखे दिसताय --

रक्षक १ : मुख्य म्हणजे ते सगळं उपयुक्त आहे.

रक्षक २ : पण कोणते उपयोग ते आम्ही तुला सांगू नाही शकत --

| | |
|---|---|
| रक्षक १ : | किंवा आम्ही कोण आहोत वगैरे -- पण एकूणात तू भाग्यवान आहेस असा विश्वास तुला बाळगायला काहीच हरकत नाही -- |
| रक्षक २ : | खरं तर, तुझ्याशी इतकं मोकळेपणानं बोलून आम्ही एक प्रकारे आमच्या मर्यादांचं उल्लंघनच करतोय -- |
| रक्षक १ : | हे असं बोलताना मला या फारुखशिवाय कुणी ऐकलं नाही म्हणजे मिळवलं ! |
| रक्षक २ : | नाही तर, आम्हाला इकडे पाठवणारे आमचे अधिकारी खवळतीलच आमच्यावर. |
| रक्षक १ : | नि:संशय ! आम्ही तुला खरं तेच सांगतोय. ( शांतता. ) |
| रोहिणी : | कशाबद्दल बोलतायत ते के ? |
| स्वाती : | अशा कुठल्या अधिकाऱ्यांनी पाठवलं असेल त्यांना ? |
| अश्विन : | इथं कायद्याचा अंमल चालतो. |
| कार्तिक : | आणि सध्या कुठलंही युद्ध चालू नाहीय. |
| चंद्रभान : | आणीबाणीही नाहीय -- |
| के : | आणि माझे स्वत:चे असे काही मूलभूत हक्क आहेत. मला कशासाठी अटक झालीय ते मला कळलंच पाहिजे. ही मागणीच समजा माझी ! |
| रक्षक १ : | आम्ही ते तुला सांगू शकणार नाही. आम्ही फक्त नम्र सेवक आहोत. हुकुमाचे ताबेदार. ( जणू काही आठवल्याप्रमाणे -- ) हां -- खोल्यांची झडती घ्यायचीय -- ( झडतीचा अभिनय. कोरसमधल्या व्यक्ती कपाटे, टेबले होतात. ) |
| कोरस--पाचही : | तुम्ही अशी झडती नाही घेऊ शकत ... बाहेर व्हा इथून ... कुणी दिल्या तुम्हाला या आज्ञा ? काहीही नाहीय इथे ... काकू ऽ ! मी विचारणारच ... वॉरंट आहे तुमच्याकडे ? तुला अटक झालीय म्हणे ! काय चाललंय काय हे ? |
| रक्षक १ : | ( झडती घेताना -- ) अरे वा ! कोट दिसतोय, छानच आहे ! मी जरा घालूनच बघतो तो -- मस्त ! ... कसा दिसतोय मी ? ... एकदम सुंदर ! |
| रक्षक २ : | फारच फॅशनेबल ! अत्याधुनिक ! तर, सध्या आम्ही हा कोट घेऊन जाऊ ... आणि तुझे ... इतर... आतले कपडेही. |
| रक्षक १ : | तुझ्या केसचं जर ठीकठाक पार पडलं सगळं तर ते सगळे कपडे तुला परत मिळतील. या केसेस किती काळ चालतील हे मात्र सांगता येत नाही. आणि तिकडे डेपोत चोऱ्या पण खूप होतात ... |
| रक्षक २ : | काही काळ वाट पाहिल्यानंतर मात्र ते तुमचं सगळं सामान विकून टाकतात -- मग तुमची केस संपलेली असो की नसो. |
| रक्षक १ : | अर्थात त्याची भरपाई मिळते म्हणा. |
| रक्षक २ : | पण मिळणाऱ्या किंमती भयानक कमी असतात. |
| रक्षक १ : | लाचलुचपत आणि भ्रष्टाचार खूप आहे तिथं. |
| रक्षक २ : | त्यापेक्षा हे सगळं आमच्याकडेच राहिलेलं बरं -- सुरक्षित समज तू . अं ! ठीक आहे. |
| रोहिणी : | ( के.ला -- ) अस्वस्थ होऊ नकोस . |
| स्वाती : | काहीतरी फार वाईट घडेल असं समजून वागायची गरज नाही -- तसं काही घडेपर्यंत ... अं ? ... |
| अश्विन : | तसं वागणं योग्य नाहीच ठरणार इथं. |
| कार्तिक : | काही नाही, माझ्या तिसाव्या वाढदिवसानिमित्त माझ्या सहकाऱ्यांनी घडवलेला हा एक विनोद असणार आहे. एक मस्करी आपली. |

के. : आता मी जर यांच्याकडे पाहून हसलो तर तेही माझ्याबरोबर हसतील बहुतेक. ( के. हसतो आणि हस्तांदोलन करायला जातो. )

चंद्रभान : पण तो विनोदही नव्हता आणि मस्करीही नव्हती !

रक्षक १ : तुझी कागदपत्रं कुठं आहेत ?

रक्षक २ : खिसेबिसे तपास त्याचे.

के : काय हवंय तुम्हाला ? दूर व्हा. आधी मला माझं अटकवॉरंट दाखवा नाहीतर चालते व्हा इथून --

रक्षक १ : तसं नाही बाबा करता येणार आम्हाला.

रक्षक २ : आमची कामं आम्हाला करू दे -- उगीच आम्हाला चिडायला लावू नकोस --

रक्षक १ : आम्ही तुझे मित्र आणि रक्षक आहोत. त्यामुळं, तुझ्या सगळ्यात निकट आम्हीच असणार.

रक्षक २ : आम्ही हुकुमाचे विनम्र ताबेदार आहोत -- कायद्याच्या कागदपत्रांतून सुटका नाही --

रक्षक १ : आमचं काम दररोज दहा तास तुझ्यावर पहारा ठेवणं आणि आमचा पगार मिळवणं.

रक्षक २ : पण आम्हाला हे नक्की समजतं की आमचे अधिकारी --

रक्षक १ : ज्यांच्या हाताखाली आम्ही काम करतो --

रक्षक २ : तुला अटक निष्कारणच करणार नाहीत.

के : काय आहे कारण ?

रक्षक १ : त्याची माहिती करून घेणं हे आमच्या अधिकाऱ्यांचं काम आहे. पण मी एक मात्र सांगू शकतो की ते काही, सापडतोय का गुन्हा, सापडतोय का गुन्हा असं करत शिकाऱ्यासारखं लोकांत फिरत नाहीत. उलट आपोआपच ते अपराध्याकडे ओढले जातात. मग मात्र त्यांना आम्हा रक्षकांना पाठवावंच लागतं.

रक्षक २ : तसा कायदाच आहे.

के : खुळचटपणा आहे. असा काय कुठं कायदा असतो ?

रक्षक १ : ऐकलंस का फारुख ? याला कायद्याचं कवडीचं ज्ञान नाही पण स्वत:ला निरपराध म्हणतोय !

रक्षक २ : याच्यासारख्या माणसाला शहाणपणाचं काही सांगण्यातच अर्थ नाही -- ( इथे दोन्ही रक्षक के.ला दणके देतात. त्याच वेळी त्याची काकू प्रवेश करू लागते, पण थांबते. )

के : काकू, ये ना -- ती आत का नाही आली ?

रक्षक १ : ती कशासाठी हवीय तुला ?

के : म्हणजे काय ? माझा नाश्ता हवाय मला --

रक्षक २ : ऐकलंस ना ? पुन्हा तेच सुरू करतोय तो ! ( के.ला पुन्हा दणके बसतात. काकू आत येतात. नाश्ता ठेवल्याचा मूकाभिनय -- के.च्या पाठीमागे. के. वेदनेने वाकलेला आहे. त्या जातात. )

रक्षक १ : अरे, वा -- मध आणि टोस्ट !

रक्षक २ : आणि उकडलेली अंडी !

चंद्रभान व कोरस : जा बाहेर के, ते तुला थांबवायची हिंमत करणार नाहीत. आणि केलीच समज त्यांनी तशी हिंमत तर मग प्रकरण एकदम टोकावर येईल. त्या वेळी मात्र, तुला अडकवून ठेवायचं कारण त्यांना द्यावंच लागेल.

के : पण, इतकं होऊनही, समजा त्यांनी धरूनच ठेवलं मला तर, अजून तरी एक प्रकारे वरचढ असलेली माझी पोझिशन जाईल !

चंद्रभान व इतर : मला तसं हेल्दी -- तंदुरुस्त तर वाटतंच आहे, शिवाय, आत्मविश्वासही वाटतोय -- आता हे एक आहे की बँकेतलं माझं सकाळचं काम राहणार आहे -- पण त्याचं एवढं काही कुणी स्तोम माजवणार नाही --

के : एकूणात माझी तिथली उच्च पोझिशन लक्षात घेता --

चंद्रभान : आणि समज तुझ्या गैरहजेरीचं तू खरं कारण सांगितलंस तर ?

इतर चौघे : विश्वास कोण ठेवेल त्याच्यावर ?

के. : नकोच ते. त्यापेक्षा सगळ्यात उत्तम मार्ग म्हणजे, तुका म्हणे उगी राहावे, जे जे होईल ते ते पाहावे ! काहीही करू नये आणि काय कसं आकाराला येत जातंय ते पाहावं !

चंद्रभान व इतर : धूर्तपणा रे धूर्तपणा
धूर्तपणा रे धूर्तपणा ...
( असे म्हणत जातात. )

**इन्स्पेक्टर**

आवाज : ( जोरात -- ) जयेश के ऽऽ ! ( वळणावळणांतून इन्स्पेक्टरचा प्रवेश. )

के : चला, आला शेवट ! ( तो जाऊ लागतो -- )

रक्षक १ : छे छे, एवढ्यात नाही, असं नाही --

रक्षक २ : जरा नीट तयार हो --

रक्षक १ : भांग पाड --

के : ते बघतो माझं मी --

रक्षक २ : खरं तर यानं अंघोळ करायला हवी होती.

रक्षक १ : आता वेळ नाही पण --

रक्षक २ : काळा कोट आहे का ? तो घाल --

चंद्रभान : ( हाक मारतो -- ) जयेश, जयेश के, मि. के --

इन्स्पेक्टर : हं ऽ ! मि. के. तर उजाडता उजाडता झालेल्या आमच्या या भेटीनं तू चकितच झाला असशील !

के : निश्चितच, मी चकित झालोच आहे !

चंद्रभान : के.ला आता अगदी आनंदाचं भरतंच आलं होतं -- चला, शेवटी हा एक समंजस माणूस सापडला !

इतर : के.ला आता अगदी आनंदाचं भरतंच आलं होतं -- चला, शेवटी हा एक समंजस माणूस सापडला !

के : पण, तसं म्हटलं तर अगदी मी फारच चकित झालोय असंही नाहीय म्हणा --

इन्स्पेक्टर : काय, फारसं चकित नाही ?

के : बहुतेक तुमचा गैरसमज होतोय -- मला असं म्हणायचंय ... बसू का मी ?

इन्स्पेक्टर : तशी पद्धत नाही.

के : नाही, तसा मी चकित झालेलोच आहे म्हणा, पण होतं काय की या जगात तीस वर्षं -- बरं का -- तीस वर्षं असा एकाकीपणानं संघर्ष केल्यावर -- मी केलेलाच आहे ना तसा -- होतं काय -- या चकित होण्याच्या संवेदना बधीरच होतात -- आणि मग अशा आश्चर्यकारक गोष्टीही योग्य त्या गंभीरपणानं घेतल्या जात नाहीत -- विशेषत: आज सकाळी --

इन्स्पेक्टर : का बरं, आजची सकाळ का ?

के : हे बघा, मी काही असं म्हणत नाहीय की हा सगळा प्रकार म्हणजे एखादा विनोद किंवा एखादी मस्करी चालू आहे म्हणून -- तसं मला म्हणायचंच नाहीय -- उलट मग तर असं म्हणावं लागेल की

ही तर फारच किचकट गंमत आहे -- अं ? ... एवढं हे सगळं जमवून आणायचं म्हणजे माझ्या काकूचे सगळे भाडेकरू आणि शिवाय तुमची ही माणसं, हे सगळे यात सामील असावे लागतील -- होय की नाही ? -- त्यामुळं मला नाही वाटत की ही एक गंमत असेल --

इन्स्पेक्टर : गंमत नाहीच आहे !

के : पण त्याचबरोबर, ही अगदी एखादी फारच गंभीर बाब असेल असंही मला वाटत नाही, कारण माझ्यावर आरोप यावा असा एखादा किरकोळ गुन्हाही मी केल्याचं मला आठवत नाही -- पण तेही देऊ सोडून -- मुख्य प्रश्न हा आहे की, कोण ठेवतंय आरोप माझ्यावर ? कोण ? कसला ? कोणत्या अधिकारात ? तुम्ही खरोखर पोलीसच आहात का ? मग तुमचा युनिफॉर्म कुठाय ? हा तुमचा जो पोषाख आहे त्याला काही युनिफॉर्म म्हणता येणार नाही. यात तुम्ही एखाद्या आदिवासी नृत्यातल्यासारखे वाटता ! ( चंद्रभान आणि इतर यांच्यात हास्यलकेरी. )

इन्स्पेक्टर : शांत !

के : सज्जन हो, मला नुसतं एक सरळ, साधं स्पष्टीकरण हवंय, ते द्या, मग आपण जाऊ या --

इन्स्पेक्टर : तुझी ही सगळी धडपड एका प्रचंड भ्रमात चाललीय -- आम्ही तुला काहीच सांगू शकत नाही, हे लक्षात घे -- आणि त्याचं कारण म्हणजे आम्हालाच काही माहिती नाही -- तू काय केलंयस किंवा कोण तुला दोषी ठरवतंय, हे काहीच आम्हाला माहिती नाही -- आम्ही तुला फक्त एवढंच सांगू शकतो की तुला अटक झालेली आहे -- तो आमच्या कामाचा भागच आहे -- म्हणून तर आम्ही इथं आलो आहोत -- तरीही, मी तुला एक सल्ला देऊ शकतो --

के : हं, सांगा --

इन्स्पेक्टर : विचार जास्त कर आणि बोलणं कमी ठेव -- तू कसा निरपराध आहेस याच्यावर कुटत बसू नकोस -- काय होतं, ते कंटाळवाणं तर होतंच पण शिवाय त्याची छाप वाईट पडते -- तुझी म्हणजे खरं तर कृती जास्त महत्त्वाची असते -- तू काय करू शकतोस -- ते --

के : ( गोंधळलेल्या अवस्थेत येरझाऱ्या घालतो. मग -- ) मला माझ्या वकिलाला फोन करायचाय -- करू का ? नाऊ इट इज अ मस्ट !

इन्स्पेक्टर : हो, बेलाशक -- पण मला त्यात काही तथ्य वाटत नाही --

के : त्यात तथ्य वाटत नाही ? ! तुम्ही काय माणूस आहात की कोण आहात ? तुम्ही आणि तुमचे हे वरतोंडे ? ते अचानक इथं घुसतात, इथल्या सगळ्या वस्तू विस्कटतात, एखाद्या फालतू नाटकातल्या विदूषकासारखे वागतात, मला अटक करतात, कारण देत नाहीत ... आणि मी जेव्हा म्हणतो की मला माझ्या वकिलाला फोन करायचा आहे, त्याचा सल्ला घ्यायचा आहे ... तर तुम्ही ... काय अर्थ काय याचा ? -- तुम्ही म्हणताय की त्यात काही तथ्य नाही !? ( हे बोलणे चालू असताना त्याच्यावर फ्लॅश वगैरे पडतात. जणू रिपोर्टर्स वगैरे त्याचे फोटो काढतायत. )

इन्स्पेक्टर : ( क्षणभर शांततेनंतर -- ) ठीक आहे, कर फोन --

के : आता मला नाही करायचा फोन !

इन्स्पेक्टर : कर रे !

के : मी सांगितलंय, मला नाही करायचा -- ( चंद्रभान आणि इतर यांचे चेहरे इकडेतिकडे दिसतात. ) काय, मजा वाटतीय का, तमाशा चाललाय ! ? चला, निघा ! ( चेहरे जातात. ) बरं, सज्जन हो, जाऊं द्या, यात सगळ्यात चांगलं म्हणजे, हे सगळं आपण विसरून जाऊ या -- कोण चूक, कोण बरोबर, जाऊं दे ते सगळं -- एक तर नक्कीच की काहीतरी चूक घडलेली आहे -- तुम्ही चुकीच्या

माणसाकडे आला आहात. तर आपण नमस्कार करू एकमेकांना, शेक हँड करू आणि हा विषय संपवून टाकू !

चंद्रभान व इतर : तो इन्स्पेक्टरच्या अगदी जवळ जातो -- स्वत:चा हात पुढे करतो -- इन्स्पेक्टर फक्त डोळे उचलून पाहतो आणि ओठ दुमडतो -- केने पुढे केलेल्या त्याच्या हात या अवयवाकडे पाहतो -- के.ला अजूनही वाटतंय की एवढ्यावर हे संपणार आहे, पण ...

इन्स्पेक्टर : छे, छे, असं करताच येणार नाही -- इतकं सोपं नाहीय ते -- पण तू आशा सोडू नकोस -- आणि का सोडावीस तू आशा ? -- तुला अटक झालीय एवढंच, आहे काय त्यात -- तुला याची माहिती द्यायचं काम माझ्याकडे होतं, तर ते मी केलंय -- तुझी शेरेबाजी आणि मतंही ऐकलीयत -- काही का असेना, सध्या एवढं पुरेसं आहे -- आणि इथं आपण एकमेकांचा निरोप घेऊ शकतो -- तू तुझ्या कामावरही जाऊ शकतोस --

के : मला जर अटक झालीय तर मग मी बँकेत कसा जाणार ?

इन्स्पेक्टर : तुझ्या लक्षातच येत नाहीय -- अटक झालीय याचा अर्थ, तुझ्या रोजच्या दिनक्रमाला, तुझ्या कामांना अडथळा येणाराय असं कुठाय ?

के : म्हणजे अटक होणं हे काही फारसं वाईट नाहीय तर ?

इन्स्पेक्टर : कोण म्हणतं तसं आहे म्हणून ?

के : मग, आता मला सांगा, काही फरकच पडणार नाहीय तर मला सांगायची तरी काय गरज होती ?

इन्स्पेक्टर : ती माझी ड्युटी आहे !

के : गधडेपणाची ड्युटी !

इन्स्पेक्टर : असेल -- तू बँकेत जाच, अशी काही मी तुझ्यावर सक्ती करत नाहीय. पण, तुला जायचं असणार हे मी समजू शकतो. आणि हो, तुला होणारा उशीर फारसा कुणाच्या लक्षात येऊ नये म्हणून मी तुझे दोन सहकारी थांबवून ठेवलेत -- ते तुला घेऊन जातील --

चंद्रभान व इतर : गुडमॉर्निंग सर. गुडमॉर्निंग सर. गुडमॉर्निंग सर. ( रस्त्यावरचे आवाज. ट्रॅफिकचे आवाज. ते टॅक्सीत बसून गेल्याचा मूकाभिनय करतात. ते एकमेकांकडे न पाहता बोलतात. क्लार्क्स म्हणजे अश्विन आणि कार्तिकच आहेत. )

के : मघाशी मी तुम्हाला ओळखलंच नाही --

क्लार्क्स : ( एकमेकांत -- ) तो आपल्याला ओळखू शकला नाही, हे कसं काय ? आपण त्याचे निर्जीव, नगण्य सहकारी ! सदोदित मान ताठच राहणारा रवींद्र आणि वारंवार लचकणाऱ्या स्नायूमुळे चेहऱ्यावर मधूनमधून धक्कादायक स्मित दिसणारा केवल --

के : शेवटी मला कामावर जाता येतंय याचाच मला आनंद वाटतोय --

क्लार्क्स : आम्ही बराच वेळ वाट पाहात होतो --

के : (स्वत:शी -- ) च्यायला, त्या इन्स्पेक्टरनं मला चक्रावून टाकलं, नाहीतर मी ओळखलं असतं त्यांना !

अश्विन (क्लार्क-१): त्याला फारसं प्रसंगावधान नाही --

कार्तिक (क्लार्क-२): किंवा मग आपण इतके नीचस्तरीय कर्मचारी आहोत की त्यानं ओळखणं अशक्यच व्हावं !

के : यापुढं, माझी बुद्धी जरा ठिकाणावर ठेवायची मला काळजीच घ्यायला पाहिजे. विचित्र का दिसेना, खरं म्हणजे, या वेळी, मला त्यांच्याशी मित्रत्वानं बोलावंसं वाटायला हवं होतं, नव्हे, आवडायलाच हवं होतं.

दोन्ही क्लार्क्स : पण मग अचानक आपण दमून गेलो.

क्लार्क १ : माझ्या स्नायूच्या प्रॉब्लेममुळं मला त्याला दात विचकूनच सामोरं जावं लागतं --

क्लार्क २ : आणि दुर्दैवानं किंवा सुदैवानं हा कुचेष्टेचा विषय होत नाही ! माणुसकी, दुसरं काय !

**बँक**

( रहदारी थांबते. आता नटवर्ग एका बिझी बँकेचा कर्मचारीवर्ग होतो. यंत्रमानवांप्रमाणे लोक ये-जा करताहेत. एकमेकांना धक्का न लावता, लोक घड्याळाच्या बिनचूकपणाने पण जलद अशा हालचाली करत राहतात. )

टपाल क्लार्क : नमस्कार सर ! ( हे वेगवेगळ्या आवाजात अनेकदा रिपीट होते. )

के : नमस्कार --

आवाज : हॅलो, बॅग द्या इकडे --

या, या --

धन्यवाद --

या सर --

मी बघतो सर ते -- ( वगैरे. )

( के. सोयीस्कर जागा पाहून थांबतो, सामील होतो. जणू त्या अवाढव्य मशीनचा तो एक भाग बनतो. शांतता. )

अनेक आवाज : वाढदिवसाच्या शुभेच्छा मिस्टर के. ! ( शांतता. )

के : ( जरा अवघडून -- ) आभारी आहे. माझ्या या तिसाव्या वाढदिवसानिमित्त मी इतकंच सांगू इच्छितो की -- ( आवाज एकमेकांत बोलतात -- बँकेचे कामकाज चालू -- के.कडे दुर्लक्ष. ‘ ड्राफ्ट काऊंटर नंबर पाचवर ’, ‘ तुमच्या बिलाचा ग्रेस पिरियड आज संपतोय ’, ‘ तुम्ही साहेबांना भेटा ’, ‘ आज शक्यच नाही ’, इत्यादी वाक्ये. मग फोनची रिंग वाजते. )

एक क्लार्क : के सर, तुमचा फोन. ( क्लार्क्सचीच, ओळीत उभे राहून, टेलिफोन लाईन होते. दुसऱ्या टोकालाही एक बोलणारा. )

आवाज : हॅलो, जयेश के. का ? तुमच्या कामात व्यत्यय आणल्याबद्दल जरा माफ करा. तुमच्या केसचं कामकाज नॉर्मल पद्धतीनं चाललंय बरं का. पण तुम्हाला कमीत कमी डिस्टर्ब करावं असा विचार करून तुमच्या प्रश्नोत्तरांसाठी रविवारच योग्य होईल असा आम्ही विचार केलाय. आणि हे शक्य नसेल तर आपल्याला ती प्रश्नोत्तरं रात्रीही घेता येतील. पण त्या वेळी तुम्ही थकलेले असणार, ताजेतवाने नसणार. बघा. पण, तुम्हाला न चुकता हजर व्हावंच लागेल हे मात्र लक्षात घ्या.

के : आणि समजा मी नाहीच आलो तर ?

आवाज : तू कुठं सापडशील हे आम्हाला माहीतच असणार रे ! तर, तू, १४, जयभवानी रोड, इथं हजर राह्यचंय हे लक्षात ठेव. हॅलो, हॅलो, डिस्टर्बन्स कसला येतोय ? ऐकू येतंय का ? के, तुला १४, जयभवानी रोड, इथं हजर राह्यचंय -- ( थांबतो. )

के : काय नाव म्हणालात ? मधेच फोन कट झाला --

क्लार्क : पुन्हा लावू का सर तो फोन ?

के : बघू -- ( ऑफीसचे काम चालू. घड्याळात टोले पडू लागतात. काम थांबते. लोक जातात. )

सगळे : अच्छा, निघतो सर ! ( दृश्य संपते. )

चंद्रभान : त्या आल्हाददायक मोसमात खरं तर के.ला एक सवयच जडली होती की संध्याकाळी दारूबिरू पिऊन, मग मस्त जेवूनखाऊन छानपैकी घरी परतायचं आणि आठवड्यातून एकदा एकताला

भेटायचं. एकताची आणि त्याची अलीकडेच ओळख झालेली होती. ती एक बऱ्यापैकी गायिका होती आणि अधूनमधून ती काही जाहीर कार्यक्रमही सादर करायची. ( '' आणि आता पुढचं गाणं घेऊन येतीय -- एक आणि एकमेव -- एकता ! '' टाळ्या. एकता एक उत्तेजक गाणे सुरू करते. मादकता. मग गाणे एकदम थांबते. ) पण आज मात्र त्यानं थेट घरीच परतायचं ठरवलं -- ( काही माणसांच्या आवाजात, कण्हल्याप्रमाणे -- '' घरीच जावं झालं -- '' आता झटकन दृश्य बदलते. समोर त्याची काकू. त्याची अपेक्षा आणि वस्तुस्थिती यांतली तफावत लक्षात यावी. आता काकूची इमारत -- )

काकू : आलास का रे जयेश --

के : अजून जागीच आहेस तू काकू ?

काकू : कामं खूप असतात बाबा --

के : खरं तर मी इतका उशिरा आलोय -- आणि सकाळी तर तुला माझ्यामुळं आणखीनच जास्तीचं काम पडलं ! खरंच, त्याबद्दल सॉरी हं काकू ! पुन्हा असं घडणार नाही !

काकू : नाही, मला तर काहीच त्रास झाला नाही !

के : ( स्वत:शी -- ) मी जे बोललो त्याचं तिला आश्चर्यच वाटलेलं दिसतंय. की माझं दिलगिरीदर्शक बोलणंच तिला अयोग्य वाटत असेल ? पण म्हणूनच, खरं तर, मी तसं बोलायलाच हवं होतं.

काकू : नाही, पुन्हा नाहीच घडायचं असं --

के : काकू, तुला खरंच असं वाटतं ?

काकू : खरंच रे बाबा ! आणि तू ते मुळीच मनाला नको लावून घेऊस. थांब जरा -- ( ती सुईदोरा आणते आणि त्याच्या शर्टाच्या बटणाला टाके घालत घालत तिची टकळी चालू ठेवते -- ) जगात फार विचित्र गोष्टी घडतात बाबा ! आणि मला एक कबूलच करावं लागेल, कारण तूही माझ्याशी किती मोकळेपणानं वागतोस ! तर मी बाबा दाराआडून जरा ऐकतच उभी होते, तर त्या दोन माणसांनी ते पाहिलं आणि मला म्हणाले की, फार वाईट असं काही नाही. तू अटकेत आहेस हे खरं असलं तरी ते काही एखाद्या फौजदारी गुन्ह्यासाठी नव्हे. तू काही चोरबीर नाहीस. उलट तुझ्या बाबतीत हे काहीतरी विशेष घडलंय, म्हणाले. तुझ्या आनंदाशी संबंधित आहे म्हणे हे ! मला तर हे काहीतरी फारच ज्ञानाबिनाचं, कठीण असं वाटतंय. मी जरा मूर्खासारखं बडबडतेय का जयेश ?

के : नाही काकू ! मुळीच नाही ! मला पटतंय तुझं. माझी तयारी नव्हती इतकंच ! खरं तर मी या विषयावर बोलायचं टाळत होतो, पण मला तुझं मतही हवंच होतं. आणि तू सांगितलंस ते बरं झालं. यावर आपलं एकमत आहे हे कळल्यामुळं बरं वाटलं ! खरंच !

काकू : जाऊं दे ! इतकं मनाला नको लावून घेऊस ते !

के : मी ते इतकं मनाला लावून घेतोय, हे खरंच माझ्या लक्षातच आलं नव्हतं. ( विचित्र शांतता. ) मिस बाबर आल्या का ?

काकू : नाही ... ती नाटकात कामंबिमं करते ना ... तालमीबिलमी असतील .. काही निरोप द्यायचाय का तिला आल्यावर ?

के : नाही, नाही. मला फक्त त्यांची माफी मागायची होती. त्या माणसांनी त्यांच्याही खोलीत शोधाशोध केली ! विस्कटाविस्कट झाली असेल --

काकू : काही माफीबिफीची गरज नाही. सगळं होतं तसंच आहे. जागच्या जागी. छान आणि नीटनेटकं. तुला माहिती नाही का, अरे, बऱ्याच वेळा खूप उशिराच येते ती. असू दे. तरुण वय, दुसरं काय !

| | |
|---|---|
| के : | ते बरोबर आहे, पण अतिरेक होऊ नये ! |
| काकू : | अगदी बरोबर. तिच्याबद्दल माझी काहीही तक्रार नाही. ती मला फार आवडते. गुणी मुलगी आहे. छान राहणारी, वक्तशीर, कामसू, असं खूप ... पण ... |
| के : | पण काय काकू ? |
| काकू | खरं तर मी हे बोलू नये, पण मी तिला एका वेगळ्याच पुरुषाबरोबर एवढ्यात दोनदा पाहिलंय, गेल्या काही दिवसांत -- |
| के : | बरं मग ? |
| काकू : | मग म्हणजे ? त्यामुळं मला भयंकर काळजी वाटते. तिची वाट पाहण्याच्या नादात, तुला सांगते, माझी झोपच उडून जाते. आणि हे एवढंच नाहीय. खरं तर फार पूर्वीपासूनच मला तिच्या वागण्याबद्दल संशय होता. कोल्हापूरच्या जाधवांची ओळख काढून आली होती आणि त्याच वेळी ही खोली रिकामीही होती म्हणून दिली होती तिला. पण आपल्याला काय करायचंय म्हणा ! |
| के : | साफ चूक आहे हे -- तुझा नक्कीच काहीतरी गैरसमज होतोय. तिच्याबद्दल मी सहज विचारलं तर भलतंच चालू केलंयस तू ... कुठल्याही अर्थानं तिला ... आणि मी तुला ताकीदच देतोय असं समज ... तिच्याबद्दल असलं काहीही बोलायचं नाही ... तू बोलतेयस त्याच्यात कवडीचं तथ्य नाहीय. ( जायला लागतो. ) |
| काकू : | अरे, थांब थांब ! तुला खटकत असेल माझं तर सांग ना तू. आणि फक्त तुझ्याशीच बोललेय मी हे ! या आपल्याच इमारतीची, शिव निवासची, बदनामी होऊ नये म्हणून रे ! |
| के : | तसं असेल तर मलाही सोडायला सांग मग तुझं घर ! -- |
| काकू : | जयेश ! अरे काय बोलतोयस हे ! तुला जायला सांगीन मी ? शक्य तरी आहे का ? असलं नको बोलूस. तुझ्याशी वागते का कधी मी तसं ? |
| के : | काकू, काकू, हळू बोल. आजूबाजूच्या सगळ्यांना जागं करशील तू ! तुझ्याबद्दलच्या आपुलकीनंच बोललो मी ! आपला एकमेकांबद्दल गैरसमज झाला ! आपुलकीनं बोलताना होतंच असं ! ( काकू जाऊ लागते -- ) मी स्वतंत्र आहे. फक्त मला अटक झालेली आहे इतकंच ! |
| काकू : | निष्कारणच कुणी अटक नाही करत ! |
| के : | म्हणजे आपोआप ते आपराध्यांकडेच येतात की काय ? |
| काकू : | अरे, काहीजणांना अटक तर होते म्हणे पण आपल्याला कशासाठी अटक झालीय हेच त्यांना माहीत नसतं ! मला या शिव निवासची कुप्रसिद्धी नकोय बाबा ! बरेच लोक राहतात इथं ! ( आपापल्या पद्धतीने आजूबाजूचे निवासी वाकून बघताहेत ... के. मिस बाबरच्या घराकडे चाललाय. तो ‘‘ मिस बाब ऽ र ‘‘ अशी हाक मारतो. नंतर दारावर टकटक करतो. डोकावणारे चेहरे बाजूला होतात. रात्र गडद. आता अदृश्यपणे रात्रीच्या प्रसंगांचे आवाज ... बायकांना पटवले जाणे, कॉट्सचे वा बाजांचे आवाज, संभोगाच्या वेळचे आवाज, वगैरे. जणू वेड्यांचा बाजार. एक आवाज ओरडतो -- ) |
| आवाज : | शांतता ! ( इथे रहिवासी आपापल्या घरांत जाऊन दारे लावून घेतात. ) |
| | **मिस बाबर** |
| चंद्रभान व इतर : | अकरा वाजले ! ( आता मिस बाबर येते. काही पावले टाकून ती तिच्या खोलीकडे पोचते. कपडे बदलायची तयारी करते. के. त्याच मार्गाने तिकडे जातो. जणू कीहोलमधून बघतोय. ) |
| के : | ( हळू आवाजात -- ) मिस बाबर, मिस बाबर ... |

चंद्रभान व इतर : प्रार्थना करतोय का काय !

मिस बाबर : काय आहे ?

के : मी जयेश के., मला जरा बोलायचंय तुमच्याशी --

मिस बाबर : आत्ता ? या वेळी ?

के : मी जवळजवळ तासभर वाट पाहतोय तुमची. ( आता गडबडीने, स्वत:शी -- ) तिला भेटायची अशी माझी काही खास इच्छा नाहीय. खरं तर ती नेमकी दिसते कशी हेही मला आठवत नाहीय ... एकताकडे जायचं खरं तर मी हिच्यामुळे टाळलं ... शिवाय माझं रात्रीचं जेवण राहिलं ते राहिलं ... आज सकाळी जे काही घडलं त्यामुळंच घडलंय हे असं ...

मिस बाबर : बरं, बरं, ठीक आहे -- या, आत या -- बाहेरून नका बोलू -- सगळे जागे होतील -- ( तो आत येतो. ) बोला, काय आहे तरी काय एवढं ? मला फारच उत्सुकता वाटतेय --

के : नाही, नाही, सांगितल्यावर कदाचित तुम्ही म्हणाल की यात काय एवढं अर्जंट होतं ?!

मिस बाबर : असू द्या -- सांगा --

के : हो. आज सकाळी जे काय घडलं त्याबद्दल माफी मागायचीय मला तुमची. काहीजणांनी इथं तुमच्या खोलीत शोधाशोध केली.

मिस बाबर : माझ्या खोलीत ? ( ऐकता ऐकता कपडे काढत असल्याचा अभिनय. हाच अभिनय चंद्रभान आणि इतरही करतात. )

के : विचित्र माणसं हो ! माझा विरोध असून !

मिस बाबर : बरं !

के : तर असं घडलं ते !

मिस बाबर : असं होय ! असू दे ! एक तर तुमची माफी मागून झालेली आहे आणि मुख्य म्हणजे माझ्या खोलीत तर काही विस्कटलेलं दिसत नाहीय. त्यामुळं मी तुम्हाला माफ केलं असं समजा --

के : पण अजून महत्त्वाचं ते सांगायचं राहिलेलंच आहे --

मिस बाबर : अच्छा ! अजून काहीतरी आहे म्हणजे --

के : आज सकाळी मला अटक झाली.

मिस बाबर : काय !

के : होय --

मिस बाबर : फारच सनसनाटी दिसतंय हे -- का बरं, कशासाठी ? तुम्हाला ?

के : तेच तर ! आश्चर्यच वाटतंय ना तुम्हाला ? मी निरपराधीच असलो पाहिजे असंच वाटतंय ना तुम्हाला ? अं ?

मिस बाबर : तसं तर मला काहीच माहीत नाही. मी कसं काय काहीही ठाम म्हणू शकेन ? तशी तर मला तुमची नीटशी माहितीही नाही. आहे का ? न जाणो, एखादा गंभीर गुन्हाही असू शकेल ! पण, सध्या तरी तुम्ही मोकळे दिसताय. आणि तसे तुम्ही काही पळूनबिळून आलेले वाटत नाही. त्यामुळं, फारसं गंभीर काही नसावं असं वाटतंय.

के : नाही, गंभीर नाहीय, पण त्यांना माझ्याबद्दल कसला तरी संशय आहे --

मि बाबर : अच्छा --

के : तुम्हाला या कायद्याबियद्याचा काही अनुभव आहे ? किंवा माहिती वगैरे ?

मिस बाबर : नाही, नाही, अजिबातच नाहीय. पण तसा अनुभव असावा असं मात्र वाटतं. न्यायालयं हा खरंच एक

भयानक इंटरेस्टिंग प्रकार असतो. आणि कायदा ! कायद्याचं तर मला एक विशेष असं आकर्षणच आहे. खरं तर पुढच्याच आठवड्यात एका न्यायालयाच्या ऑफिसातच माझी नोकरी सुरू होतीय.

के : अरे वा ! मग कदाचित माझ्या सुनावणीच्या बाबतीत तुमची मला मदत होऊ शकेल --

मिस बाबर : का नाही ? अशी मदत होऊ शकली तर फारच छान !

के : म्हणजे मला अगदी वकीलच लागणाराय असं नाही --

मिस बाबर : म्हणजे नुसता थोडा सल्ला ?

के : अगदी बरोबर.

मिस बाबर : मग सांगा बरं मला, काय आहे ते --

के : मला माहिती नाही ! हाच तर घोळ आहे ! मलाच माहिती नाही ! नुसतीच मला अटक केली गेली ! कारण सांगणं नाही, प्रश्नोत्तरं नाहीत नि काही नाही ! ते अचानक घुसले आत ! बास !

मिस बाबर : म्हणजे काय प्रकार तरी काय म्हणायचा हा ? ( इथे ती अशी आरामात बसते की ती मादकच दिसावी. त्यामुळे के. अस्वस्थ. )

के : भयानक ! धक्कातंत्रच अगदी ! ( मनात -- ) तिनं पोझिशन बदलावी जरा -- माझं चित्त विचलित होतंय --

मिस बाबर : ते आलं लक्षात, पण काय झालं काय ?

के : मी दाखवतो तुम्हाला, पण मला जरा थोडी हालचाल करावी लागेल --

मिस बाबर : कशासाठी ?

के : तुम्हाला समजावं म्हणून --

मिस बाबर : ठीक आहे, म्हणजे करूनच दाखवताय तुम्ही, चालेल, त्यासाठी गरज असेल तसं करा --

के : करावंच लागेल -- ती वेगवेगळी माणसं कुठं कुठं होती वगैरे कळण्यासाठी -- ( प्रकाशयोजना बदलते. के.ला हवे त्याप्रमाणे दृश्य सादर करण्यासाठी नटमंडळी तयारीत. इथे हे स्पष्ट व्हावे की जे काही घडते आहे ते फक्त के.च्या डोक्यातले आहे, तेच तसेच मिस बाबरला दिसते आहे असे नाही. फक्त कर्तव्यभावनेने नटमंडळी ते दृश्य सादर करत राहतात. )

के : आता झालं काय, आज सकाळी, नेहमीची वेळ होऊन गेली तरी, माझ्या काकूनं माझा नाश्ता आणून दिला नाही. असं सहसा घडत नाही. वाट पाहून मी बेल मारली आणि त्या क्षणी हे घरात ! दोघे ! ( मधेच -- ) आता हे दृश्य नीट दिसण्यासाठी, इथं खिडकीच्या कडीवर एक ब्लाऊज लटकतोय. ( पुढे -- ) तर हे दोघे आत आले. एक प्रचंड मोठा माकडतोंड्या आणि दुसरा छोटा, बुटका असा प्राणी. त्यांनी सरळ शोधाशोधच सुरू केली. कपाटं पाहिली, ड्रॉवर्स पाहिले, अगदी खिडकीखालच्या फळ्याही पाहिल्या. पण लपवावं असं काही नव्हतंच माझ्याकडे तर मग काय शोधत असतील ते ? कहर म्हणजे, नंतर त्यांनी माझी झडती घ्यायला सुरुवात केली. आता मी तुम्हाला भित्रा वाटू शकतो मिस बाबर, पण मी मुळीच भित्रा नाहीय. तशी मी उगीच कुणाची अरेरावी खपवून घेत नाही. त्या माकड्याच्या पोटात दिला गुडघा ठेवून आणि डाव्या हातानं जोरात दिलं ढकलून त्या बुटक्याला, तसं ते बुटकं हेलपाटलं आणि धडपडत पडलं जाऊन कोपऱ्यात. नंतर उगवले ते महान इन्स्पेक्टरसाहेब ! चांगला तबेलदंड, ढोल्या माणूस ! आला रुबाबात ! असला दडपून टाकणारा रुबाब तुम्ही कुठं पाहिला नसेल ! आणि आता, इमारतीत असे पोलीस आल्यावर शेजारीपाजारी स्वस्थ कसे राहणार ? काय चाललंय ते त्यांना कळलंच पाहिजे ! त्यामुळं, हजरच होते ते, कुणी गॅलरीत, कुणी पायऱ्यांवर, कुणी कठड्यांवर रेललेले आणि इथं आत, बरं का,

खोलीतही आणि बाहेर इकडेतिकडे ! काय चाललंय हे न कळताच एकमेकांत चर्चा करणारे ! माझी तथाकथित लफडी एकमेकांना सांगणारे ! ते असो ! तर हा इन्स्पेक्टर सरळ माझ्याकडे येतो आणि म्हणतो काय --

इन्स्पेक्टर : जयेश, किती वाजलेत काही समजतंय ?

के : काय म्हणालात ?

इन्स्पेक्टर : तू सगळ्यांना जागरण घडवतोयस !

रहिवासी : आणि मला सकाळी लौकर उठायचंय. बरं, मिस बाबर, तुम्हाला काही त्रास नाही ना ? आम्हाला वाटलं की तो तुम्हाला त्रास देतोय. हवं तर मी पोलीसांना बोलावतो. ( तक्रारखोर आवाजात काहीबाही बोलत ते सगळे जातात. )

मिस बाबर : वैतागच झाला हा ! सगळ्यांनी ऐकलं बोलणं आपलं !

के : सॉरी ! मी घेईन ते सगळं सावरून --

मिस बाबर : आता जा पटकन ! झटकन उठा आणि पळा ! ऐकतायत ते सगळे !

के : तुम्हाला माझा रागबीग नाही ना आलेला ?

मिस बाबर : नाही, मला रागबीग नाही येत.

के : नक्की ? ( तो तिच्या हाताला स्पर्श करू पाहतो पण जमत नाही. तो खुर्चीवर पाय फाकून बसून राहिलेला, मनात -- ) खरं तर मला तिच्याशी तिच्या नावानं बोलायचं होतं, पण मला तिचं नावच माहीत नव्हतं -- ( इथे रहिवाशांचे गुरगुरणे. आता अवतीभोवती के.ची खोली तयार होते. ) त्या इन्स्पेक्टरनं गोंधळातच पाडलं मला. पण, हेही तितकंच खरं आहे की त्यांना इथंच येणं भाग होतं -- बँकेत कसं जमलं असतं हे ? -- बँकेत स्टाफ असतो, क्लार्क्स, ऑफिसर्स, शिपाई असतात -- सारखा टेलिफोन वाजत राहणार ! गिऱ्हाईकांच्या रांगा ! तिथं कसं सारखं तत्पर असावं लागतं ! घाई असते ! तिथं मला बाजूला कसं घेता आलं असतं ? ( इथे एक व्यक्ती त्याला ओढते. आता पुढील दृश्यात तो जणू कैदखान्यातून बघतो आहे -- )

**चाबूकवाला**

( चाबूकवाल्याने धरून आणल्याप्रमाणे दोन रक्षक येतात. )

के : इथं काय करताय ?

रक्षक १ : तुम्ही आम्हाला नालायक ठरवलंत, त्यामुळं आता हे चाबकानं फोडून घेणं आलं.

रक्षक २ : आम्ही तुमचे कपडे चोरले असं तुम्ही म्हणालात.

रक्षक १ : आम्ही असं करायला नको होतं, हे म्हणणं ठीक आहे हो, पण आमचा पगार किती तुटपुंजा आहे, हे आहे का माहिती तुम्हाला ?

रक्षक २ : आणि रक्षकांनी शर्ट आणि इतर कपडे ठेवून घ्यायचे ही पद्धतच आहे --

रक्षक १ : कारण एकदा अटक झाल्यावर तुम्हालाही त्यांचा काही उपयोग नसतो -- मला माझ्या कुटुंबाचं पालनपोषण करावं लागतं -- फारुखला लग्न करायचंय --

रक्षक २ : तुम्ही आम्हाला वाईट का ठरवलंत ?

रक्षक १ : तुम्ही जर असं केलं नसतंत तर आम्हालाच या चाबूकवाल्याच्या पोस्टला प्रमोट व्हायचा चान्स होता !

के : मी तर फक्त मिस बाबरनाच बोललोय --

रक्षक १ : न्यायासनाला कळलंच ! -- आमची कारकीर्द तर आता तुमच्यामुळे खड्ड्यात गेलीच आहे पण शिवाय आता हा जबरदस्त मार खावा लागणार आहे --

के : वेदना होतील का खूप ?

रक्षक २ : मग ? भयानक असतं ते ! भयानक !

चाबूकवाला : चूप ! चाबकाच्या भीतीनं वेडे झालेयत ते ! ( तो बडबडायला सुरुवात करतो. )

के : थांबा ! त्यांना सोडून देण्यासाठी, हवं तर, काही पैसे देतो मी तुम्हाला !

चाबूकवाला : मला लाच देणं चूक आहे बाबा ! मी न्यायालयाचा अधिकारी आहे. चाबकानं फोडून काढण्यासाठीच मला पगार मिळतो. मी करतो मग ते !

रक्षक १ : ( केला एका बाजूला घेऊन -- ) बरं, मिस्टर के. बघा, मी एक रिक्वेस्ट करतो तुम्हाला, शक्यतो मला यातनं सोडवा. फारुख तसा माझ्याहून वयानं जास्त आहे आणि कमी संवेदनशील आहे ! त्याला पूर्वीपण असा एक छोटासा प्रसाद मिळालेला आहे ! पण, माझं रेकॉर्ड स्वच्छ आहे ! आणि आदरणीय के सर, कृपया आणखी एक बघा -- तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही -- माझी एक प्रेयसीही माझी वाट पाहतेय -- तिला हे कळलं ना तर शरमेनं चूर होईल ती ! --

के : ( चाबूकवाल्याला -- ) ते अपराधी नाहीत. अपराध खरं तर या संपूर्ण व्यवस्थेचाच आहे. स्पष्टच बोलायचं तर उच्चपदस्थ अधिकारी जे आहेत ना ते अपराधी आहेत. त्यांना धरून हाणायला पाहिजे. पाहिजे तर मी मदत करीन तुम्हाला. यांना सोडा. हवं तर मला घ्या त्यांच्या ऐवजी ! मी माझे कपडे काढतो आणि उभा राहतो तुमच्यासमोर ! तुम्हाला बळीचा बकराच हवा असेल तर मी आहे ! ( आक्रोश करणारे आवाज. हादरतो. ) च्यायला, आता मात्र झोपी जायचाच प्रयत्न करायला पाहिजे ! --

**शहर**

चंद्रभान व इतर : ( गाणे म्हणत -- )
जयेश जयेश के के
तू उंदिर ते बोके
सुटू नाही शकत, पळू नाही शकत
पंज्यात तुझे रे डोके ...

चंद्रभान : आठ वाजले होते. ( गजर होतो. )
रविवार सकाळ.

के : अरे बाप रे ! माझी सुनावणी ! ( के घाईने लोकलमध्ये घुसतो. ती शहरवासीयांच्या समूहाने बनलेली. लोकलचा आवाज -- समूहाच्या आवाजात -- ‘‘ जयेश के, जयेश के, जयेश जयेश जयेश के. ‘‘ ) च्यायला, या कोर्टाचं समन्स कधी येतं काय माहीत !

आवाज : प्रथम चौकशी.
चौकशी आणि समन्स, एक झालं की दुसरं.
अधिकाधिक नियमित, काळाच्या ओघात.
चौकशी अगदी परिपूर्णच असावी लागते !
काय के, वाईट वाटतंय ना हे ऐकून ?

के : नाही, नाही, सगळं ठीक आहे.

असि. मॅनेजर : हॅलो के, या रविवारी वेळ आहे का ? एका पार्टीला जायचंय. माझ्या गाडीतनं जाऊ या. तिथं खूप प्रभावी, मोठमोठी माणसं असणार आहेत --

के : सॉरी ! मी आधीच जरा गुंतला गेलोय.

असि. मॅनेजर : अरेरे ! जाऊं द्या मग !

आवाज : असिस्टंट मॅनेजरनं केला त्याच्या गाडीतनं पार्टीला यायचं विचारलं !

आवाज : के. किती महत्त्वाचा आहे बँकेत !

के : माझी मैत्री त्याला जरा महत्त्वाची वाटत असेल इतकंच !

असि. मॅनेजर : मी जरा नम्र आवाजात त्याला विचारलं खरं, पण एक आपलं पाहिलं टाकून ! इतकंच !

के : माझी केस आता चालू होतेय. मी ती लढवलीच पाहिजे. पहिली सुनावणीच शेवटची ठरली पाहिजे.

आवाज : अनेकांतली पहिली रे !

के : त्या साल्यांनी फोन केला पण कुणाला भेटायचं ते सांगितलं नाही --

आवाज : पुन्हा फोन लावू का त्यांना ?

के : जाऊं दे -- मला काहीच आठवत नाही --

आवाज : मग राहूं द्या --

आवाज : १४, जयभवानी रोडला जायचंय --

के : च्यायला, कसला हा रस्ता ?

आवाज : जयभवानी रोड.

आवाज : पोचलात तुम्ही तिथं के. !

के : अरे !

आवाज : होय -- हे काय --

चंद्रभान व इतर : ( रुक्ष, वस्तुस्थितीनिदर्शक आवाजात बोलतात. बाकीची नटमंडळी शक्य तेवढे स्टिल शॉट्स सादर करतात किंवा यांच्या बोलण्याला सूचक अशा कृती करतात.) रविवार असल्यामुळं लोक साध्याश्याच पोषाखांत फिरत होते. बायका गर्दीनं किराणा दुकानांत येतजात होत्या. एक फळविक्रेता फळं विकत फिरत होता. एक जुनं हिंदी चित्रपटगीत, कशालातरी धार लावण्याच्या आवाजात खलास होत होतं. केनं रस्त्यावर दूरवर पाहिलं. त्याला वाटत होतं की तिथला मॅजिस्ट्रेट खिडकीतनं वाकून पाहात असेल आणि तो के.ला येताना पाहील... तो थांबतो आणि एका घराकडे बारीक लक्ष देत पाहतो -- हं ! ! हाच तो नंबर चौदा ! ! त्याला एक जिना दिसतो. वर जाऊन तर बघू असा तो विचार करतो. आता तो पायऱ्या चढून वर जातो आहे -- त्याला खात्री नाही -- पण तरीही तो जात असलेल्या दिशेला त्याला एक विचित्र ओढ जाणवतेय. ( पायऱ्या तयार ... )

के : तो रक्षक म्हणाला ते जर खरं असेल तर कायदा आणि अपराध यांच्यांत आकर्षण असणार आणि याचा अर्थच ते चौकशी न्यायालय हे मी ठरवीन त्या दिशेलाच असणार !

चंद्रभान : बरोबर आहे का के.चा निष्कर्ष ? तो रक्षक खरं बोलत होता का ? की ते दोघंही चूक असतील ? के. पहिल्या मजल्यावर पोचतो. अजून कोर्टाबद्दल तो कुणाला काही विचारूच शकला नाहीय. तरीही त्या खोल्या पाहाव्या असं त्याला वाटतं. सुरुवात एखाद्या सुताराच्या शोधानं करू असं तो ठरवतो. त्या सुताराचं नाव --

के : लालू !

चंद्रभान : जे त्याच्या डोक्यात येईल ते !

के : लालू सुतार इथंच राहतात का ?

आवाज : कधी ऐकलं नाही बुवा !

के : अहो, लालू सुतार राहतात का इथे ?

आवाज : कोण ? नाही नाही --

आवाज : नाही, इथंही नाही -- ( ही सगळी गरीब लोकांची वस्ती आहे. वरील कृती शक्य तेवढ्या सादर व्हाव्यात. यापुढील दृश्यात धोबीण. ती कपडे वाळत टाकते आहे. )

**धोबीण**

( धोबीण पायऱ्या उतरून खाली येते आणि कपडे धुणे / वाळत टाकणे याचा अभिनय करू लागते. ती अत्यंत मादक असून निव्वळ ऐहिक टाईप आहे. अर्थातच ती के.ला आकर्षक वाटते. )

धोबीण : लालू नावाचा कुणी सुतार नाहीय इथं --

के : मला तो नकोच आहे -- मी ती एक आपली युक्ती म्हणून वापरलीय --

धोबीण : इकडेतिकडे टेहळणी करता यावी म्हणून --

के : कुणाकडे जायचं ते सांगितलंच नव्हतं मला --

धोबीण : नुसतं न्यायालय विचारायचं ! पण तुम्हाला लाज वाटली असेल ! न जाणो, लोक आपल्याला गुन्हेगार समजायचे !

के : हुशार आहेस --

धोबीण : हुशार असणंच भाग आहे. मी इथली धोबीण आहे आणि माझा नवरा कोर्ट बेलिफ आहे. मला एक सांगा, तपासणी मॅजिस्ट्रेटकडे मी तुमच्यासाठी काही शब्द टाकू का ?

के : म्हणजे तू ओळखतेस त्यांना ?

धोबीण : अर्थात ! इथं राह्यचं भाडंबिडं काही पडत नाही आम्हाला. फक्त केसेस चालू असतील तेवढ्या वेळेपुरती ही जागा खाली करायची ! तुम्ही अटक झालेले आहात ना ?

के : हं, आरोप आहे माझ्यावर. का बरं ? तू काही मदत करू शकशील का काय मला ?

धोबीण : नक्कीच आवडेल मला. इथं अत्यंत भयानक आहे सगळं ! मला वाटतं तुम्ही या सगळ्यात काही सुधारणा घडवून आणू शकाल --

के : मी इथं काहीही सुधारायला आलेलो नाही -- फक्त माझी केस बघायची, बास !

धोबीण : ( मादक हालचाल करत -- ) बरं, कसली करू मी मदत ?

के : झटकन मला इथल्या कोर्टाच्या नोंदी दाखव -- माझ्यावर कसला आरोप आहे ते तरी एकदाचं कळून जाऊ दे -- ( आता इतर नटमंडळींचेच, घाणेरड्या चित्रांचे एक पुस्तक बनते. ) हे ? यात तर नुसती चित्रं आहेत -- चित्रांशिवाय काहीच नाही -- वा ! -- इथं एक पुरुष आणि एक स्त्री नग्नावस्थेत बसलेले आहेत एका सोफ्यावर --

धोबीण : बहुतेक सगळी ही अशी घाणेरडीच पुस्तकं आहेत --

के : आणि आमचा न्याय करायला बसलेले इथले ग्रेट कायद्याचे पाईक हे -- हे वाचतात ! ?

( आता नटमंडळी पुस्तकातली चित्रे होतात. )

आकृती १ : गीता, कुठं आहेस तू ?

आकृती २ : मी आहे पृष्ठ क्रमांक दोनवर --

आकृती १ : इकडे ये नं माझ्या छळवादी पाखरा -- ( ती दोघे एकमेकांचा पाठलाग करत निघून जातात. )

धोबीण : या, बसा माझ्याजवळ. तुमचे काळेभोर डोळे फारच सुंदर आहेत. माझेही डोळे खूप सुंदर आहेत, असं लोक म्हणतात बरं का, पण तुमचे जास्त सुंदर आहेत !

के : ( प्रेक्षकांना -- ) म्हणजे हा निघाला शेवटी सारांश ! ती मला उपलब्ध असणं ! ती त्या इतर सगळ्यांसारखीच भ्रष्टाचारी दिसतेय. तिला इथं आलाय कंटाळा. त्यामुळं, जरा एखाद्या परक्या

माणसाला हिचं आकर्षण वाटलं आणि त्यानं केली थोडी हिच्या डोळ्यांची स्तुती की झालीच ही तयार ! ( तिला -- ) सुनावणी जर काही नसेलच तर मग मी परत जायला काहीच हरकत नाही --

धोबीण : नका जाऊ प्लीज -- माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊन तर मुळीच जाऊ नका. थोडा वेळ थांबा, प्लीज --

के : तुझी न् मॅजिस्ट्रेटची कशी काय ओळख ? तुला जर खरंच मला मदत करायची असेल तर अशा अधिकाऱ्यांच्या ओळखी लागतील.

धोबीण : अहो, नक्कीच ! या मॅजिस्ट्रेटला मी खूप आवडते. गेल्या रविवारचीच गोष्ट. हा अगदी मध्यरात्री माझ्या खोलीत आला -- मी जागी होऊन पाहते तर हा माझ्या बिछान्याजवळ उभा !

के : आणि तुझा नवरा कुठे होता मग ?

धोबीण : माझ्याबरोबर -- बिछान्यात -- अर्थातच !

के : मग काय म्हणाला नवरा तुझा ?

धोबीण : काहीच नाही. त्याची झोप कुंभकर्णी आहे. तो जागाच नाही झाला.

के : च्यायला, भयंकर आहे !

धोबीण : मी इतकी दचकले ! जवळजवळ किंचाळलेच ! पण मॅजिस्ट्रेटचा चेहरा खूप दयाळू आणि मार्दवपूर्ण होता. तो म्हणाला की म्हणे मी अशी बिछान्यात झोपलेय हे चित्र तो आता कधीच विसरणार नाही.

के : हं ! !

धोबीण : त्यानं काल मला काही कर्णफुलं दिली. येतंय का लक्षात ? मॅजिस्ट्रेटला माझ्यात खूप इंटरेस्ट आहे. आणि याचाच अर्थ माझा त्याच्यावर खूप प्रभाव आहे. ती कर्णफुलं त्यानं, इथे एक विद्यार्थी आहे, त्याच्यामार्फत पाठवली.

के : हा विद्यार्थी कोण आहे ?

धोबीण : राग नका मानू, पण तो माझा प्रियकर आहे. मला पर्यायच नाही. कोर्टात त्याची बऱ्यापैकी वट आहे. त्याच्यामुळंच तर राह्यला घर मिळालंय आम्हाला. फक्त एकच, जेव्हा जेव्हा कोर्टाचं कामकाज चालू असतं तेव्हा तेव्हा आम्हाला आमचं सगळं सामान बाहेर काढावं लागतं आणि मग रविवारी पुन्हा जागेवर लावायचं ! कधी कधी तर कोर्टाचं कामकाज रात्री उशीरापर्यंत चालतं ... अरे बाप रे ! आपल्याकडे बघतोय तो ! ( पार्श्वभूमीवर विद्यार्थी तिला बोलावत असलेला दिसतो. ) आलेच हं बलराम !

के : जाऊ नको --

धोबीण : माफ करा, मला जावंच लागेल. तो इतका घाणेरडा आहे, पण करणार काय ? त्यानं बोलावलं की झालं ! इलाज नाही. लौकरच मी परत येते. आणि मग, तुम्ही म्हणाल तिथं मी येईन. ( विद्यार्थी तिला कमरेभोवती घट्ट कवटाळूनच नेतो. ) आणि मग माझ्याशी तुम्ही हवं ते करा -- इथनं कायमची सुटका व्हावी एकदाची ! -- ( आता विद्यार्थी तिच्याशी प्रेमाचे चाळे करू लागतो. के. थांबवायचा प्रयत्न करतो, पण त्याला शक्य होत नाही. त्याचे प्रयत्न कमकुवत ठरतात. तो अगदी असहाय होतो. हे सगळे चालू असतानाही ती दोघे कुजबुजतात, चुंबने घेतात. )

के : मी सोडवीन तुला यांच्यापासून ! च्यायला, कसली क्यूट दिसतेय ही ! मऊपणा आणि ऊबच मूर्तिमंत !

चंद्रभान : कदाचित ती म्हणजे, न जाणो, एक सापळा असेल तुझ्यासाठी !

के : मी नाही त्याची काळजी करत ! ती कसं काय मला सापळ्यात पकडू शकेल ? कोर्टसुद्धा नाही काही करू शकणार मला, मग ती कसं काय गुंतवू शकेल ? आणि तेवढा धोका चालतोय ! मला माझ्या केसचीही पर्वा नाही, तो सगळा एक विनोदच ठरणार आहे, ऐकतोयस का, विनोद ! हा हा हा ! तेसुद्धा माझी केस या कोर्टासमोर कधी काळी आलीच तर ! ती शक्यता काही दिसत नाही ! आणि मग एक दिवशी ती अत्युत्तम घटना घडेल -- तो घाणेरडा, थेरडा मॅजिस्ट्रेट उत्साहानं तिच्या खोलीत येईल ... माझ्याबद्दल बऱ्याच खोट्यानाट्या गोष्टी शिजवून, माझं कसं, काय वाईट करता येईल ते ठरवून तो आलेला असेल ... आणि काय दिसेल त्याला ? तिचा बिछाना रिकामा ! का ? तर ती माझ्याबरोबर निघून गेल्यामुळं ! ( के. तिचा दंड पकडतो. पहिल्यांदाच तो त्या विद्यार्थ्याला दिसतो. दोघेही तिची ओढाओढी करतात. ) ही सळसळती, मादक, ऊबदार काया माझी आहे ! फक्त माझी !

विद्यार्थी : चालता हो ! तुला कसलंही बंधन नसलं तरी तुझ्याकडं दुर्लक्षही होणार नाहीय ! खरं तर मला पाहताक्षणीच तू दफा व्हायला हवं होतंस !

के : मला असं कळलंय की तू एक विद्यार्थी आहेस --

विद्यार्थी : मग ?

के : जज पदाला पोचेपर्यंत अजून खूप पल्ला बाकी आहे तुझा ! -- ( गर्दीतून ‘‘ होय, होय ! शाब्बास ! ’’ -- असे आवाज -- )

विद्यार्थी : खरं म्हणजे इकडंतिकडं भटकायला तुला असं मोकळं सोडायलाच नकोय ! -- याला साल्याला याच्या घरातच नजरकैदेत ठेवलं पाहिजे. हे मी मॅजिस्ट्रेटलाही सांगितलंय ! त्याची प्रश्नोत्तरं नसतील तेव्हा असं अडकवूनच ठेवा त्याला ! (के. धोबिणीला स्वत:कडे ओढायचा प्रयत्न करतो. )

के : चल, ये इकडे !

विद्यार्थी : नाही, नाही, तुला मुळीच मिळणार नाही ती ! ( तो तिला कमरेभोवती कवटाळतो. )

धोबीण : तुझ्या प्रयत्नाचा काही उपयोग नाही होणार -- हा नीच राक्षस मला सोडणार नाही --

के : तुलाच यातनं सुटायचं नाहीय --

धोबीण : नाही, नाही, तुमच्या लक्षात येत नाहीय -- तो मला फक्त तपासणी मॅजिस्ट्रेटकडे घेऊन चाललाय -- ( के अजूनही तिला पकडायचा प्रयत्न करतो. प्रत्येक वेळी ती के.कडे येतायेता राहते. शेवटी तो थकतो आणि नाद सोडून देतो. )

के : मला तर वाटतंय की आपली भेटच व्हायला नको होती. आणि हा साला विद्यार्थी नामक फेंगडा, सरपटता किडा ! किंमतशून्य असून रुबाब करणारा ! हा साला एकताच्या बिछान्याजवळ असा भीक मागत उभा असलेला मला दिसायला पाहिजे ! त्याचा हात असा पिरगाळीन ना मी की त्याची जीभच बाहेर येईल !

चंद्रभान : हे कल्पनाचित्र केच्या मनाला इतकं भावलं की संधी मिळेल तेव्हा त्या विद्यार्थ्याला त्यानं एकताच्या भेटीलाच न्यायचं ठरवलं !

के : मला तर वाटतंय की ती तपासणी मॅजिस्ट्रेटकडे चाललीय वगैरे सगळं थोतांडच असणार आहे. दुसऱ्याला बेसावध करायच्या त्यांच्या डावपेचांचा हा एक भाग असणार आहे. ( इथे बेलिफ प्रवेश करतो. तो जणू एकाच जागी अती वेगात पळतो आहे. सतत पळणे. )

बेलिफ : माझी बायको दिसली का तुम्हाला इकडे कुठे ? काय हो ? ( तो हाच प्रश्न अनेकांना विचारतो. सगळे नकारात्मक उत्तर देतात. )

के : तुम्हीच ते बेलिफ वाटतं ?

बेलिफ : होय ... अच्छा ! तुम्ही ते प्रतिवादी के ! मला ते तुमच्या ओठांवरून लक्षात येतंय. ( शेकहँडसाठी हात पुढे करतो. )

के : तुमच्या पत्नीला नुक्तंच त्या विद्यार्थ्यानं ओढून नेलंय ! एका क्षणापूर्वीच मी तिच्याशी बोलत होतो ! --

बेलिफ : बोंबला ! आणि आज तर रविवार आहे ! मला सुट्टी असेल त्या दिवशीही तेच तिला माझ्यापासून लांब नेतात. खरं तर आज मला काहीही काम नाहीय, पण माझा अडथळा नको म्हणून ते मला कुठल्यातरी अनावश्यक कामगिरीवर देणार पाठवून. पण ते मला फार लांब पाठवत नाहीत ...आपण थोड्याच वेळात परत येऊ अशी मला आशा वाटावी असं ते बघतात ... म्हणजे खूप घाईनं मी ती कामगिरी पार पाडायचा प्रयत्न केला तरच हं ! त्यामुळं जितकं जोरात पळता येईल तितकं जोरात पळतो मी ! वेळ वाचला पाहिजे हा एकच विचार मनात धरून ! आणि त्यामुळं, मी सांगतो तुम्हाला, जातो आणि टॉप स्पीडमध्ये मी परत येतो. आणि तरीही ... माझ्या आधी तो विद्यार्थीच इथं येऊन पोचतो ! त्याला फार लांब जावंच लागत नाही हो ! ... माझ्या नोकरीची काळजी जर का नसती ना मला तर फार पूर्वीच असा भिंतीवर आपटून मी त्याचा चेंदामेंदा करून टाकला असता ! मी अगदी रोज ते स्वप्न बघतो. मी असा त्याला पुरता चेचून इथं पाडलेला पाहतो -- च-ट-णी केलेला ! त्याचे हात आणि पाय असे खिळे ठोकून खाली जाम केलेले आणि तो वेदनेनं ओरडतोय -- रक्ताच्या चिळकांड्या उडतायत ... पण सालं नुसतं स्वप्नच असतं ते ...

के : याच्यावर दुसरा काहीच उपाय नाही ?

बेलिफ : शून्य ! आणि दिवसेंदिवस हे सगळं जास्तच बिघडायला लागलंय. इतके दिवस कसं होतं की फक्त तो विद्यार्थीच तिला घ्यायचा, आता तर तो तिला त्या मॅजिस्ट्रेटकडेही न्यायला लागलाय ! प्रयेकालाच मिळायला लागलीय ती !

के : तुम्हाला काय वाटतं, तिला मजा येत असेल ?

बेलिफ : नाही तर काय ! नक्कीच ! तिला आवडतंच ते ! जिभल्या चाटते ती ! प्रॉब्लेम असा आहे की माझी बायको इथली सर्वात सुंदर स्त्री आहे ! करणार काय !

के : असं असेल तर अवघडच आहे मग !

बेलिफ : त्या विद्यार्थ्याला मी हात नाही लावू शकत -- फारच वट आहे त्याची ! त्यामुळं दुसरं कुणीही काही करू शकत नाही ! पण तुमच्यासारखा माणूस करू शकेल !

के : माझ्यासारखा म्हणजे ?

बेलिफ : तुम्हाला अटकच झालेली आहे ! आता आणखी नुकसान ते काय होणार तुमचं ?

के : म्हणजे ?

बेलिफ : सगळ्या केसेसचे निकाल ठरलेलेच असतात.

के : नाही, माझ्या केसमध्ये तसं नाहीय... ते काहीही असो, पण त्या विद्यार्थ्याच्या बाबतीत मला जमेल ते मी नक्कीच करीन --

बेलिफ : मग तर मी खरंच म्हणजे कृतज्ञच राहीन ! ( लाऊडस्पीकरवरून आवाज येतो -- ‘‘ बेलिफने कृपया वरच्या मजल्यावर यावे. ’’ ) मला आता वरच्या मजल्यावर गेलंच पाहिजे. येताय तुम्ही ? या माझ्या मागोमाग --

के : माझं काहीच काम नाहीय तिकडे --

बेलिफ : अनेक प्रतिवादी वाट बघत असलेले तुम्हाला दिसतील -- आरोप असलेले तुम्ही काही एकटेच नाही

आहात -- ते सगळे आरोप असलेलेच आहेत -- ते सगळेच -- वाट पाहणारे -- ( ते दोघेही अनेक बोळकांड्यांतून जातात. इतर नटमंडळी कोणत्याही साधनांनी कोन, वळणे तयार करून त्यांचा मार्ग सूचित करतात. )

के : या कोर्टाची परिस्थिती बिकटच दिसतीय ! राह्यच्या जागेत यांचं कामकाज चालतं ! असल्या कोर्टाबद्दल आरोप्यांना कसा काय आदर वाटणार ? इथले अधिकारी साले कोर्टाचा पैसा स्वतःच हडप करत असणार आहेत ! ( बेलिफ, '' तर काय '' -- असे पुटपुटतो. ) आता येतंय माझ्या लक्षात, घरी आणि ऑफिसात माझी बदनामी करायची त्यांना का गरज वाटली असेल ते ! सरळ आहे -- माझ्यासारख्याला इथं बोलवायची त्यांना लाज वाटते ! मीच वाईट आहे असं दाखवलं की हा प्रश्नच मिटतो ! ( आता दोघेही जरा भरभर चालू लागतात. वर, खाली जात राहतात. शेवटी शेवटी तर ते पळणे रेससारखे होते. )

चंद्रभान व इतर : आणि बेलिफच आघाडीवर आहे. आता के जवळ येतोय, पण नाही, बेलिफच पुढे आहे. बेलिफ ! नाही के ! के निसटता पुढे होतोय -- तो अगदी किंचित पुढे आहे -- बेलिफ त्याच्या मागे वेगात पळतोय -- कुणाचाही विजय होऊ शकतो -- सर्व स्त्री आणि पुरुष हो, के आता थोडा जास्तच पुढं जातोय आणि तो अगदी फिट दिसतोय -- बेलिफ मागे पडलाय -- आणि के ! केच विजयी झालाय शेवटी ! केच जिंकलाय !! ( रेसची अंतदोरी. चंद्रभान व इतर प्रोत्साहनपर ओरडतात, जल्लोष करतात. मग बाकीचे जातात. रोहिणी, स्वाती राहतात. )

रोहिणी : तुला सुहास माहिती आहे नं --

स्वाती : दुर्मुखलेला सुहास --

रोहिणी : हं, तोच, आपण ज्याला डेड मॅन म्हणतो --

स्वाती : कारण आपल्याबद्दलचं आकर्षण त्याच्या नजरेत दिसतच नाही --

रोहिणी : तर तोच ! आपण त्याला विचारातही घेत नाही -- ' आत्ममग्न ' म्हणजे आपल्याला निरुपयोगीच !

स्वाती : हं, तर ?

रोहिणी : तर दुसरं कुणी नव्हतं म्हणून मी त्याला घेऊन गेले गं ! कल्पनातीत सगळं ! टेरिफिक ! बरोबर घेऊन जावा असा नाट्यानुभव ! आत्ममग्न कसला, अंतर्मुखच निघाला तो !

स्वाती : काय म्हणतेस काय ! मी पण ट्राय करून बघीन एकदा !

रोहिणी : मी तर बाई ठरवलं, नुसते चेहऱ्यावरनं अंदाज नाही बांधायचे यापुढं !

स्वाती : पण मग एरवी असा का असतो तो ? कसला विचार करत असतो ? की घरचे काही प्रॉब्लेम्स असतील ?

रोहिणी : मला नाही वाटत ! गंभीर असण्याचा स्वभावच असेल तो त्याचा --

स्वाती : व्हॉट डझ इट मॅटर इफ हिज परफॉर्मन्स इज सो गुड --

रोहिणी : ए, अश्विन आणि कार्तिक येतायत -- त्यांनी बहुतेक गृहीतच धरलंय आपल्याला -- आज त्यांची तडफड करू या --

स्वाती : ओके ! म्हणजे उद्या जास्त मजा येईल !

रोहिणी : ते त्यांना आज दुसरं कुणी भेटतंय का आणि कोण भेटतंय याच्यावर ठरणार --

स्वाती : तेवढं ओके ! ( अश्विन, कार्तिक येतात. )

अश्विन : अगं, होतात कुठं तुम्ही ?

कार्तिक : एक तास झाला, आम्ही शोधतोय --

रोहिणी : पण सॉरी ! आम्ही चाललोय जरा दुसरीकडे -- मेहनत वाया गेली तुमची --

स्वाती : पण उद्या याचं फळ मिळू शकेल --

अश्विन : उद्या ?

कार्तिक : उद्या ?

दोघीही : हो ऽ य ! ( हसतात, पळून जातात. )

अश्विन : च्यायला, मुद्देमाल सगळा यांच्या ताब्यात असतो म्हणून भाव खातात --

कार्तिक : आपल्याकडं आपला असतोच की मुद्देमाल !

अश्विन : काय उपयोग असून ? दे आर द डिसिजन मेकर्स ! हुकुमशाही आहे !

कार्तिक : बरं चल, पुढे जाऊ, काळ अनुकूल असला तर नशीब फार वाईट असू शकत नाही ! लक्ष्य बदलू !

अश्विन : ते तर करावंच लागणार !

कार्तिक : पूर्वी लोक प्रेमबीम करायचे, एकनिष्ठबिष्ठ असायचे, असं म्हणतात.

अश्विन : बकवास ! चल ! ( जातात. चंद्रभान येतो. )

चंद्रभान : काळ बदलतो, मूल्यं बदलतात, माणसं बदलतात -- पण, एक गोष्ट घडतच राहते -- काही लोक असे असतातच की ज्यांना प्रश्न पडतात -- जे नुसतं सवयीचं जगणं नाकारू पाहतात -- (जातो. )

**कोर्टाचे ऑफीस**

( चंद्रभान व इतर ही कोरसची नटमंडळी प्रतिवादी. हात पुढे ताणलेल्या अवस्थेत ते अडकवलेले. एकमेकांच्या मागे ते नुसते उड्या मारतात. )

चंद्रभान : आज तसे आम्ही थोडेच आहोत कारण आज रविवार आहे. ( इतर, '' हो, हो, रविवार आहे. '' असे म्हणतात. सर्वजण घाबरून उभे राहण्याने एक मोठा कॉरिडॉर तयार होतो. )

के : तुम्ही इथं कशासाठी थांबलाय ?

आवाज १ : मी काही कागदपत्रं सादर केलीयत. त्यांचं पुढं काय झालं हे कळायची वाट पाहतोय.

के : आणि तुम्ही का थांबलाय महाशय ?

आवाज २ : मला फक्त एकच शेवटचा प्रश्न विचारायचा राहिलाय म्हणतात.

के : आणि तुम्ही ?

आवाज ३ : मी एका प्रतिज्ञापत्रासाठी थांबलोय.

के : प्रतिज्ञापत्राची खरंच गरज असते का ?

काही आवाज : नाही.

काही आवाज : हो.

आवाज ४ : तर श्रीयुत के, तुम्ही स्वत: इथं कशासाठी थांबला आहात ते मला माहीत आहे. तुम्हाला नक्कीच ...

के : तुम्ही कशासाठी थांबला आहात इथं ?

आवाज ५ : मी इतरांसारखा नाहीय. मी स्वत:च्या कारनं आलोय. दहा वाजता माझी भेट ठरलेली आहे.

अनेक आवाज : अकरा वाजलेत !

त्याला उशीर झालाय.

आवाज ४ : श्रीयुत के. महोदय ! आठवलं मला ! मी हजारदा विसरतो हे उघडच आहे ! पण श्रीयुत के., तुम्ही त्याच कारणासाठी थांबला आहात ...

अनेक आवज : तो नेहमीच विसरतो ! ( प्रत्येकजण आपापली कारणे आणि समर्थने सांगू लागल्याने गोंगाट होतो. )

के : तुम्ही माझं ऐकाल का जरा ? ( हे म्हणताना तो एका आरोपीचा हात धरतो. )

अनेक आवाज : ए, असं ओरडायचं नाही.
काय पाहिजेय काय त्याला ?
अधिकारी सगळे ओरडत येतील आपल्या नावानं !
या माणसाच्या उपस्थितीचं ते ऑफिशियल स्पष्टीकरण विचारतील.
त्याची पकड मात्र पोलादी आहे अगदी !

के : खुळचटपणा आहे हा सगळा. मला अटक झालेली आहे याच्यावर तुमचा विश्वास नसेल बसत तर मी आपला चालू पडतो.

काही आवाज : तुम्हालाही आमच्यासारखंच थांबावं लागेल.
आमच्यातले काहीजण तर गेली काही वर्षं वाट पाहताहेत.

के : ( नरम पडत -- ) मीही तुमच्यासारखाच एक आरोपी आहे. मला फक्त माझ्या प्रश्नोत्तरांची तारीख हवी आहे.

काही आवाज : बहुतेक तो नुसता उत्सुकतेपोटी आलाय.
आपण कसे जीर्ण होत चाललोय हे पाहण्यासाठी.
किंवा हेरगिरीसाठी असेल.
उत्सुकता हीच पुढे हेरगिरी होते. ( ‘‘ हेर ! हेर ! ‘‘ -- असे आवाज. )

के : मला गेलं पाहिजे. इथून बाहेर कसं जायचं ?

बेलिफ : तुम्ही काही रस्ता चुकलाबिकला नाही आहात -- तुम्ही ज्या रस्त्यानं आलात तो फक्त आठवा. या कॉरिडॉरनं जा. उजवीकडं वळा आणि चौकात जा. तुम्ही चुकणं शक्यच नाही. ( इतर नटमंडळींचा कॉरिडॉर होतो, वगैरे. )

आवाज : नाही, के, इकडे --
सरळ पुढे --
डावीकडे --
उजवीकडे --
आता मागे --
चूक --
इकडून --
आणि आता सुरुवातीच्या ठिकाणी --
( वेगात हालचाली -- के.ची अवस्था एखाद्या दारू पिऊन हेलपाटणाऱ्या माणसासारखी ... शेवटी के कोसळतो. जणू काळाबाहेर फेकला गेल्यासारखा... पोकळीत. आता तो वेटिंग रूममध्ये आहे. )

तरुणी : काही मदत हवीय का ? तुम्हाला भोवळ आल्यासारखं दिसतंय -- कसं वाटतंय ? ( आता ती बोलते त्याच्याशी पण जणू स्वत:शीच -- ) तिचा चेहरा आता त्याच्या चेहऱ्याच्या अगदी जवळ आला होता आणि तिच्या चेहऱ्यावर असे शांत भाव होते की जे स्त्रियांचं तारुण्य प्रथमच फुलताना त्यांच्या चेहऱ्यावर असतात ... तू आता मला त्याला आजाऱ्याच्या खोलीकडे न्यायला मदत करशील, करशील ना मदत, प्लीज ? !

चलाख माणूस : एक नजरेत भरणारी राखाडी सफारी घातलेला माणूस -- म्हणजे मीच -- म्हणाला -- मला वाटतं या सज्जन माणसाला अस्वस्थ वाटतंय ते इथं बराच वेळ थांबल्यामुळं -- आणि त्याला आजाऱ्यासारखी सेवेची गरज नसून फक्त इथून -- या सगळ्या ऑफिसांमधून -- पूर्ण बाहेर पडायची

गरज आहे --

के : खरंच -- तसंच आहे. तसं होऊ शकलं तर मला लगेच बरं वाटेल. आता तसं पाहिलं तर मलाही कागदपत्रांनी गच्च भरलेल्या ऑफीसची सवय आहे, कारण मीही तशाच एका ऑफिसात काम करतो -- पण हे अतीच आहे ! -- मी इतका असा लेचापेचा नाहीय -- मुळीच नाहीय. एक थोडा आपला इथं कोपराजवळ आधार मिळाला की बास होईल, मी लगेच ठीक होईन --

चलाख माणूस : एक लक्षात घ्या -- फक्त इथंच त्याची तब्बेत बिघडतेय -- आणखी कुठंही नाही -- पण अर्थात हा त्रास कसा घालवायचा हे मी या सज्जन माणसाला सांगू शकेन ( हसतो. )

तरुणी : त्याच्या हसण्यानं विचलित होऊ नकोस. तो खरोखरच हुशार आहे. तो आमचा माहिती-विभाग-प्रमुख आहे. आमच्या कामाच्या पद्धती पब्लिकला माहीत नसल्यामुळं लोकांना बरेच प्रश्न पडतात. त्या बाबतीत तो लोकांना खूप मदत करतो. जा पुढे आणि विचार एखादा प्रश्न त्याला. प्रत्येक गोष्टीचं उत्तर असतं त्याच्याकडे. म्हणून तर तो आमच्या कुणाहीपेक्षा जास्त हुशार आहे.

चलाख माणूस : आपली गुपितं त्याला कशाला सांगायची ?

तरुणी : तू का हसलास ते त्याला समजायलाच हवं होतं, नाहीतर तो अस्वस्थ झाला असता.

चलाख माणूस : ( तरुणीला -- पण खरे तर केला -- ) तू जिकडून आलीस तिकडे जायचंय का तुला परत ?

के : जायलाच हवं मला -- खरंच, जायलाच हवं --

चलाख माणूस : त्याला जायचंय असं नुसतं म्हणतोय तो -- हलायचा थोडाही प्रयत्न करत नाहीय. दरवाजा कुठं आहे ते त्याला शंभरदा सांगितलं तरी तो आहे तिथंच थांबून राहतो --

तरुणी : तुला थांबायचं आहे का इथं ?

के : नाही ... मी ... मला ... विश्रांती ... नकोय ...

चंद्रभान : ( प्रवेशून -- ) मुलींनो आणि मुलांनो, इकडे या --

रोहिणी, स्वाती : हं --

चंद्रभान : या केनं अजून लग्न का नसेल केलं ? काही अंदाज ?

अश्विन : लौकर लग्न करायचं म्हणजे अजून आपलं कशात काही नसतं -- पोझिशन नसते --कुठलं यश नसतं -- पैसा नसतो --

कार्तिक : त्यामुळं अशीतशी कुठलीही मुलगी स्वीकारावी लागते --

अश्विन : बायको म्हणून मुलगी बघायची तर ती नीटच असावी --

कार्तिक : उगीच दोनतीन वर्षांसाठी उतावीळपणा नको -- आणि सध्या नीट भागतही असेल त्याचं ! हवं तसं !

रोहिणी : हे आम्हाला मुळीच पटलेलं नाही --

स्वाती : कुठलीही मुलगी अशीतशी नसते --

रोहिणी : सगळ्या योग्यच असतात -- त्यांचीही प्रगती होणारच असते --

चंद्रभान : कारण सांगा नं मग ? केचं ?

रोहिणी : त्याचे भ्रम असतील काही --

स्वाती : आत्ता यांनी सांगितले तेही --

चंद्रभान : बरं, जाऊं दे, मधेच आपलं भांडण नको -- चला --

रोहिणी : स्त्रीलाही आपला साथीदार निवडायचाच असतो -- तिचीही निवडच असते -- हे विसरू नका --

स्वाती : पुरुष हीच फक्त निर्णायक बाजू असं काही नाही --

चंद्रभान : स्त्रीमुक्ती अजून पचनी का पडत नाही याच्यावर मला जरा चिंतन करावं लागेल -- मी फक्त

केबद्दल विचारलं होतं ! -- चला -- ( जातात. )

चंद्रभान : ( पुन्हा प्रवेशून -- ) केनं पाहिलं की तो एका उघड्या दरवाज्यासमोर उभा आहे ! आता त्याच्या तनमनाच्या सगळ्या शक्ती स्वातंत्र्याची चव मिळणार म्हणून आसुसून एकवटल्यायत. आता त्याची पावलं पायऱ्यांवर आहेत. थांब ! नको ! थांब, थांब ! आभार मान त्यांचे के, शेकहँड कर त्यांच्याशी -- त्या सगळ्यांशी -- छान ! -- अरे, पुन्हा तुला त्यांची गरज पडू शकते -- पुन्हा तुला तिकडे जायला लागू शकेल -- जा आता ! -- पायऱ्यांवरून स्वत:ला भिरकावून दे -- अरे वा ! -- काय उमदेपणानं पावलं टाकतोयस तू -- घरंगळतोयस जणू पायऱ्यांवरून -- तू किती तंदुरुस्त आहेस याचं तुझं तुलाच आश्चर्य वाटतंय ! -- की तुझं शरीर एका मोठ्या कष्टमय काळाची तयारी करतंय ? तुझ्या सुनावणीच्या काळाची ? -- आपला नायक सहजासहजी ढेपाळणारा नाहीय. छे ! तो खूप दणकट आहे ! केस नीटनेटके कर के, कंगवा फिरव, जुन्या सवयींपैकी ही एक आहे तुझी -- जाणार नाही !

आवाज : बिचाऱ्या जयेशला प्रवासात उलट्या होतील असं वाटतंय --

आवाज : कल्पना करा की रौद्र समुद्रात तो एका जहाजात आहे – डरकाळ्या फोडत लाटा त्याच्या अंगावर येऊन फुटताहेत आणि त्याला जहाजाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत आधारहीन अवस्थेत उडवताहेत -- मार्गदर्शकाशिवाय असलेलं आणि सुकाणूही नसलेलं ते जहाज कोर्टाच्या अनेक ग्राहकांना उचलतंय, पाडतंय आणि लाटांमध्ये भिरकावतंय --

आवाज : तुझे वडील याच्यावर काय म्हणाले असते के ?

के : ते तर कधीच वारले --

आवाज : अरे, तुला फक्त वाटतंय तसं -- फक्त तुलाच --

वडील : ( आवाज -- ) जयेश, अरे जयेश, काय करून बसलास हे ? माझा आवाज येतोय का ऐकू ?

के : बाबा ! बाबा, खरंच तुम्हीच आहात ?

वडील : तुला ओळखू आलंय ! अरे, एका फौजदारी गुन्ह्याचा फास तुझ्या गळ्याभोवती आवळला जात असताना तू असा शांत कसा काय राहू शकतोस ?

के : जेवढं शांत राहता येईल तेवढं बरं !

वडील : पण काय, केलंयस तरी काय तू ?

के : मला माहीत नाही ! ही काही नेहमीसारखी एखाद्या फौजदारी कोर्टातली केस नाही --

वडील : वाईट आहे हे !

के : का ?

वडील : वाईटच आहे ! घटना काही अचानक घडत नाहीत -- त्यांच्या पूर्वसूचना मिळत असतात -- चेहरा किती पांढराफटक पडलाय तुझा ! तू आता घरी जा आणि विश्रांती घे. तू खूप अशक्त आहेस. येणाऱ्या सुनावणीसाठी तुझी सगळी शक्ती एकवटून तयार राहा --

के : पण बहुतेक मला ते जाऊच देणार नाहीत --

वडील : ते म्हणजे कोण ?

के : माहीत असतं तर बरं झालं असतं --

वडील : जयेश, खूप बदललायस बरं का तू -- तुझा मेंदू तुला साथ देत नाहीय -- असं वागलास तर घालवशील तू केस तुझी -- तुझी ही बेफिकिरी बघून मलाच वेड लागायची पाळी आलीय --

के : असल्या भावनिक प्रक्षोभाचा काही उपयोग नाही -- त्यानं काय साध्य होणार ? -- तुमच्या शब्दाला

मी किती मान देतो ते तुम्हाला माहीत आहे -- माझी ही केस लढवण्यासाठी मला जे जे करणं शक्य असेल ते ते सगळं मी करीन ! पण, माझ्या स्वत:च्या पद्धतीनं --

वडील : तू जर खरंच लढायला तयार असशील तर मग माझी कदाचित तुला मदत होईल -- पहिली गोष्ट म्हणजे आधी तुला एका वकिलाची गरज आहे -- हळदणकर वकिलांकडे जा -- तो माझा शाळेतला वर्गमित्र -- तो फक्त गरिबांचा वकील आहे बरं का, पण फारच चांगला वकील आहे -- आपली इज्जत घालवू नकोस -- माझी आठवण ठेव जयेश, माझा आशीर्वाद आहे तुला --

के : बरं बाबा ! पण, एक लक्षात घ्या, तुम्ही समोर असलात की माझा आत्मविश्वासच जातो आणि त्या जागी फक्त एक अमर्याद अशी अपराधीपणाची भावना येते -- बघा, अपराधी वाटायला सुरुवातच झाली मला -- पण कशाबद्दल ... म्हणाल ... तर ... खरंच मला माहिती नाही ...

चंद्रभान व इतर : कसली केस आणि कसलं काय ?
डोक्यात गोंधळ, फाटक्यात पाय !

रोहिणी : आता आलं जवळ --

स्वाती : जखमा आणि वळ --

अश्विन : बचेंगे तो और भी लडेंगे

कार्तिक : सच क्या और कौनसी सोंगे ? ...

( ते जातात. रंगमंचावर आणि प्रेक्षागृहात प्रकाश येतो. के. एकटाच बसलेला. मग उठून निघून जातो ... रंगमंच रिकामा ... रंगमंचावरचा प्रकाश जातो ... )

**-- अंक पहिला समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

चंद्रभान : आणि आता सुरू होतोय या केसचा महत्त्वाचा प्रवास !

अश्विन : असा कोणता आरोप असेल हा ?

कार्तिक : माणसासारखा नॉर्मल माणूस !

रोहिणी : न जाणो, त्याच्या जगण्याच्या पद्धतीबद्दल काही असेल.

स्वाती : हा नेहमीसारखा रूटीन फौजदारी खटला तर नाहीच आहे.

चंद्रभान : अति विचार करणं ?

अश्विन : संवेदनशील असणं ?

कार्तिक : की लैंगिक भावनेनं पछाडलेलं असणं ?

रोहिणी : की जगण्याचा हेतूच विचारणं ?

स्वाती : की स्वत:चाच कंटाळा येणं ?

चंद्रभान : की थोडंफार महत्त्वाकांक्षी असणं ?

चौघे : माहीत नाही ! माहीत नाही !

चंद्रभान : असे बरेच असतील ? की थोडेच असतील ?

चौघे : माहीत नाही ! माहीत नाही !
पण - हे - सवयीतलं - नसेल - हे - मात्र - नक्की !
( जातात. धाडधाड दार वाजवल्याचे तीन मोठे आवाज येतात. )

के : दार उघडा दार -- कुणी आहे का ? -- ( लीना येते. मधे दार. ते समोरासमोर. )

लीना : कोण आहात तुम्ही ?

के : मी जयेश के. केशव केंचा मुलगा. त्यांनीच मला पाठवलंय. हळदणकर वकिलांना भेटायचंय --

लीना : एक तर हळदणकर आजारी आहेत, त्यात आता आठ वाजलेले आहेत. त्यांची भेट घ्यायची ही वेळच नाही. ( स्वत:बद्दलच -- ) दाराच्या ग्रिलच्या मागे माझे दोन काळेभोर डोळे त्याला दिसले आणि लगेच दिसेनासे झाले.

के : केनं स्वत:ला खात्री दिली की खरंच त्यानं असे दोन डोळे बघितले -- कदाचित परक्या लोकांना घाबरणारी एखादी नवी कामवाली असेल --

लीना : पुन्हा ते डोळे दिसले पण आता ते जरा उदास दिसले -- भ्रमच तर नसेल हा ?

के : अहो, कृपया दार उघडा -- हळदणकरांना भेटायची शिफारसच आहे माझ्याकडे --

हळदणकर : लीना, कोण आहे ?

के : मी, तुमचे जुने मित्र केशव के यांचा मुलगा आहे. त्यांनीच मला तुमच्याकडे पाठवलंय --

हळ. : अरे हो, केशव ! ये, ये, आत ये ! ( लीना हाताने दार उघडल्याचा अभिनय करते. तिच्या त्या कृतीतूनच एक नृत्य सुरू होते. लीना आणि कोरस.
‘‘ या हो या
आत या
या हो या
आत या ‘‘ असे म्हणत नृत्य. नंतर कोरसमधलेच हळदणकरांचे अशील आणि सहाय्यक बनतात. हळदणकरांच्या बोलण्याला पूरक हालचाली करतात -- ) केशव स्वत: नाही आला. तुला पाठवलं त्यानं. ठीक आहे, माझी विचारपूस करायला पाठवलं असेल, नाही का ? खरंच, हा त्याचा चांगुलपणा आहे -- मोठाच -- ठीक आहे, मग विचार ना, माझं कसं काय चाललंय ते --

के : कसे काय आहात तुम्ही ?

हळ. : मुळीच विचारू नकोस. माझी अवस्था भयंकर आहे -- तब्बेत अधिकाधिक बिघडतच चाललीय -- श्वास घ्यायला त्रास होतोय -- झोप लागत नाही -- आणि दिवसेंदिवस अशक्तपणा वाढतोय --

के : बाप रे -- काळजीच घेतली पाहिजे म्हणजे --

लीना : बघताय ना, कामाचं काही बोलायला त्यांची तब्बेत साथ देणंच शक्य नाही --

हळ. : अच्छा ! म्हणजे आजाऱ्याला भेटायला येणं नाहीच आहे हे -- कामासाठी आलायस तू ! -- हरकत नाही -- लीना, तो काही माझी तब्बेत बघायला आलेला दिसत नाहीय --

कोरस : मुळीच नाही ! मुळीच नाही !

हळ. : कशाचीतरी गरज पडल्यावर येणाऱ्यांतलाच दिसतोय तो ! -- ठीकाय -- जग असंच असतं म्हणा ! -- तर लीना, तू जा, आता आम्हाला बोलू दे -- लीना माझी काळजी घेते -- चांगली आहे ती ! --

लीना : मी चांगली आहे ?

हळ. : म्हणजे काय ? आहेसच !

लीना : आणि माझा चेहरा एखाद्या बाहुलीसारखा गोल आहे ना ?

हळ. : गाल फिकट आणि हनुवटी गोलसर बनावटीची --

लीना : आता माझे डोळे थोडे बाहेर येणारे आहेत म्हणा !

हळ. : छे, छे ! मुळीच नाही ! --

के : ( लीनाला -- ) आता जरा आम्हाला बोलू द्या ना --

हळ. : जा आता लीना -- ठीक आहे -- हरकत नाही -- ( लीना मागे जाते, पण पाहते आहे. ) आता तुझ्याशी मोकळेपणानं बोलायचं झालं तर तू कशासाठी आलायस ते मला माहीत आहे. तुझी केस इतकी प्रचंड इंटरेस्टिंग आहे की ती नाकारताच येणार नाही. मी स्वीकारलं हे आव्हान !

के : मला काही कळतच नाहीय -- तुम्हाला कसं काय माहीत ?

हळ. : माझा व्यवसायच तसा आहे ! माझ्या सहकाऱ्यांचे कान फिरतच असतात ना इकडंतिकडं -- केसेसची चर्चा होणं, केस बाहेर फुटणं, एखादा शब्द हवेतून कानावर येणं -- परिचित आवाज, कोर्टातले मित्र, चहा पितानाच्या गप्पा -- सगळं असतं -- बावचळू नकोस असा -- आत्ताच कोर्टातले एकजण मला भेटायला आलेले आहेत --

के : कुठं ? इथं इतकं उदासवाणं, अंधारं वातावरण आहे की काही दिसतच नाहीय --

हळ. : शू ऽऽ ! त्यांना डिस्टर्ब करू नकोस -- त्यांना असा अंधारच आवडतो -- आमच्यावर कामाचं केवढं प्रचंड ओझं असतं हे तुला माहीतच नाही, त्याला तू काय करणार ? -- नुसतं एवढंच नाही -- ही संपूर्ण न्यायव्यवस्थाच आतून-बाहेरून दुरुस्त व्हायला हवीय -- ... बरं, आपली बाजू मांडण्यासाठी तुझं पहिलं निवेदन तयार असायला हवं -- ते अत्यंत महत्त्वाचं आहे -- कारण या पहिल्या निवेदनावरच बहुधा केसचं पूर्ण भवितव्य ठरतं -- पण, दुर्दैवानं, तुला एक माहिती देणं माझं कर्तव्यच आहे -- ती माहिती ही की, हे पहिलं निवेदन ते वाचतीलच असं नाही -- ते नुसतंच फाईल करून टाकतात ते --

के : का ? असं का करतात ते ?

हळ. : आरोपीचं निरीक्षण करणं आणि त्याच्याशी होणारी प्रश्नोत्तरं ही कुठल्याही कागदाच्या कपट्यांपेक्षा जास्त महत्त्वाची असतात. हे असलं तरी, फाईलिंग क्लार्कला काम मिळावं हेही असतंच ना ! ते तुझ्याबद्दलचं सगळं लिहून घेतात -- अगदी तुझ्या रोजच्या जगण्यातलं -- मिनिट न् मिनिट -- तुझ्या अत्यंत गुप्त सवयी -- आहेत काही वाईट सवयी ?

कोरस : नाहीत ! नाहीत !

हळ. : छान ! काही वेळी काय होतं की रोजच्या रोज जो काही लेखी पुरावा जमा होत असतो त्याच्या वजनदारपणानंही गोंधळ निर्माण होतो. मग पहिल्या निवेदनाचं राहूनच जातं. अरे, लेजर क्लार्कवर कामाचं नुसतं अवाजवी ओझं आहे, एवढ्यानंही ते निवेदन हरवतं ! असं बऱ्याच वेळी होतं. मग मूळ हेतूच दृष्टीआड होतो. यामुळं मग बचावपक्षाच्या वकिलाचं काम खरोखरच अवघड होतं. आणि एक लक्षात ठेव, ते फक्त बचाव पाहतात -- या कोर्टाच्या कुठल्याही मॅजिस्ट्रेटच्या लेखी, बचावाचा वकील ही गोष्ट नगण्य असते. त्याची नोंदही नसते. त्यामुळं, अर्थातच, वकिली पेशावर त्याचा एक उपमर्दात्मक परिणाम होतो.

के : लोक हे असं सहन करणार नाहीत.

हळ. : सुनावणीचं कामकाज हे सार्वजनिक कधीच नसतं. असायला हरकत नाही, पण नसतं. जर ते न्यायासनाला आवश्यक वाटलं तरच ते तसं होईल -- पण तसं कधी त्यांना वाटतच नाही.

के : पण मला अजून माझ्यावर आरोप काय आहे तेच माहिती नाही.

हळ. : अंदाज, अदमास, तर्क ! -- हे जमलं पाहिजे. तुझी जी प्रश्नोत्तरं होतील त्यावरनं हे साधारण ओळखता आलं पाहिजे. काय असतं, समोर जे संबंधित तपशील असतात ते सारखे चाळत राह्यचं -- विचाराच्या चाळणीतनं बरं का -- किंवा थोडंफार चवळत राह्यचं -- असं करता करता मग त्यातून आरोपासारखं काहीतरी हाती लागू शकतं. किंवा तयार होतं म्हणा. मग आपल्याला जरा जास्त पक्कं आणि पटण्यासारखं निवेदन तयार करता येऊ शकतं. तर ते तुझ्यावर आहे. तू अतिशय काळजीपूर्वक शब्द न् शब्द ऐकला पाहिजेस -- अरे, एखादा शब्दसुद्धा या संपूर्ण भानगडीची गुरुकिल्ली ठरू शकतो. काळजी नको करूस. हे सगळं वरवर दिसतं तितकं निराशाजनक नाहीय. अरे, तुझ्या या केसपेक्षा फारच वाईट भवितव्य असलेल्या केसेस मी एकतर्फी हातोहात जिंकलेल्या आहेत. तुझ्यापेक्षा कमी अवघड केसेस पण भवितव्यच नसलेल्या ! मी त्यांचा असा चुराडा करत गेलो की शेवटी पाया पडत त्यांना निकाल द्यावा लागला ! माझ्या डेस्कमध्ये अशा केसेसचा ढीग आहे. दुर्दैवानं गुप्ततेच्या तत्त्वामुळं मी ते सगळं तुला दाखवू शकत नाही.

के : म्हणजे याचा अर्थ, आपल्यावर आरोप काय आहे आणि तो कुणी केला आहे हे आपल्याला कळू शकत नाही. बचावाकडं न्यायाधीश लक्षच देत नाहीत. आणि जे काय आरोप असतील ते आपल्याला पाहताही येत नाहीत !

हळ. : आता याच्यावर काही मतभेद आहेत. हे जे बचावाचे वकील असतात ना त्यांच्याकडे कोर्ट, क्षुद्र गोंधळ निर्माण करणारे या दृष्टीनं पाहतं. वकिलांना फार तिरस्करणीय वागणूक मिळते. तू पुन्हा तिकडे जाशील तेव्हा नुसती तू वकिलांच्या खोलीकडे नजर टाक. मानवता तर तिथं स्वत:ला चेचूनच घेते, ते सोडूनच दे. अत्यंत कोंदट खोली. एक अगदी छोटी खिडकी आहे आणि ती इतकी उंचावर आहे की, जरा मोकळी, ताजी हवा नाकानं घ्यावी म्हणून डोकं बाहेर काढायचं असेल तर वकिलाला आपल्या सहकाऱ्याच्या खांद्यावर उभं राहावं लागतं ! आणि डोकं बाहेर काढलं रे काढलं की तोंडावर भपकन चिमणीचा धूर येतो आणि गुदमरायला होतं आणि तोंड काळं होतं. तिथल्या जमिनीवर जो खड्डा आहे, त्याला ठेचकाळून जर एखाद्याचा पाय आत गेला तर तो जमीन भेदून खालच्या मजल्यावरच्या लोकांना दिसू शकतो ! या बाबतीत अधिकाऱ्यांकडे हजारदा तक्रारी केल्या तरी कुणी लक्ष देत नाही आणि आमचं आम्हाला ते दुरुस्त करायची परवानगी नाही !

के : मला असं विचारायचं होतं की माझा बचाव मीच लिहिला तर जास्त चांगलं होईल का ? म्हणजे असं की एकूण माझ्या आयुष्याचा लेखाजोखा घ्यायचा. त्यात मला कोणकोणते महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागले ते तर सांगायचंच पण शिवाय ते निर्णय मी का घेतले याची स्पष्टीकरणंही द्यायची आणि शिवाय आज मला ते मान्य आहेत की नाहीत तेही सांगायचं ! एवढं पाहिल्यावर कोर्टाच्या लक्षातच येईल की हा काही बाबा एखादा गुन्हा करू शकेल असा माणूस नाही !

हळ. : माझी गरज लागणारच रे तुला, माझी गरज लागणारच -- ( इथे ते पांघरुणातल्या युरीनपॉटमध्ये लघवी करतात -- त्यांचा एक ग्राहक तो पॉट घेऊन जातो. ) सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोर्टातल्या बड्या अधिकाऱ्यांशी संबंध असणं ! त्याच्यावरच तर बचावाचा दर्जा आणि मूल्य ठरतं !

के : हा तर भ्रष्टाचार झाला ! माझा निवाडा, वस्तुस्थिती मांडणाऱ्या माझ्या बचावावरच व्हायला पाहिजे, मग तो काही का असेना ! असं संबंधांवर त्याचं यशापयश अवलंबून असता कामा नये !

हळ. : अनुभवानंच तुझ्या लक्षात येईल. हे इथं जे आमचे मित्र बसलेत त्यांचा अपवाद सोड पण बाकीच्यांचं

काय ? कोर्टातल्या सगळ्याच ग्रेडच्या लोकांनी लाचखाऊपणा आणि भ्रष्टाचार यांचा न्यायसंस्थेला वेढाच घातलाय. त्यामुळं, न्यायाची जी एक कडक विभागवार रचना असते तिलाच तडा गेलाय. यामुळंच मग एखादा छोटा वकील लाच देऊन आपला शिरकाव करून घेतो. तो मग बाजारगप्पा लक्षपूर्वक ऐकणे, कागदपत्रे चोरणे असले प्रकार करत राहतो. आता असल्या पद्धतींना तात्पुरतं यश मिळूही शकतं. इतरांपेक्षा जास्त अशील खेचले जाऊ शकतात. पण त्याचा केसच्या प्रगतीला उपयोग काय ? शून्य ! ... अरे जयेश के, तुझ्या वकीलनिवडीच्या बाबतीत तू इतका भाग्यवान आहेस ! फक्त एखाद्दुसऱ्या वकिलाचेच असे माझ्यासारखे वरपर्यंत हात असतील. बघ ना आजूबाजूला -- कोर्टाचे अधिकारी स्वत:हून मला भेटायला येतात. मला माहिती देतात आणि माझ्याशी अतिशय मोकळेपणानं बोलतात ! आणि पुढं ऐकायचंय ? निव्वळ माझ्या विनंतीमुळं ते कधीकधी एक नवा दृष्टिकोण स्वीकारायलाही तयार होतात ! आता या न्यायाच्या रचनेत गुप्तता इतकी आहे की, तीत गळती असते ते सोड, वादी लोकांनाच त्यांची केस नीट चालवणं अशक्य होतं. बरं, लोकांपासून ते खूप दूर असल्यानं त्यांच्या समस्या लोकांना कळत नाहीत. अरे, ते कुणाची केस चालवतायत हे बघायलाही त्यांना फुरसत नसते. रात्रंदिवस, सदोदित त्यांना ही न्यायसंस्थेची रचनाच उलगडायचा प्रयत्न करत बसावं लागतं. वादी बाजूचे लोक सदोदित वैतागलेलेच असतात. त्यामुळंच मग ते माझ्याकडे येतात. कुणाकडे ? माझ्याकडे ! मी ! हळदणकर वकील ! कशाला येतात ? -- सल्ला मागायला ! आता तशी एक आख्यायिकाही आहे की ... एक मिनिट -- काय चालला होता विषय आपला ? ( हळदणकरांची लिंक तुटते. तेवढ्यात लीना येते आणि केजवळ उभी राहते. इतर पात्रे मागे अदृश्य होतात. )

लीना : मला तुमच्याशी बोलायचं होतं --

के : मलाही -- तुमच्याशी --

लीना : त्यांचा विचार सोडा आता -- एक चेंज म्हणून आता माझा विचार करा -- मी तुम्हाला आवडतेय की नाही हीच जरा धाकधुक वाटत होती --

के : अहो, आवडतेय काय, तुमच्यावरून डोळे हलत नव्हते माझे !

लीना : माझ्याही आलं ते लक्षात ! तरीपण तुम्ही मला किती वाट पाहायला लावलीत ! तुम्ही मला एकेरीत लीना म्हणालात तरी चालेल !

के : हे तर खूपच छान !

लीना : मी खरंच आवडले तुम्हाला ?

के : ‘ आवडले ‘ हा नसता शब्द निवडला मी ! त्याच्याहून जास्त अर्थाचा --

लीना : कोणता ? सांगा ना !

के : असं बघ --

लीना : सांगा ना लौकर, तुम्ही म्हणजे असे आहात ना ! सांगा मला ! सांगा ना ! मोठ्यांदा !

के : हे असं आलं ना की, मी थोडा बुजरा आहे --

लीना : बुजूबिजू नका जयेश ! आपण एकत्र मजा करू -- आता बुजरेपणात वेळ घालवू नका -- आणि तुम्ही ना तुमच्या केसचा फारच खोलवर विचार करत बसता हो -- त्यातच गढलेले राहता --

के : तुला कुणी सांगितलं ?

लीना : मला नावं नका विचारू. पण, मी तुम्हाला थोडा सल्ला देऊ शकते. कबूल करून टाका जयेश, नाहीतर यांच्यापासून तुमची सुटकाच होणार नाही --

| | |
|---|---|
| हळ. : | हं, आता आली लक्षात माझ्या ती आख्यायिका ... अरे ... मरो ... गेलं पुन्हा ते ... |
| लीना : | कोर्टात काय चालतं याची मला बरीचशी माहिती आहे. माझी मदत होऊ शकते तुम्हाला, बरं का -- |
| के : | च्यायला, माझ्याकडे स्त्री मददगारांचीच एवढी भरती का होतेय ?! आधी मिस बाबर, नंतर ती धोबीण आणि आता ही ! ? ही काय, माझी भानगड तरी काय असेल ? |
| लीना : | तुम्हाला एखादी प्रेयसी आहे का ? |
| के : | होय आणि नाही. माझ्याकडे एक फोटो आहे -- ( दाखवतो. ) |
| लीना : | ( फोटोकडे बघत -- ) मला नाही आवडली पण ती -- ती जरा थोराड आणि बेडौल वाटते. पण तुमच्याशी ती कदाचित अतिशय मार्दवपूर्ण आणि प्रेमळपणे वागत असेल -- पण तुमच्यासाठी पूर्णपणे स्वत:च्या जीवित्वाचा त्याग करायला ती तयार होईल ? |
| के : | तितकी मार्दवपूर्ण नाहीय ती ! |
| लीना : | म्हणजे तशी ती तुमची प्रेयसी नाहीच आहे -- |
| के : | हं, बरोबर आहे ! |
| लीना : | असेलही म्हणा, पण समजा तिच्याऐवजी मी मिळाले तुम्हाला तर आठवण येईल का तिची ? |
| के : | अर्थात, येईलच ! माझ्या संबंधात ती तुझ्यापेक्षा एका कारणानं वरचढ ठरते -- |
| लीना : | कोणत्या ? |
| के : | माझ्या या केसबद्दल तिला काहीही माहिती नाही -- आणि झाली समजा तिला ही माहिती तरी, तिचा स्वभाव असा आहे की ती त्यावर जास्त डोकं चालवत बसणार नाही -- |
| लीना : | ह्यॅ ! त्यात काय विशेष ! एवढ्यामुळं मी मागं पडणं शक्यच नाही. मला सांगा, तिच्यात काही शारीरिक दोष आहे का ? लपवता न येणारा ? |
| के : | शारीरिक दोष ? |
| लीना : | असा ! ( ती तिचा उजवा हात दाखवते. अनामिका आणि मधले बोट यांना जोडणारे असे बदकाच्या पायासारखे तिथे कातडे असते. ) |
| के : | अरे ! दोन बोटं जोडणारं कातडं ! बदकाच्या पायाचा हा एक छोटासा पंजाच दिसतोय ! काय चमत्कार आहे ! |
| लीना : | त्यामुळं, तुमची केस खटकणं तर जाऊच द्या, उलट, मला तुमचं आकर्षण आणि महत्त्वच वाटतं ! त्यामुळं माझी अर्पणक्षमताही जास्त असणार आहे ! |
| के : | कोण जाणे -- ( बोटजोडाकडे पाहतोय -- ) |
| लीना : | तर सांगा बरं, मी तुम्हाला मिळाले तर येईल तिची आठवण ? सांगा ना, खरं -- |
| के : | होय -- |
| लीना : | येईल आठवण ? अं ? अं ? ( ती अधिकाधिक केच्या जवळ येते. स्पर्श करते. ) |
| के : | अरे बाप रे, तू जवळजवळ माझ्या मिठीतच आलीयस ! |
| चंद्रभान व इतर : ( कोरस ) | केला आता तिचा अगदी भरपूर स्पर्श होतोय आणि तो टक लावून तिच्या भरदार काळ्याभोर केसांकडे पाहतोय -- ती आता तिचे दोन्ही हात त्याच्या मानेभोवती टाकते आणि त्याच्या डोक्याच्या मागच्या भागाचं चुंबन घेतेय ... होय ... होय ... चावतेय ती आता त्याला ... मानेवर ... हं !!! मिरपुडीसारखा तिला एक उत्तेजक गंध आहे. के त्याचे हात तिच्याभोवती नेतोय आणि ती चाललीय हळूच निसटत जमिनीकडे ... अस्फुट चीत्कारासह ... तो म्हणतोय ... |
| हळ. : | हं ! आलं आता लक्षात ! तर अशा एका बड्या अधिकाऱ्यानं एकामागोमाग एक असे बरेच वकील |

जिन्याच्या पायऱ्यांवरनं खाली भिरकावून दिले. त्यामुळं मग सगळे वकील एकत्र जमले आणि विचार करून त्यांनी एक निर्णय घेतला. त्यांना त्या अधिकाऱ्याशी शत्रुत्व तर करायचं नव्हतं, पण निवेदनं तर सादर करायची होती. त्यामुळं त्यांच्यात एकमतच झालं की त्या म्हाताऱ्या अधिकाऱ्याला नुसतं दमवून टाकायचं ! ते सारखे पायऱ्यांवरून एकामागोमाग एक असे वर जायचे, तो त्यांना खाली फेकत राह्यचा आणि त्यांचे सहकारी त्यांना झेलत राह्यचे ... एक तासाभरानंतर त्या म्हाताऱ्याचा प्रतिकार संपला. तो पुरता दमून गेला. तो अत्यंत दमला, नव्हे, प्रचंड दमला. दमून मेलाच तो ! मग सगळे वकील आत आले आणि त्यांनी त्यांची निवेदनं सादर केली ! यालाच आपण कायद्यातला धूर्तपणा म्हणू शकतो. ( ते हे बोलत असताना कोरसमधली नटमंडळी या गोष्टीतल्याप्रमाणे, मूक अभिनय करत राहतात. )

लीना : ते बोलावताहेत मला. ही दाराची किल्ली ! तुम्हाला यायचं असेल तेव्हा या. आता तुम्ही माझे झाला आहात ! ...

**प्रश्नोत्तरकर्ते**

( मागच्याच दृश्यामधून हे ज्युरींचे दृश्य येते. त्यांची तोंडे सारखी केच्या जवळ ये-जा करत त्याला घेरत राहतात. )

आवाज १ : जयेश, असं कसं काय केलंस तू ? तुझी केस नीट चालायला सुरुवात व्हायच्या बेतात असतानाच तू सगळी वाट लावून टाकलीस !

के : असं झालं ?

आवाज २ : तर काय ! चाललंय काय तुझं तर एका फालतू पोरीबरोबर आडोशाला जाणं ! तासंतास ! आणि ती -- नि:संशय -- त्या वकिलाची रखेली आहे !

के : चांगली वाटली पण ती --

आवाज ३ : काही निमित्त सांगणं नाही -- काही लपवणं नाही -- सरळ जातो पळून !

हळ. : आणि मी होतो हं तिथं बसलेला ! एवढ्या ओळखीपाळखी असलेला ! आता यानं खरं तर चांगलं वागून माझं मन जिंकून घ्यायला हवं होतं --

आवाज ४ : तो प्रयत्नच करत नाही -- मला वाटतं, त्याला त्याची ट्रायल लढायचीच नाहीय --

के : मी अक्षरश: या ट्रायलनं खतम होऊन गेलोय -- मला विसरून जायचंय ते सगळं --

हळ. : बघा ! विसरायचंय त्याला ! ही अशी गोष्ट ! जी विसरण्याचा परिणाम असू शकतो त्याचा मृत्यू !

आवाज ५ : हलगर्जीपणानं --

हळ. : माझा दुरुपयोग ! मी ! हळदणकर वकील ! महत्त्वाचा आणि वट असलेला माणूस ! आणि मुख्य म्हणजे आत्ताच्या स्टेजमध्ये त्याची केस माझ्याच हातात असताना ! आम्ही आपले याला मदत करायच्या विचारात बसलेले ! आणि हा --

क्लार्क : तुम्ही इतका काळ यापासून लांब गेलात की लपवाछपवी शक्यच नव्हती. संभाळून घ्यायलाही मर्यादा असते -- आणि शेवटी आम्हालाही दुर्लक्ष करणं अशक्य झालं --

हळ. : आम्ही वाट पाहात होतो तुझी के !

आवज १ : आणि असं वागून मिळालं काय तुला ? एका खालच्या दर्जाच्या थ्रिलचा एक मजेचा क्षण ! याहून काहीच नाही !

के : काहीतरी मिळालं पण मला !

सगळे : हो, मिळालं, पण काय ?

के : मी एका न्यायाधीशाचं पेंटिंग पाहिलं ! --

सगळे : घ्या ! न्यायाधीशाचं पेंटिंग !

के : ते एका सिंहासनासारख्या आसनावर बसलेले होते -- अत्यंत रुबाबात -- ते अत्यंत शक्तिमान वाटत होते -- आणि करडेही ! -- इतके की असं वाटत होतं की कुठल्याही क्षणी ते ताडकन उभे राहतील आणि एका हिंसक आविर्भावानं शिक्षा सुनावतील ! -- तेच कदाचित माझे न्यायाधीश असू शकतील ! -- मी, एक आरोपी, न्यायाधीशाच्या सिंहासनाकडे जाणाऱ्या पायऱ्यांतल्या सगळ्यांत खालच्या पायरीवर उभा असलेला -- त्या पायऱ्यांवर एक पिवळा, प्रचंड गालिचा पसरलेला आणि वर तिथे ते बसलेले -- उंच -- त्यांच्या न्यायाच्या अंगरख्यात !

चंद्रभान : त्यानं स्वतःच ते चित्र रंगवलेलं होतं -- त्यानं म्हणजे त्या न्यायाधीशानंच ! -- वस्तुतः तो एक स्वैपाकघरातल्या खुर्चीवर बसणारा एक ठेंगणा माणूस आहे --आणि त्याच्या बुडाशी काय असतं तर, जुनं, घोड्याच्या पाठीवर टाकायचं एक ब्लँकेट ! दुमडून जाड केलेलं ! ( लोक हसतात. ते हास्य हळूहळू अतिरेकी वेडापर्यंत जाते ... )

**फायलिंग विभागाच्या शक्तींशी केचा लढा**

( मागच्या दृश्यातली एक व्यक्ती राहते -- तीच हे दृश्य सुरू करते. ती व्यक्ती म्हणजे चंद्रभान. बाकीचे सगळे फायलिंग आणि इतर कारकुनी कामांशी संबंधित आहेत. )

चंद्रभान : हिवाळा आहे. बऱ्यापैकी थंडी आहे. सकाळची वेळ आहे. तरीही के त्याच्या ऑफिसात मरगळून बसलेला आहे. कुणीही त्याला त्रास देऊ नये अशा त्यानं सूचना दिलेल्या आहेत. त्याला अशा अवस्थेत कुणी बघू नये अशीच त्याची इच्छा आहे ... मूठ झाकलेली ठेवायचा प्रयत्न ... कधी ना कधी कुठल्या ना कुठल्या वाईट अवस्थेत प्रत्येकजण असतोच ना ? त्या वेळी आपला कमकुवतपणा कुणाला दिसू नये असं वाटणं साहजिकच आहे ! ..... कामाला लागायच्या ऐवजी त्यानं त्याच्या खुर्चीत आळोखेपिळोखे दिले. मग मान खाली घालून तो निश्चल बसून राहिला. त्याच्या कोर्टकेसचा विचार त्याला सोडतच नव्हता. आपण आपल्या बचावाचा लेख तयार करून कोर्टाला सादर करावा की करू नये यावर त्यानं पुन्हा एकदा विचार केला. त्या संशयास्पद वकिलापेक्षा अशा लेखी बचावाचे फायदे स्पष्टच होते. कारण तो भला वकील या केसमध्ये काय करतोय हेही केला माहिती नव्हतं ! काही का असेना त्या विचारातनं फारसं काही निघालं नाही... हळदणकरांनी त्याला भेटायला बोलावून एक महिना उलटून गेलाय. अर्थात, ते फार काही करू शकणार होते असं नव्हतंच म्हणा ! नुसती सुरुवात म्हणूनही त्यांनी त्याला कोणतेही उलट प्रश्न विचारलेले नव्हते !

के : बरेच प्रश्न विचारायचे होते. ते फार महत्त्वाचं होतं. खरं तर या वकिलाला मी गदगदा हलवायला हवं होतं. त्यानं माझ्यातर्फे लेखी अर्ज करायला हवे होते. रोजच्या रोज या सगळ्या गोष्टींकडे लक्ष द्या म्हणून अधिकाऱ्यांना विनवायला हवं होतं. नुसतं बूड उबवत कोर्टाच्या माळ्यावर बसून हे कसं साध्य होणार होतं ? मी आता माझ्या घरीच रात्री बसून सगळे ड्राफ्ट तयार करीन. रात्री पुरल्या नाहीत तर शिफ्टनं काम करावं लागेल. माझं एकूण आतापर्यंतचं जगणंच सगळं लिहून काढावं लागेल ! प्रत्येक तपशील आठवून, अगदी लहानात लहान कृतीही मांडावी लागेल ! कण न् कण तपासायचा ! आणि मग कोर्टाच्या लक्षात येईल की हा असा एक माणूस समोर उभा आहे की जो स्वतःच्या हक्कांसाठी झगडणारा आहे. आणि मी बँकेत जशी शक्ती वापरतो तशीच इकडंही वापरली तर निकालाबद्दल निर्धास्त राहता येईल ! आणि इथं आपल्याला काहीही साध्य करायचं असेल तर आपल्या मनातनं ‘ घडला असेल बाबा असा एखादा अपराध ‘ ही कल्पनाच हद्दपार करावी लागेल.

नाहीच आहे असला काही अपराध ! ... ( शेवटी कोरस म्हणतो, ‘‘ उद्‌गार चिन्ह ! ‘‘ ) माझा बचाव मीच हाताळला तर जवळजवळ मीच न्यायाधीश होईन ! पण एवढं सगळं निभावून न्यायची शक्ती येईल का माझ्यात ? अगदी परिपूर्ण असा शेवटपर्यंत द्यायचा बचाव ! ... आणि ही वेळ तर आता अशी आहे की मला बँकेसाठी काम करणं गरजेचं आहे -- माझ्या इथल्या ग्राहकांशी बोलणं, प्रश्नोत्तरं करणं आणि माझं आयुष्य सुरक्षित करणं ! आणि हे अशा वेळी की जेव्हा माझी स्वत:ची केस कोर्टाच्या माळ्यावर पुढे पुढे जाते आहे ! आणि तिथले अधिकारी माझ्यावर आरोपांची बरसात करताहेत ! आणि माझ्या इथल्या कामाचं मूल्यमापन करायची वेळ येईल तेव्हा कोण सवलत देईल मला ? माझ्या केसचं विचारात घेऊन ? कधीच नाही आणि कुणीच नाही ! इथलंही सगळं नीटच लागेल ! ( अंधार. ) हळदणकर !

**वकिलाशी पुनर्भेट आणि टाईमपास**

हळ. : बेटा के, प्रगती झालीय, पण म्हणजे काय हे मी बाहेर नाही फोडू शकत बाबा ! ( अंधार. जागा बदलतात. ) तुझी केस आता अशा एका स्टेजला पोचलीय की आता कोर्टाशी संपर्कच तुटतो. इथं आरोपी हा न्यायाधीशाला दिसूही शकत नाही. ( अंधार. पुन्हा जागा बदलतात. ) तर, तू घरी पोचल्यावर तुझ्या केसबद्दलची तुझी सगळी निवेदनं परत आलेली टेबलावर तुला दिसतील. आता या क्षणी त्याचा विशेष संबंध नाही. याचा अर्थ असा नाही की केस हातची गेली ! मुळीच नाही ! ( अंधार. पुन्हा जागा बदलतात. ) आता अत्यंत नम्र राहावं लागेल ! तू एकदम सगळ्या गोष्टींत खूप बदल करायचे ठरवलेस तर तुझा पायाच ढासळून जाईल आणि तू स्वत: नष्टच होण्याचा धोका निर्माण होईल. तर तू, के, वकिलांनाच करू दे त्यांचं काम ! (अंधार. पुन्हा जागा बदलतात. प्रकाश येतो तेव्हा के लीनावर ओणवा. ) लीना, तू अजून थांबलीयस का ? कसा काय वाटतो तुला हा मुलगा ?

लीना : मला त्याची फारशी माहितीच नाही -- ( अंधार. )

**केचा वकिलाला काढून टाकण्याचा निर्णय**

चंद्रभान : खूप विचारांती केनं शेवटी त्याची केस त्याच्या वकिलाकडून काढून घेण्यासाठी मनाची तयारी केली. या निर्णयाला येण्यासाठी त्याला त्याची अतोनात शक्ती वापरावी लागली. पण शेवटी त्याचा निर्णय पक्का झाला !

**बाळाराम**

( एक विचित्र बुटका माणूस अंधारातून झटकन उडी मारतो आणि केच्या पाठुंगळी बसतो. )

बाळाराम : तू माझा विश्वासघात करणार नाहीस असं वचन दे --

के : मी खबऱ्या थोडाच आहे ?

बाळा. : नकोच ते, न सांगणंच बरं --

के : मला सांगण्यात कसलाही धोका नाही.

बाळा : असं ?

के : होय --

बाळा. : मी त्या वकिलाचा सच्चा अशील आहे -- मी इथेच राहतो -- माझ्यासाठी इथे एक छोटी खोलीही आहे --

के : मग, लीना तुझी घरवाली असेल ?

बाळा. : बाप रे ! नाही बाबा ! कसला विचार चाललाय तुझा ?

के : काय, नाव काय तुझं ?

बाळा. : बाळाराम. मी एक धान्यव्यापारी आहे. मी तुला काही सांगणार आहे, पण तुझ्यावरही माझा वचक राहिला पाहिजे. त्यासाठी तुझं एखादं गुपित मला माहीत पाहिजे. ते आधी सांग --

के : ठीक आहे, मी तयार आहे ! आता उतरशील का माझ्या पाठीवरून ?

बाळा. : हं, ठीक आहे. (तो हळूच उतरतो. ) गेली कित्येक वर्षं मी माझी केस बोर्डावर यायची वाट पाहतोय. त्यासाठी या हळदणकराव्यतिरिक्त मी आणखी पाच वकील घेतलेत --

के : पाच ?

बाळा. : आणि सहाव्याशी माझी बोलणी चालू आहेत, सांगू नकोस कुणाला --

के : म्हणजे हे जास्तीचे वकील घेतल्यामुळं नुकसान करेल तो तुझं ?

बाळा. : परवानगीच नाहीय असं करायला. त्यातही परत मागच्या गल्लीतले वकील ! ते तर मुळीच चालत नाहीत -- आणि माझे तेच आहेत !

के : पण, एवढे वकील कशाला लागतात तुला ?

बाळा. : मला माझी केस हरायची नाहीय, लक्षात घे -- माझा सगळा पैसा मी याच्यावर ओतलाय. मी माझा सगळा धंदा विकून टाकला ! एका बिल्डिंगचा संपूर्ण खालचा मजला माझ्याकडे होता ! मी याच्यावरच सर्व शक्तीनिशी चढाई करत राहतो, त्यामुळं, मग दुसरं काही करायला माझ्यात शक्तीच उरत नाही -- कशी उरेल ? तुला काय वाटतं ? उरेल ? केसचं काम सगळं थांबून राहणं, अनेक गोष्टींवर लक्ष ठेवावं लागणं, यांतनं दुसरं काही करायला वेळ तरी कुठे मिळतो ? जवळजवळ सततच मला कोर्टात थांबावं लागतं ! आणि तुलाही माहिती आहे, तिथली हवा कशी आहे ते !

के : काय, करतोस काय तू तिथं ?

बाळा. : काही नाही. नुसती वाट पाहतो. किती जिकिरीचं काम ! तिथं मी एकदा तुलाही पाहिलं.

के : मला ? काय योगायोग आहे ! मी त्या चौकातून गेलो तेव्हा तू होतास तिथे ?

बाळा. : तसं योगायोग वगैरे काही नाही, मी जवळजवळ रोजच असतो तिथे. तू एक आरोपी आहेस हे आम्हाला माहीत होतं. आरोपी लोक हे बहुधा थकलेले, अस्वस्थ आणि घाबरलेले असतात. आणि अंधश्रद्धांचा आधार घेणारे. बेलिफ म्हणाला की तुझ्या ओठांवर त्याला तुझ्या अपराधाचं चिन्ह दिसलं ! ( के उदासपणे हसतो. ) अगदीच मूर्खपणाचं वाटतं ना हे ?

के : माझ्या ओठांवर ? असं खास वैशिष्ट्यपूर्ण काय आहे माझ्या ओठांत ? वाटतं असं काही ?

बाळा : मुळीच नाही. पण, अंधश्रद्धा ही एक परंपरा आहे ! या न्यायव्यवस्थेला टक्कर द्यायला समाजाला तिचा खूप उपयोग होतो. त्यामुळं काहीतरी करायलाही मिळतं ! --

के : खुळचटपणा आहे ! नुसतं वाट पाहात इकडं तिकडं रेंगाळत राह्यचं ! त्यापेक्षा, त्यांनी, खरं तर, एखाद्या सामाजिक कृतीचा आराखडा समोर ठेवला पाहिजे.

बाळा. : काहीही उपयोग होणार नाही ! तुला काय माहिती आहे ? तू नवीन आहेस इथं. या बाबतीत अजून तरुणही आहेस. तुला वाटत असेल की तुला काहीही त्रास न होता तुझ्या केसचा निपटारा होऊन जाईल, मलाही पूर्वी तसंच वाटायचं. पण, हे पूर्ण चुकीचं ठरेल. मला आठवतं, माझीही केस तेव्हा तुझ्यासारखीच नवखी, तरुण होती, तुझ्यासारखाच मलाही एकच वकील होता. मी पुरावे गोळा करायचो, प्रत्येक वेळी प्रश्नोत्तरांना हजर राह्यचो, नोट्स काढायचो, अनेक प्रकारची निवेदनं सादर

करायचो, माझ्या हिशोबवह्या दाखवायचो आणि छोट्या छोट्या माहितीच्या तुकड्यांसाठी एकदा पुढे, एकदा मागे असा पळायचो ! माझ्या केसशी जुळणाऱ्या भूतकाळातल्या सगळ्या केसेसचं पूर्ण विश्लेषण माझ्याकडे असायचं ! आणि एवढं सगळं करूनही माझी एक इंचसुद्धा प्रगती झाली नाही !

के : प्रगती म्ह्णजे काय व्हायला हवं होतं ?

बाळा. : प्रश्न चांगला आहे, पण मला माहिती नाही. मी एक व्यावसायिक आहे. मला असे समोर दिसणारे रिझल्ट्स हवे होते. पण काही नाही ! तेच ते जुनाट प्रश्न, तीच ती उत्तरं ! शेवटी मी तक्रार केली हळदणकरांकडे ! म्हाणालो त्यांना, ‘‘ मला तारीख द्या म्हणून मी तुमच्याकडे विनवणी केली, माझ्या सुनावणीचा दिवस ठरवा म्हणून सांगितलं -- पण काहीच होत नाहीय -- मी मग सरळ दुसरे वकील आणीन, सांगून ठेवतोय ! -- ‘‘

हळ. : ( जणू जुन्या काळातला, मोठा आवाज -- ) फालतू तर्कटं लढवणारे वकील शून्य उपयोगाचे असतात. खरकटे तुकडे मिळतात का ते हुंगत फिरणारे ते घाणीतले, मागच्या गल्लीतले वकील ! काय करणार ते ? याउलट, माझ्या सर्कलमधले वकील हे मोठे वकील आहेत. ‘ मोठे वकील ‘ बाळारामा, जे मिळावेत असं सगळ्या आरोपींचं स्वप्न असतं !

बाळा. : खोटं आहे हे, निखालस खोटं ! आमचे वकील आणि त्यांचे सहकारी हे दर्जानं छोटे आहेत हे कबूल, पण मग हळदणकरांची काय अवस्था आहे ? खरोखरचे जे मोठे वकील आहेत ते हळदणकरांपेक्षा तेवढेच जास्त मोठे आहेत जेवढे हळदणकर मागच्या गल्लीतल्या गळेकापू वकिलांपेक्षा मोठे आहेत ! किंवा ते गळेकापू वकील त्या भाडोत्री,चोर वकिलांपेक्षा जेवढे मोठे आहेत !

के : बरं, हे मोठे म्हटले जाणारे वकील कोण आहेत ? त्यांच्यापर्यंत कसं पोचता येईल ?

बाळा. : काही कल्पना नाही. त्यांनी एखाद्या आरोपीसाठी विशेष काही केल्याचं एकही उदाहरण मला माहीत नाही. त्यांच्या मर्जीप्रमाणे ते अशील घेतात. ते तू डोक्यातनं काढूनच टाक. म्हणजे राहतात कोण ? छोटे वकीलच. ते त्या मोठ्या वकिलांपुढे इतके निस्तेज आणि चोथट दिसतात की तुमचा पुरता विश्वासच उडून जावा. दुर्दैवानं त्यांना विसरताही येत नाही, विशेषत:, अनेक विचार रात्रीच्या वेळी आपलं डोकं खात राहतात तेव्हा. ( इथे लीना परत येते. )

लीना : अरे, डोकी आपटतील तुमची एकमेकांवर, किती जवळ येऊन बोलताय !

बाळा. : त्याला माझ्याकडून माझ्या केसची माहिती हवीय --

लीना : ठीक आहे नं, सांग नं मग !

के : तू मला क्षुद्र तर्कटवाल्या वकिलांबद्दल सांगत होतास --

लीना : ( बाळा. ला -- ) जा त्यांच्याकडे -- तू हवायस तिथे -- ( बाळा. जातो आणि लीनाची जागा घेऊन हळ.चा मसाज करू लागतो. ) तुम्हाला वाट्टेल तेव्हा तुमचे वकील तुम्हाला भेटू शकतात याचं तुम्हाला आश्चर्य नाही वाटत ? -- पूर्वसूचना न देता ! ? तुम्ही त्यांना गृहीतच धरून चाललाय ! यासाठी मला विशेष धन्यवाद वगैरे नको आहेत, पण तुम्हाला मी आवडत राहिले पाहिजे !

के : पण आवडतेसच तू मला !

लीना : मग आता आजची रात्र माझ्याबरोबर घालवायची ! करणार नं हे नक्की ? काय ? ( ती त्याला जमिनीकडे ओढते -- आता समोर आडोसा येतो. )

हळ. : आरोपी पुरुष हा लीनाचा वीक पॉईंटच आहे. तिला सगळेच आरोपी पुरुष आकर्षक वाटतात हे तिचं एक वैशिष्ट्यच म्हणावं लागेल ! ती त्या सगळ्यांबरोबर झोपते ! आणि त्यांनाही तिच्याबद्दल प्रेम वाटतं ! के, एका बाबतीत मला तुझी माफीच मागावी लागेल -- माझी करमणूक व्हावी म्हणून या

सगळ्या भानगडी ती मला सांगते आणि मीही त्या ऐकतो ! आता मला त्याचं काही आश्चर्य नाही वाटत ! तशी योग्य दृष्टी असेल ना तर खरोखरच हे आरोपी पुरुष आकर्षकच असतात. आणि विशेष म्हणजे, आरोप येण्यामुळं दिसण्यात फारसा फरक पडत नसला तरी, काही लोक असंख्यांच्या गर्दीतूनही बरोब्बर असे आरोपी दाखवू शकतात ! पण ही आरोपी माणसं स्वत:ला अपराधी समजत असतीलच असं नाही ! म्हणजे याचा अर्थ असा होतो की नुसता आरोप येण्यानंच त्यांना एक आकर्षकपणा लाभतो. अर्थात त्यात काही कमी आकर्षक, काही जास्त आकर्षक, असं असू शकतं. पण त्यांच्यांत एक प्रकारची वाढ होते हे नक्की. मग अगदी एखादा भिकारडा बाळाराम का असेना -- ( ते बाळारामला ढकलून देतात -- ) लीना, आताचा हा मुलगा तुला कितपत आवडतो ते मला सांग बरं !

लीना : मला माहिती तरी आहे का त्याची ?

हळ. : तू समजतेस इतका मी मूर्ख नाही ! जा, मला थोडा चहा आण ! ( लीना हळ.कडे जाते, बाळाराम परत येतो आणि उडी मारून केच्या पाठीवर बसतो. )

के : अरे, तू झोपायला का जात नाहीस ?

बाळा : के, तुम्ही तुमचं वचन विसरला आहात -- तुम्ही मला तुमचं एखादं गुपित सांगणार होता --

के : बरं, ठीक आहे, सांगतो मी पण ते फक्त तुझ्यापुरतंच राहिलं पाहिजे --

बाळा. : नक्कीच, प्रश्नच नाही !

के : मी काही हा वकील घेणार नाहीय -- काढून टाकणार आहे मी त्याला --

बाळा. : ( ओरडत इकडेतिकडे पळतो -- ) हा त्याचा वकील काढून टाकतोय -- हा त्याचा वकील काढून टाकतोय ! ( प्रत्येकजणच ते ओरडायला लागतो. कोरस व इतर सर्वजण हे दृश्य खुर्च्यांवर उभे राहून पाहताहेत. )

के : माझा वकील आता मलाच निवडायचाय. हा आता माझा अंतिम निर्णय आहे. ( हळन्ना उद्देशून -- ) तुमचे प्रयत्न पुरेसे नाहीत याबद्दल आता माझी पुरती खात्री झालेली आहे. आता मला धीरही धरवत नाहीय. जेव्हा मी एकटाच होतो तेव्हा या केसचं मला इतकं काही वाटत नव्हतं, पण तुम्ही माझ्या बाजूनं उभे राहिल्यावर मी काहीतरी घडायची वाट पाहात होतो. पण काहीही घडलेलं नाहीय.

हळ. : अरे, एका मर्यादेनंतर नवीन असं काहीच कधीच घडत नाही. तू आत्ता जे बोलतोयस तेच यापूर्वी किती अशील बोलून गेलेयत याला गणतीच नाही रे ! दुसरं महत्त्वाचं म्हणजे, तुझी केस ही नेहमीसारखी, सामान्य कायदेशीर हक्क असलेली केस नाही --

के : एवढा कसला फरक आहे ?

हळ. : फरक ? अरे, एखाद्या साध्या केसमध्ये वकील त्याच्या अशिलाला एखाद्या बारीकशा धाग्याला बांधून नेऊ शकतो, पण तुझी केस कशी आहे ? तुला उचलून खांद्यावर घेऊन, न पाडता, शेवटपर्यंत -- पार निकाल लागेपर्यंत आणि पुढेही न्यावं लागणार आहे मला ! शिताफीनं !

के : समजा तुम्हालाच मी माझे वकील म्हणून कंटिन्यू केलं तर आता तुम्ही कोणती पावलं उचलाल ?

हळ.: मी आधीच सुरू केलेले जे उपाय आहेत तेच पुढं चालू ठेवणार !

के. : वाटलंच मला ! हे असलं बोलत बसणं म्हणजे काळाचा निव्वळ अपव्यय आहे !

हळ. : तुला खूप चांगली वागणूक मिळतेय. दुसऱ्या आरोपींना कसं वागवलं जातं ते मी तुला दाखवतो -- त्याच्यातून तुला एखाददुसरी गोष्ट शिकता येईल. ( ओरडतो -- ) बाळारा ऽऽ म !
( कोर्टरूममध्ये बोलावल्याप्रमाणे अनेक आवाज बाळारामला बोलावतात. बाळाराम सावकाशपणे

प्रवेश करतो -- मान उचलून वर पाहण्याचा धीर होत नसलेला. )

लीना : बाळाराम, वकीलसाहेब बोलावताहेत तुला --

हळ. : आला का बाळाराम ? ( बाळाराम एकदम मागे जातो, तडाखा बसल्यासारखा थरथरत राहतो ... )

बाळा. : सेवा सांगावी साहेब --

हळ. : काय पाहिजे तुला ? चुकीच्या वेळी आलायस तू --

बाळा. : मला आपण बोलावलं होतं ना ?

हळ. : ते बरोबर आहे, पण नेहमीप्रमाणेच तुझं उशिरा येणं काही चुकलेलं नाही --

बाळा. : मग, जाऊ का मी ?

हळ.. : नको. आलाच आहेस तर थांब आता -- बरं, बाळाराम , तुझा वकील कोण आहे ?

बाळा. : आपणच साहेब !

हळ. : आणि माझ्याव्यतिरिक्त ?

बाळा. : नाही, कुणीच नाही --

हळ. : नक्की ना ?

बाळा. : प्रश्नच नाही ! शंभर टक्के !

हळ. : मग दुसरं कोण काय बोलतंय याच्याकडे लक्ष नको देऊस --

बाळा. : निश्चितच ! डॉक्टर हळदणकरसाहेब, मी पूर्ण नम्र आहे --

के : चारही पायांवर असा सरपटतोयस कशाला ? काय झालंय काय तुला ?

बाळा. : फार हुशारी नको करूस -- मीही तुझ्याइतकाच हुशार आहे -- जुने अनुभवी लोक काय म्हणून गेलेत त्याची तुम्हाला फक्त आठवण करून देतो -- ‘‘ जे संशयित आहेत त्यांनी फिरतं राहावं -- एका ठिकाणी थांबू नये -- ‘‘ का, तर -- न जाणो ते तराजूच्या पारड्यातच थांबून राह्यचे आणि त्यांचा त्यांच्या पापांसह निवाडाच होऊन जायचा !

के : वकीलसाहेब सरळसरळ तुझा अपमान करायचा प्रयत्न करतायत हे लक्षात येत नाहीय का तुझ्या ?

बाळा. : ऐकलंत, डॉक्टर हळदणकरसाहेब, याची केस माझ्यापेक्षा फक्त पाच मिनिटं आधीची आहे आणि तेवढ्यावर हा मला सल्ला द्यायला निघालाय !

हळ. : लक्ष नको देऊस कुणाकडे !

बाळा. : नक्कीच ! ... डॉक्टर हळदणकरसाहेब ! ...

हळ. : ( लीनाला --) कसा काय वागतोय तो ?

लीना : पूर्ण दिवसभरात तो एका पानाच्याही पुढे जाऊ शकलेला नाही -- समजत नसणार ते त्याला --

हळ. : ( लहान मुलाला सांगावे तसे -- ) होय, पवित्र ग्रंथ किंवा तशा प्रकारचं लेखन हे अवघडच असतं. त्याची केस किती अवघड आहे हे त्याला यावरून कळू शकेल ! आणि त्याच्यासाठी चाललेले माझे कष्ट किती खडतर आहेत, तेही ! आणि कुणासाठी करतोय मी हे सगळं ?

बाळा. : हे काय विचारणं झालं ?

हळ. : ( गाणे गात -- ) पण हे सगळं आहे बाळारामासाठी

पण हे सगळं आहे बाळारामासाठी !

( बाळाराम अत्यंत लाचारीने हसतो. कोरस उचरवात -- ‘‘ बाळारामासाठी -- बाळारामासाठी -- बाळाराम, बाळाराम -- ‘‘ ) चढवून नका ठेवू त्याला. त्यामुळं मग, न्यायमूर्ती आज त्याच्या केसबद्दल काय म्हणाले हे त्याला सांगणं अवघड होऊन बसेल !

बाळा. : ( थरथरत -- ) काय म्हणाले ?

हळ. : अनुकूल नाही --

बाळा. : अनुकूल नाही ? (घाबरून थरथरत राहतो -- )

हळ. : बाळारामबद्दल बोलूच नका म्हणाले. अहो, पण म्हटलं, तो माझा अशील आहे. यावर ते म्हणाले की तुम्ही वेळ वाया घालवताय. म्हटलं, मला नाही वाटत तसं. बाळाराम तर अतिशय प्रामाणिकपणानं स्वत:च्या केसला अगदी सर्वस्वानं वाहून घेतो. एवढंच काय, केसच्या कामकाजाची प्रगती कळत राहावी म्हणून माझ्या घरातच राहतो. असा उत्साह सहसा बघायला मिळत नाही. तो तिरस्करणीय, घाणेरडा, असभ्य, किळसवाणा, वगैरे आहे, हे मान्य, पण अशील म्हणून त्याला काहीही बोल लावता येणार नाही. ‘‘ बोल लावता येणार नाही ? ‘‘ ते म्हणाले, किती खोटं ! लबाड, म्हणाले, लबाड आहे तुमचा तो अशील, पण त्याचा अडाणीपणा त्याच्या लबाडीपेक्षा मोठा आहे. समजा तुम्ही त्याला सांगितलंत की त्याची केस अजून सुरूच झालेली नाहीय तर त्याचं काय होईल असं वाटतं तुम्हाला ? की बाबा केस सुरू झाल्याची घंटा अजून वाजलेलीच नाही -- तर ? ( बाळाराम थरथरतो आणि एखाद्या कुत्र्याप्रमाणे कण्हतो. ) शांत हो बाळाराम ! असा भयग्रस्त होऊ नकोस, नाही तर मी पुन्हा तुला काहीच सांगणार नाही. माझ्या एका अशिलासमोर असं वागताना तुला लाज वाटली पाहिजे ! होईल काय यानं ? त्यांच्या माझ्यावरच्या विश्वासाला तडा जाईल ! जाईल की नाही ? काय चाललंय काय तुझं हे ? तू जिवंत आहेस, आहेस की नाही ? अजूनही तू माझ्या छत्राखाली आहेस ! तुझी ही भयग्रस्तता मला अक्षरश: किळस आणते ! अरे, तो फक्त एका न्यायाधीशानं उच्चरलेला एक शब्द आहे ! कशामुळं ? तर त्यानं असं गृहीत धरलेलं आहे की परंपरेप्रमाणे केस सुरू झाल्यावर, खूण म्हणून एक घंटा वाजते ! अरे बाळारामा, केस नको उपटूस असे स्वत:चे ! ( बाळाराम एखाद्या कुत्र्यासारखा हळदणकरांच्या नरड्याकडे झेपावतो -- हळदणकर त्याला ढकलून देतात. मग हळदणकर एक छडी घेतात आणि बाळारामला तिचा धाक दाखवतात. त्याला उडी मारून खुर्चीवर बसायला लावतात. आता त्याचा कुत्राच होतो. हा त्याच्या अपमानाचा कडेलोट असतो. कोरसची नटमंडळी, हा बाळारामाच्या व्यक्तिमत्वाचा अंत आहे असे समजून, शिट्ट्या मारतात, चीत्कारतात. )

बाळा. : त्याची केस फक्त पाचच मिनिटं माझ्या आधीची आहे आणि तेवढ्यावर तो मला सल्ला द्यायला निघालाय ! ( खूप मोठे गर्दीचे आवाज होत राहतात ... आवाज हळूहळू कमी होत बंद होतात तसा फक्त पुढील आवाज उरतो ... )

आवाज : जाऊं द्या, लक्ष नका देऊ. तो एक संपलेला माणूस आहे. त्याला वकील नाही, सल्लागार नाही, त्याची केस चालवायला, त्याचा बचाव करायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. किंवा, त्याच्यावर प्रेम करायला, त्याची काळजी घ्यायला, त्याला चिडवायला किंवा त्याच्या भल्याची चिंता वाहायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. शनिवारी बँक बंद झाल्यावर त्याच्याबरोबर फिरायला जायला किंवा त्याच्याबरोबर नदीकाठी बसायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. त्याचे बेडशीटस् बदलायला, त्याचा बेड तयार करायला किंवा बेडशीटसवरचे डाग धुवायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. वाद करायला, त्याला शांत करायला किंवा दु:खद क्षणांमध्ये त्याचं सांत्वन करायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. त्याला चिमटा घ्यायला, त्याचं कपाळ गोंजारायला किंवा कसलंही यश मिळालेलं नाही अशा दिवसांत त्याचं नैराश्य कमी करायला कुणीही नाहीय त्याच्याकडे. जेव्हा समोर फक्त अनिश्चितता

असते आणि नुसता एखाद्या मित्रानं पाठीवर हात ठेवल्यानं यात बदल होणार असतो, त्याची केस पुन्हा उभी राहू शकणार असते, कुठाय असं कुणी त्याच्याकडे ? त्याच्यासाठी स्वैपाक करणारं, त्याच्यासाठी बँकेच्या बाहेर वाट पाहणारं, त्याला उशीर झाला तर अस्वस्थ होणारं, असं कोण आहे त्याच्याकडे ? त्याच्या शर्टावरचा डाग काढणारं, थोडासा पिकलेला केस काढून टाकणारं, त्याच्या सुटावरची धूळ झटकणारं किंवा त्याच्या कानाला चावणारं ? कोण आहे ? किंवा ज्यांचा उल्लेख करणंही धाडसाचं वाटावं इतक्या नीच गुन्ह्यांसाठी तुम्हाला अटक करायला आलेल्या पोलिसांचं स्वागत करून त्यांना आत घेणारं ? कोण आहे ? कोणीही नाहीय त्याच्याकडे ! ( इथे बँकेचे कर्मचारी दिसतात. वरील संवादाच्या शेवटच्या वाक्यांचा परिणाम त्यांच्या चेहऱ्यांवर दिसतोय. )

मॅनेजर : असं काही नाही रे के, तुझ्या फौजदारी केसमध्ये तुला मदत करायची माझी खूप इच्छा आहे.

के : जिथं मी नोकरी करतो तिथं बँक, जिथं मी माझी केस लढवतोय तिथं नाही !... आत्ता नाही ... माझ्या निकालाची वाट पाहात थांबलेल्या काही महत्त्वाच्या आरोपींशी मला काही कागदपत्रांबद्दल चर्चा करायची आहे. काय चाललंय काय हे ? हा म्हणजे कोर्टाच्या परवानगीनं चाललेला एक प्रकारचा छळच आहे. तुम्ही सगळे जात का नाही ? जा --

मॅनेजर : तू जा आणि त्र्यंबक नावाच्या माणसाला भेट. त्यानंच मला तुझ्या केसबद्दल सांगितलं. कोर्टाचा चित्रकार म्हणून तो काम करतो आणि त्यावरच त्याची उपजीविका चालते. तिथले न्यायाधीश त्याच्या ओळखीचे आहेत. तो तुला सल्ला देऊ शकेल. पण इथं नको भेटूस त्याला. अशानं त्याचं पहिलंच मत खराब होईल.

के : अरे, मला काय डोकंबिकं आहे की नाही ? एखाद्या अनोळखी माणसाला, त्याचा सल्ला विचारण्यासाठी मी बँकेत बोलावीनच कसा ? ! आणि हा परमप्रिय मॅनेजर कान फडकावत भिंतीजवळ उभा आहे याची खात्री असताना ? !

मॅनेजर : ठीक आहे, तुला जावंच लागणार आहे, तर मग तुझी कामं दुसऱ्या कुणी पार पाडली तर तुला वाईट वाटायचं कारण नाही. शेवटी वेळेला किंमत असते !

के : करा काय ते. माझी नका चिंता करू. कावेबाज, चोर साला ! तुझा काय प्रयत्न चाललाय ते कळतंय मला, पण माझ्या या व्यक्तिगत अडचणी जरा दूर होऊ देत, मग बघ तुला कसा नाचवतो ते ! ( त्याच्या या प्रक्षोभामुळे ऑफीस हळूहळू अदृश्य होते. आता **त्र्यंबक** एका फ्रेममध्ये चित्रासारखा उभा असलेला दिसतो. के त्याला बाहेर ओढतो. चंद्रभान आणि इतर कोरसवाले येतात. )

चंद्रभान : जरा एक दोन मिनिटं हं -- तुम्ही दोघेही जरा आत जा -- पुन्हा इथूनच तुमचं दृश्य सुरू होईल ... प्लीज ... ( ते दोघे जातात. )

रोहिणी : सर, या सीनची विनंती मुद्दामच केली, कारण आम्हाला काही प्रश्न आहेत.

स्वाती : माणसाचं नुसतं दिसणं तर सोडाच, त्याचं व्यक्तिमत्वच त्याच्या जनुकनकाशावर अवलंबून असतं असं म्हणतात --

रोहिणी : त्याचा स्वभाव, त्याच्या प्रतिक्रिया देण्याच्या पद्धती, निर्णय घेण्याच्या पद्धती --

अश्विन : तो एखाद्याचा खून करेल का, हे --

कार्तिक : तो बलात्कार करण्याची शक्यता --

अश्विन : तो शोषक, अत्याचारी होईल का --

कर्तिक : तो दयाळू, समाजसेवक असेल का --

रोहिणी : त्याला रोग कुठला होईल --

स्वाती : त्याला विचारसरणी कुठली होईल --

अश्विन : नाही, नाही, इथं थांबावं लागेल --

स्वाती : का ? मानसशास्त्रानं प्रयोगानं सिद्ध केलंय हे -- जनुकनकाशावर विचारसरणी अवलंबून असणं !

अश्विन : प्रयोग काय दुसरेही होत राहतील --

स्वाती : देअर इज नो माईंड विदाऊट बॉडी ! -- शरीराशिवाय मन असत नाही !

रोहिणी : असं असेल तर -- आपला जनुकनकाशा कसा असावा हे हातात नसलेल्या माणसाला, त्या जनुकनकाशामुळं घडणाऱ्या घटनांना जबाबदार का धरावं ? दोषी का धरावं ? शिक्षा का द्यावी ?

अश्विन : जयेश केचा गुन्हा कसला असेल ?

स्वाती : अटक म्हणजे काय ? की ही मानसिक अटक असेल ?

चंद्रभान : आणि ‘ स्वातंत्र्य ‘ या शब्दाचा उपयोग काय मग ? -- हे सगळं ठेवू मनात आणि पुढे जाऊ -- ( इथे ते जातात आणि पुन्हा के--त्र्यंबक प्रवेश सुरू होतो... )

**त्र्यंबक**

त्र्यंबक : बाहेर काढल्याबद्दल आभारी आहे. मी माझ्या सेल्फपोर्ट्रेटमध्येच अडकून पडलो होतो. ते फारच धोक्याचं ! एकदा तर दुसऱ्यानं येऊन मला ओढून बाहेर काढेपर्यंत दोन दिवस मी असाच अडकून पडलो होतो.

के : तुम्ही त्र्यंबक चित्रकार आहात का ?

त्र्यंबक : होय -- बरोबर आहे -- आणि तुम्ही आहात जयेश के. तुमच्या भेटीनं आनंद वाटला !

के : तुम्हाला कसं माहीत ?

त्र्यंबक : शब्द इकडचे तिकडे होतच असतात. शिवाय मला खूप मित्र आहेत. तुम्हाला कुणीतरी मला भेटायची शिफारस केलीय ! छान ! तुम्ही चित्र विकत घ्यायला आलायत की तुमचं पोर्ट्रेट बनवून घ्यायला ?

के : हं -- ठीक -- बघू --

त्र्यंबक : हे बघा बरं आवडतंय का तुम्हाला -- सध्या मी याच्यावरच काम करतोय -- हा एक फार मोठा न्यायाधीश आहे -- हा इकडे छोट्या न्यायाधीशाचा क्लार्क आहे -- आणि हा एका न्यायाधीशाचा सेक्रेटरी, पण हा अजून पूर्ण व्हायचाय -- हा बघा, कोर्टाचा बेलिफ -- हा बेलिफ जरा माकडासारखा काढलाय कारण त्याची बायको बऱ्याचदा त्याचं माकड करते -- हा एक धिक्कारित माणूस, जरा उदासवाणा, पुढच्या खोलीसाठी उपयोगाचा नाही -- आणि हा कोर्टरक्षक -- भक्कम पण थोडा वेडा -- ही कोर्टाच्या जागेची मालकीण -- माहिती असेल तुम्हाला ! -- हे विकण्यासाठी नाहीय -- एक कुमारिका आहे ही -- कुठलं घ्याल तुम्ही ? -- मी तुम्हाला एकाच्या किंमतीत दोन चित्रं देईन -- ( निरनिराळ्या चित्रचौकटींमध्ये तो वेगवेगळ्या पोझेस घेतो. ) -- बरं, तुम्हाला जरा घाणेरडी चित्रं आवडतील का ? -- मी तुमचं हवं तर अत्यंत वेगात करून देतो एक पोर्ट्रेट -- एका बैठकीत -- ( के फ्रेममध्ये जातो. ) सुंदर ! हे माझं सर्वोत्कृष्ट पोर्ट्रेट आहे ! हे तर मी आर्टगॅलरीतच देईन ! मला वाटतं, मीही यावं त्यात तुमच्याबरोबर ! चालेल का ?

के : मी बघू नाही ना शकत ते !

त्र्यंबक : बघा ना -- ( ते बाहेर येतात -- ) कसं वाटतं ?

के : नाही दिसलं मला --

त्र्यंबक : झटकन पाहता आलं पाहिजे -- आपण स्केटिंग करतोय असं समजा -- एक, दोन, तीन, पळा --

( ते जणू गोल रेस खेळतायत. )

के : हो, हो, खरंच सुंदर आहे ते ! फारच छान !

त्र्यंबक : कशाबद्दल बोलताय तुम्ही ? या फ्रेममध्ये तर चित्रच नाहीय -- असूं द्या, चला ! मला माहीत आहे, तुम्ही कशासाठी आला आहात, तुम्ही उगीच आपलं चढवताय मला ! तुम्ही माझी चित्रं खरेदी करायचं ढोंग करताय, खरं तर तुम्हाला कोर्टासंबंधी काही माहिती हवीय ! --

के : पेंटिंग्ज खरंच छान आहेत तुमची !

त्र्यंबक : ठीकाय ... चला ... मला कसं हाताळायचं हे तुम्हाला माहिती नाही ... नुसतं या तुम्ही त्र्यंबककडे -- काळजी नका करू ... माफीही नका मागू ... बसा ... बसा ... तुम्हाला काही मदत करण्यापूर्वी मला तुमच्या केसबद्दल थोडीतरी माहिती असायलाच हवी ... तुम्ही निरपराध आहात ?

के : होय --

त्र्यंबक : तुमच्या-माझ्यात -- या त्र्यंबकला सांगा !

के : खरंच, मी पूर्णपणे निरपराध आहे --

त्र्यंबक : सगळे हेच म्हणतात -- सगळे म्हणतातच की ते निरपराध आहेत ! -- तुम्ही काय केलंय ?

के : मी कुठलाही गुन्हा केलेला नाहीय --

त्र्यंबक : लाजू नका -- काही तरी थोडं खोड्याळ -- अं ?

के : मी काहीही केलेलं नाही, हाच महत्त्वाचा मुद्दा आहे --

त्र्यंबक : तुम्ही म्हणताय की तुम्ही पूर्णपणे निरपराध आहात -- मग तर मी स्वत:च तुम्हाला या जंजाळतनं बाहेर काढीन --

के : पण कोर्टाला माझ्या अपराधाबद्दल पूर्ण खात्री आहे आणि त्यापासून कोर्टाला विचलित करणं फार अवघड आहे --

त्र्यंबक : अवघड ! शक्यच नाही ! तुम्हाला एक गंमत सांगतो. समजा एका लायनीत मी सगळ्या न्यायाधीशांची चित्रं काढली, अगदी रविवर्म्यासारखी, मास्टरपीसेसच म्हणा ना आणि समजा तुमची केस या चित्रांपुढे चालवायची असं ठरलं तर तुम्हाला खऱ्या कोर्टात एक वेळ केस जिंकता येईल पण या चित्रांपुढे कधीच नाही.

के ;: तुम्हाला उलट तर म्हणायचं नाहीय ? -- तुमच्या चित्रांमधल्या न्यायाधीशांपुढे केस जिंकता येईल पण खऱ्या कोर्टात नाही -- असं ?

त्र्यंबक : असं म्हणणं हा तुमचा फारच चांगुलपणा झाला. पण ठीक आहे. तुम्ही जर निरपराध असाल तर मी तुम्हाला मदत करीन.

के : वा ! ... पण तुमची ओळख कुणाशी आहे त्याच्यावर ते सगळं ...

त्र्यंबक : ते बरोबरच आहे ! मी सगळ्यांना ओळखतो कारण मी कोर्ट-चित्रकारच आहे. या व्यवसायात मात्र जन्मावंच लागतं ! त्यामुळं मजेदार असते ही पोझिशन. नवख्या चित्रकारांना जुन्या मास्टर्सप्रमाणे न्यायाधीशांची चित्रं काढण्यातले बारकावे कळत नाहीत. माझ्या आधी माझे वडील कोर्ट-चित्रकार होते. त्यांच्या आधी त्यांचे वडील. आणि त्यांच्या आधी त्यांचे वडील... पण त्यांच्या आधीचे वडील मात्र कोर्ट-चित्रकार नव्हते.

के : मग काय होते ?

त्र्यंबक : चित्रं काढू शकत नसल्यामुळं ते आईसक्रीम विकत. चॉको, टूटीफ्रूटी, बटरस्कॉच, मँगो, वगैरे. ( कोरस उड्या मारत येतात. ‘‘ मला आईसक्रीम, मला आईसक्रीम ! ‘‘ म्हणतात. ) अरे, संपली

बाबांनो ! ( जातात. ) ते म्हणजे खूप वर्षांपूर्वी हं ! आणि आता, त्यांचा खापरपणतू, म्हणजे मी, हा एक प्रख्यात कोर्ट-चित्रकार आहे. ठीक आहे, तुम्हाला कशा प्रकारची निर्दोष सुटका हवीय ?

के : तुमचा सल्ला काय ?

त्र्यंबक : त्यात अनेक प्रकार आहेत. पण मी तुम्हाला त्यांतले फक्त पहिले तीनच सांगतो. निश्चित सुटका, तात्पुरती सुटका, अनिश्चित काळापर्यंत केस पुढे ढकलणे आणि आणखी एक म्हणजे आरोप सिद्ध होणे ! पण त्यात फक्त जगण्यापासून सुटका मिळते ! आपल्याला सगळ्यांना तेच हवं असतं, पण ते आत्ता नाही !

के : मला निश्चित सुटका द्या --

त्र्यंबक : तुम्ही निरपराधी आहे म्हणून ! ती तर सगळ्यांत उत्तम ! पण ती कधी मिळते ? तुमच्या स्वत:च्या हृदयात, खोलवर, तुमच्या स्वत:च्या निरपराधित्वावर तुमचा स्वत:चा विश्वास असेल तर !

के : आहेच मी निरपराधी ... निश्चितच ...

त्र्यंबक : दुर्दैवानं, मला हे सांगायलाच पाहिजे, ही ‘ निश्चित सुटका ‘, माझ्या माहितीप्रमाणे, कुणालाही, कधीही मिळालेली नाही !

के : हजारो केसेस चालत असतील ना, ते काय सगळेच अपराधी असतील ? तसं असेल तर या कोर्टाला शिक्षेची अंमलबजावणी करणाऱ्यांचीच फक्त गरज आहे -- मग हे सुनावणीचं नाटक हवंय कशाला ?

त्र्यंबक : तुमचं बरोबर आहे. अत्यंत बरोबर आहे. अशा सुटका कोणत्याही फाईल्समध्ये सापडत नाहीत, कारण सगळी कागदपत्रं नष्ट केली जातात. त्यामुळं तशा सुटका उपलब्ध असल्याचा कुठलाच पुरावा तुमच्याकडे नसतो. फक्त काही दंतकथा आपल्यापर्यंत आलेल्या असतात इतकंच ! काही तर फारच सुंदर असतात. त्यांतल्या काहींसाठी मी बरीच चित्रंही काढलेली आहेत. असो. तर सध्या आपण ‘ निश्चित सुटका ‘ सोडून देऊ.

के : सध्या फक्त.

त्र्यंबक : याच्याकडे आपण पुन्हा येणार आहोत.

के : ठीक आहे, त्या दुसऱ्या शक्यता पुन्हा एकदा सांगा बरं --

त्र्यंबक : मी ते जरा सोपं करून सांगतो. तात्पुरती सुटका जी असते तिच्यासाठी अगदी थोड्या काळासाठी प्रचंड एनर्जी लागते. अनिश्चित काळापर्यंत केस लांबवण्यासाठी एनर्जी कमी लागते पण वेळ जास्त लागतो. तुम्हीच निवड करा. तुमच्या हातात आहे.

के : मग तात्पुरती सुटका बघा.

त्र्यंबक : फारच छान ! ती मात्र तुमच्यासाठी आहे ! असं करतो, तुम्ही निरपराध असल्याबद्दलचं एक प्रतिज्ञापत्र करतो मी तयार एका कागदावर. त्याचा मजकूर मला वरून मिळालेला आहे आणि तो अभेद्य आहे. त्याच्यात मी असं म्हणणार -- मी, त्र्यंबक चित्रकार, पूर्ण विश्वासानं सांगतो की जयेश के निरपराध आहेत आणि त्यांच्या निरपराधित्वाची मी हमी देतो. त्यानंतर मी तो कागद घेऊन एका न्यायाधीशाकडून दुसऱ्या न्यायाधीशाकडे जाणार आणि त्यांच्या सह्या गोळा करणार. आता काही न्यायाधीश माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत आणि तुम्हीच त्यांना व्यक्तिश: भेटायला पाहिजे असं म्हणतील. तेही करायचं. आणि मग शेवटी आपण त्या महान न्यायाधीशाकडे जाऊ, जे तुमच्या सुनावणीचे प्रमुख आहेत. ( तो एका फ्रेमकडे जातो -- जणू भेटीसाठी गेलाय -- ) ते आत नाहीत -- पुन्हा प्रयत्न करा. ( एक कुत्रा भुंकल्याचा आवाज येतो. ) मला वाटतं, कुणीतरी येतंय. ( आता

त्र्यंबकच्या नजरेतून -- )

न्यायाधीश : काय भानगड आहे ? मला इतक्या उशिरा का त्रास देताय ?

के : मी, त्र्यंबक चित्रकाराचं पत्र घेऊन आलोय !

न्याया. : अस्सं ! माझा चांगला मित्र आहे तो ! डायरेक्ट नव्हे, त्याचा एक मित्र तो माझाही मित्र आहे ! चल, करतो मी सही तुझ्यासाठी.

त्र्यंबक : मग झालीच समज सुटका तुझी. आश्चर्य आहे ! पण फक्त तात्पुरती सुटका, बरं का. माझ्या ओळखीचे जे छोटे छोटे न्यायाधीश आहेत त्यांच्याकडे निश्चित सुटका द्यायचे अधिकारच नाहीत. ते फक्त अत्युच्च कोर्टाकडेच आहेत आणि तिथे आपण कुणीच पोचू शकत नाही.

के : मग काय उपयोग त्याचा ?

त्र्यंबक : अहो, आता तुम्ही निश्चित सुटकेसाठी प्रयत्न करू शकता.

के : पण तुम्ही तर म्हणालात की तशी सुटका कुणालाच मिळत नाही ! ?

त्र्यंबक : कुठली वेळ पहिली असेल हे कसं सांगता येईल ? या तात्पुरत्या सुटकेनं खांद्यावरचं केसचं ओझं काढून घेतलं जातं. तुम्ही कामावर जायला मोकळे असता. तुमच्या केसची कागदपत्रं फिरत राहतात -- न्यायाधीशाकडून न्यायाधीशाकडे, या कोर्टाकडून त्या कोर्टाकडे, पुढे आणि पुन्हा मागे अशी. कधी चकरा वाढतात, कधी त्यांचे क्रम बदलतात, कधी पद्धती बदतात. एकही कागद कधीही हरवत नाही ! मग पाच, दहाच काय अगदी वीस वर्षं जाऊं देत ! तुम्ही तुमची केसच काय, अशी अशी एक केस होती हेसुद्धा विसरून गेला असाल ! अशा वेळी समजा मी तुम्हाला रस्त्यात बघितलं तर मी काय म्हणणार, ‘‘ कोण बरं ? मीच सांगतो, तुम्ही नका सांगू ! अरे, हे तर जयेश के. श्रीयुत तात्पुरती सुटकेकार ! कशी काय केस तुमची ? ‘‘

के : कुठली केस ? विसरून गेलोय मी ते सगळं !

त्र्यंबक : बरोबर आहे. नंतर मग एक दिवशी न्यायाधीशाचा एक क्लार्क एक कागदाचा कपटा घेणार आणि त्याच्यावर तुमचं नाव लिहिणार. आणि पुढे लिहिणार की जयेश के हे फक्त तात्पुरत्या सुटकेवर आहेत. त्यांची केस कायद्यानं अजून जिवंत आहे. जयेश के यांना अटक करा ! आणि ती केस पुन्हा सुरू होते !

के : काय उपयोग त्याचा ?

त्र्यंबक : तुम्हाला हे नाही पटत का ?

के : नाही.

त्र्यंबक : नाही. मलाही नाही पटत. हे सारखं तुम्हाला घाबरवून टाकत राहतं. तुमच्यासाठी काय योग्य आहे ते मला माहीत आहे. अनिश्चित काळापर्यंत पुढे ढकलणे. हा मार्ग केसची प्रगती थांबवतो, पण तुम्हाला रोजच्या रोज न्यायाधीशांच्या संपर्कात राहावं लागतं. काम खूप जास्त पडतं. तुमची केस नजरेसमोरून जराही बाजूला करायचं धाडस तुम्ही करू शकत नाही. वारंवार प्रश्नोत्तरं होत राहतात पण नेहमीच अगदी मैत्रीपूर्ण वातावरणात. न्यायाधीशांना चहाला बोलवावं लागतं. ते नेहमी तुमची केस ओपन करायचा प्रयत्न करत असतात, पण ती केस कदापी थोडीही पुढे जाणार नाही. पण ती चिरडूनही टाकली जात नाही. आणि असंही नाही होत की मध्यरात्री अचानक कायद्याचा कठोर हात तुम्हाला पकडेल आणि म्हणेल की जयेश के, तुम्हाला अटक झालेली आहे ! या दोन्ही पद्धतींमध्ये एक गोष्ट कॉमन आहे -- ते अपराध्याचा अपराध सिद्ध होण्याची वेळ येऊ देत नाहीत !

के : हो, पण या दोन्हीही पद्धती ‘ कायमची सुटका ‘ हा प्रकार निकालातच काढतात !

त्र्यंबक : अगदी बरोबर. आता हे परफेक्ट आलं लक्षात तुमच्या. तर मग यांतलं काय पटतंय तुम्हाला ?

के : काहीच नाही. तुमचा सल्ला शून्य उपयोगाचा आहे !

त्र्यंबक : पण माझी चित्रं अप्रतिम आहेत हं !

के : मला ती तुमची चित्रंही नकोत ! मरण पत्करीन मी त्यापेक्षा !

त्र्यंबक : ते जमवून आणता येईल ! तुम्ही काय केलंय, तुम्हाला कल्पना नाही -- तुम्ही माझा -- म्हणजे या त्र्यंबक नामक जगातल्या सर्वश्रेष्ठ चित्रकाराचा वेळ वाया घालवलाय ! असं जे करतात त्यांचं काय होतं हे मी तुम्हाला दाखवीन -- ( त्र्यंबक केला ओढतो आणि खसकन खेचून एका फ्रेममध्ये उभा करतो. त्याच्या चेहऱ्यावर वेदना आणि अपराधी भाव. आता न्यायाधीश आत येतात. केला फ्रेमबाहेर ढकलतात. आता त्या फ्रेममध्ये निरनिराळे मुखवटे घातलेली माणसे -- शांतपणे त्याच्याकडे बोट दाखवून आरोप करणारी. )

**के.ची सुनावणी**

न्यायाधीश : तू उशिरा आलायस ! एक तास पाच मिनिटं !

के : उशीर असो नसो, आलोय ना आता !

चंद्रभान : के नुक्ताच आलेला आहे. कोर्ट खच्चून भरलेलं आहे. ही एक लोकप्रिय केस आहे. लोकांना ती खूपच आकर्षक वाटलेली आहे. कोर्टातलं वातावरण आणि हवामानही चैतन्यपूर्ण आहे. इथले न्यायाधीश आणि वकील एका छोट्या सुट्टीनंतर परत आलेले आहेत. प्रमुख मॅजिस्ट्रेट केची कागदपत्रं शोधताहेत.

न्यायाधीश : अच्छा, तर तुम्ही गृहसजावटकार आहात !

के : नाही, मी एका मोठ्या बँकेत चीफ क्लार्क आहे.

चंद्रभान : मॅजिस्ट्रेट आता त्याच्याविरुद्धचे आरोप वाचून दाखवताहेत. ( निरनिराळी माणसे आणि तोंडांची उघडझाप. के शांतपणाने त्याच्यावर होऊ शकणारे वाईटात वाईट आरोप ऐकतोय. प्रेक्षकांना काहीही ऐकू येत नाही. के कोसळतो. आरोप करणारे जातात. एकजण मागे राहतो. )

आवाज : तू एखाद्या स्वप्नासारखा अदृश्य होशील आणि पुन्हा सापडणार नाहीस -- जणू तू एक रात्रीचा भ्रम होतास.

के : लक्षात ठेवा, स्वाभिमानी लोकांना याचा धक्का बसेल आणि सगळे निरपराधी लोक तुमच्यासारख्या ढोंगी लोकांच्या विरुद्ध आंदोलन उभं करतील --

आवाज : जयेश, तुझी हाडं तुझ्या तारुण्यातल्या पापांनी माखलेली आहेत आणि तुझ्याबरोबर तीही मातीत जातील !

के : न्यायाचं जे असेल तेच टिकेल आणि हात स्वच्छ असलेल्यांची शक्ती वाढत जाईल. सत्यमेव जयते हेच शेवटी सत्य ठरेल.

आवाज : तुला विषारी सापांचं विष प्यावं लागेल आणि एका जहाल विषारी सापाची जीभच तुला खतम करेल.

के : मी आशावादी आहे ! असं घडणार नाही !

आवाज : स्वर्ग तुझं महापाप उघडं पाडेल आणि पृथ्वीही तुझ्याविरुद्ध बंड करून उठेल !

के : ( डरकाळल्याप्रमाणे -- ) बघा मझ्याकडे आणि तोंडावर हात घेऊन थक्क व्हा ! दुष्ट लोक कसे जगतात ते बघा आधी -- माझे मार्ग आणि माझं प्रत्येक पाऊल यांचे कसले हिशोब करता ? मी ... मी कितीही ओरडून सांगितलं तुम्हाला तरी तुम्ही दुर्लक्षच करताहात. मी उभा राहिलो तरी तुम्ही माझी दखलच घेत

नाही ! ( जणू इतरांना -- ) अहो, ते माझ्या सर्वनाशासाठी किंचाळताहेत ! अशा वेळी तुम्ही माझ्यासाठी आधाराचा हात पुढे करणार नाही ? असं कसं होईल ?

**बँकेचे दृश्य**

( कोर्टातली मागे राहिलेली माणसे ऑफीस-स्टाफ होतात -- जणू हे कुठे गेलेच नव्हते. कदाचित के.ही बँकेतून कधीच कुठेच गेला नव्हता. )

असि. मॅनेजर : सगळं ठीक आहे ना जयेश के ?

के : काय ?

असि. मॅ. : आपल्या सिद्धेश्वर मंदिराकडे एक कामगिरी आहे आज तुम्हाला. आपल्या एका महत्त्वाच्या ग्राहकाला ती जुनी वास्तू आणि तिथलं शिल्पकाम पाह्यचंय -- तुम्ही ते दाखवून आणायचंय --

के : हो, जाईन ना ! मी तुमच्या मार्गातनं दूर गेलेलं बरंच की ! ?

असि. मॅ. : म्हणजे काय ?

के : माझ्याशिवाय सगळंच चालायला लागलंय अलिकडं -- काय प्रयत्न काय चाललाय तुमचा ? मला ऑफिसच्या बाहेर काढायचं आणि माझी कामं चेक करायची ?

असि. मॅ. : अहो के, जुन्या वास्तूंचं जतन करणाऱ्या सोसायटीचे मेंबर आहात तुम्ही, म्हणून सोपवलीय ही कामगिरी तुमच्यावर, आणि साहजिकच आहे हे -- तुम्हाला नसेल इच्छा तर राहू द्या --

के : ठीक आहे, जाईन मी --

असि. मॅ. : जाताना तुमचं गाईडबुक न्यायला विसरू नका -- अच्छा, बरंय -- ( प्रेमाने शेकहँड. शांतपणे हातात हात घेऊन ते दोघे उभे. के काहीतरी बोलायच्या बेतात आहे असे दिसते. असि. मॅ. त्यानं बोलावं म्हणून वाट पाहात उभे. दिसते असे की दोन जुने मित्र आता कायमचा निरोप घेत आहेत ... )

**लीना**

( के सिद्धेश्वर मंदिराकडे चालला आहे. आरतीचा आवाज येतो. आजूबाजूला पाय मोडल्यासारखे कोरस उभे. )

लीना : या गारठलेल्या, खिन्न दिवसांचा मला तिरस्कार वाटतो. तुला नाही वाटत जयेश ?

के : मला फारसा वेळ नाहीय, मला सिद्धेश्वर मंदिराकडे जायचंय --

लीना : का ? मंदिराकडे का ?

के : आमच्या एका महत्त्वाच्या ग्राहकाला दाखवायचंय ते मंदिर, तिथलं शिल्पकाम, परिसर ...

लीना : काय हे ! जयेश, ते तुला ढकलताहेत पुढे !

के : आता मला कसलीही दया नको आहे -- मला दयेची अपेक्षाही नाही -- आता दया असह्यच होईल -- ( ती अदृश्य होते. ) होय -- ढकलतायत ते मला पुढे ! ...

**मंदिर**

( बाहेर देवदूतांचे वगैरे दगडी पुतळे असल्याप्रमाणे काहीजण उभे. )

चंद्रभान : तो आत चाललाय, पण मंदिर रिकामं आहे, हे त्याला कोण सांगणार ? फक्त एक म्हातारी पिंडीसमोर हात जोडून काही पुटपुटते आहे.

के : च्यायला, गेलं कुठं ते ग्राहक ?

चंद्रभान : एक अर्धा तास तू वाट बघू शकतोस -- तेवढ्यानं तुझं काही बिघडणार नाही --

के : अंधारत चाललंय -- दिवस किती लौकर मावळतोय --

चंद्रभान : आधी पायऱ्या, मग गोपूर. भरपूर फुलांचं नक्षीकाम असलेलं, जिथे देवदूत आणि गंधर्व क्रीडा करत आहेत -- कधी उत्फुल्ल तर कधी शांत --

के : इथं असं गोपूर आहे हे मला माहीतच नव्हतं --

चंद्रभान : आता केला अंधारात एक दंडधारी दिसतोय. तो केकडे करुणादृष्टीनं पाहतोय. जणू तो आपणा सर्वांचा पालक आहे.

के : काय हवंय त्याला ? बक्षिसी ? ( दंडधारी अदृश्य होतो. )

चंद्रभान : जयेश, जा नीघ आता. पुन्हा अशी संधी येणार नाही. आत्ता तू जर गेला नाहीस तर मग तुला कधीच जाता येणार नाही. महाआरती सुरू झाली की तुला ती संपेस्तोवर थांबावं लागेल. ( इथे एखाद्या प्रतिमेसारखा -- शिल्पासारखा पुजारी दिसतो. )

पुजारी : जयेश के. ( पार्श्वभूमीवर मंत्रोच्चार. ) तूच आहेस -- जयेश के ?

के : होय, मीच जयेश के. मला माझं नाव सांगायची पूर्वी आवड होती -- आता ते ओझं वाटतं मला. विचारायच्या आधीच ते प्रत्येकाला माहीतच असलेलं दिसतं ! प्रसिद्धीची किंमत म्हणायची !

पुजारी : ते तू आरोपी असल्यामुळं होतं !

के : प्रत्येकजण मला हेच सांगत असतो. आरतीला वेळ आहे ना अजून ? हरकत नाही, बोला तुम्ही. मी ऐकत राहीन. मला हे मंदिर आणि इथला परिसर आमच्या एका ग्राहकाला दाखवायचाय. थोडा वेळ वाट पाहणारच आहे मी.

पुजारी : मी इथे तुझ्यासाठीच आलो आहे. मी इथल्या तुरुंगातला पुजारी आहे आणि मी तुझ्याच शोधात होतो. मीच तुला इथं बोलावून घ्यायची व्यवस्था केलीय कारण मला तुझ्याशी काही बोलायचंय.

के : हे मला माहीत नव्हतं.

पुजारी : त्यानं आता काही फरक पडत नाही. तुझ्या हातात काय आहे ते ? आरत्यांचं पुस्तक ?

के : नाही, ए टु झेड गाईड आहे.

पुजारी : ठेवून दे ते बाजूला. तुझी केस अगदी वाईट प्रकारे चाललीय हे माहीतच आहे तुला.

के : तुमचं असं म्हणणं, ही एक गंमतच म्हणायला पाहिजे. उलट, मी जे काय करू शकतो ते सगळं मी केलेलं आहे. आणि अजूनही संपलेलं नाहीय ते.

पुजारी : तुला काय वाटतं, कसा होईल तुझ्या केसचा शेवट ?

के : चांगलाही होऊ शकेल, पण मला खात्री देता येणार नाही.

पुजारी मला, शेवट वाईट होईल अशीच भीती वाटते. तुला अपराधी समजण्यात आलेलं आहे. तुझी केस खालच्या कोर्टातून पुढे जाणारच नाही. तुझा अपराध सिद्ध झालाय असंच सध्या तरी समजण्यात आलेलं आहे.

के : पण नाहीय मी अपराधी. ती सगळी एक घोडचूकच झालेली आहे. आणि मी जर का अपराधी असेन तर सगळेच अपराधी आहेत मग ! अगदी तुम्हीसुद्धा !

पुजारी : अपराधी लोक असंच बोलतात.

के : याचा अर्थ तुम्हीही माझ्या बाबतीत पूर्वग्रहदूषितच आहात.

पुजारी : अरे के, तुझ्या विरुद्ध माझा कोणताही पूर्वग्रह नाहीय, उलट तूच सत्य गोष्टींचे चुकीचे अर्थ लावतोयस. निकाल काही अचानक तयार होत नसतो. चाललेली सुनावणी, हळूहळू तयार होत जाणाऱ्या निकालात विलीन होते. असो. आता याच्या पुढची तुझी कृती काय असेल ?

के : खूप शक्यता आहेत -- त्यांचा मी अजून साधकबाधक विचार केलेला नाही.

पुजारी : तू सारखा बाहेरून मदत मिळवायचा फार प्रयत्न करतोस, विशेषत: स्त्रियांकडून. ती काही योग्य प्रकारची मदत नसते.

के : अहो पण स्त्रियांचा न्यायालयांवर खूप प्रभाव असतो. तिथले मॅजिस्ट्रेट सारखे चहूबाजूंना त्यांच्यासाठी हुंगत असतात... मी जर का स्त्रियांना घेऊन माझी एक शक्ती उभी करू शकलो तर माझ्या जिंकण्याला पर्यायच राहणार नाही !

पुजारी : न्यायालयं कशी चालतात हेच तुला माहीत नाही, म्हणूनच तू असं बोलतोयस. तुझ्या पुढच्याच पावलावर तुझ्यासाठी काय वाढून ठेवलंय हे तुझ्या लक्षात येत नाही ?

चंद्रभान : एखाद्या संतप्त चीत्कारासारखा तो प्रश्न होता, पण भास असा झाला की दुसऱ्याला कोसळताना पाहून कुणीतरी किंचाळतंय --

के : आत्ता तुम्ही काही प्रवचन करत नाही आहात -- तिथून इकडे खाली येऊन बोला नं !

पुजारी : मी तसं नाही करू शकत. मला इथूनच बोलावं लागेल. नाही त्या मोहाला बळी पडून मला माझ्या कर्तव्यापासून विचलित व्हायचं नाहीय.

के : पण दोन मिनिटं तर द्याल ?

पुजारी : तुला गरज असेल तेवढी देईन.

के : तुम्ही असं म्हणताय हे फारच छान आहे. तुम्ही न्यायालयाचाच माणूस असलात तरी मी विश्वास ठेवतोय तुमच्यावर. ‘ तरीही ‘ म्हणतोय मी !

पुजारी : आत्मवंचना करू नकोस.

के : कसं काय ? ही आत्मवंचना कशी ?

पुजारी : तुला हे माहिती आहे का की कायद्याच्या, लेखी प्रस्तावनेत तुझ्या विशिष्ट वंचनेचं वर्णन केलेलं आहे ? -- ‘‘ दारासमोर एक द्वारपाल उभा असतो. या दारासमोरच एक मानवी आकृती आत म्हणजे कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश मिळण्याची वाट पाहात उभी असते. द्वारपाल म्हणतो की एवढ्यात तरी त्याला प्रवेश देता येणार नाही. तो माणूस विचारतो, ‘‘ बरं, नंतर तरी मला प्रवेश मिळेल ना? ‘‘ शक्य आहे, पण या क्षणी तरी नाही. तरीही, दरवाजा पूर्णपणे उघडाच असल्यामुळे तो माणूस आत डोकावून पाहायचं धाडस करतो. ‘‘ कदाचित तुला माझ्या अनुमतीशिवाय आत प्रवेश करायचा प्रयत्न करावा असा मोह होईल, पण लक्षात घे, मी दणकट आहे ... आणि मी सगळ्यांत कमी दर्जाचा द्वारपाल आहे ... या हॉलमधून पुढे आणखी एक दरवाजा आहे -- त्यातून तुला जावंच लागेल -- आणि पुढे आणखी एक दरवाजा जो पार करावाच लागेल ... आणि त्याच्या पुढे आणखी एक ... आणि या प्रत्येक दारावर पुढे पुढे माझ्याहून अधिकाधिक ताकदवान द्वारपाल आहेत. ‘‘ त्या माणसाला वाटतं, खरं तर कायदा सगळ्यांना उपलब्ध असला पाहिजे, पण विचारांती तो वाट पाहावी असं ठरवतो ... तो बरीच वर्षं वाट पाहतो... मग त्याला एक स्टूल दिलं जातं. तो त्यावर, किरकोळ गप्पा मारत खूप वर्षं बसून राहतो, पण त्याला कधीच प्रवेश दिला जात नाही. कालांतरानं तो म्हातारा होतो आणि त्याची दृष्टी अंधुक होते ... त्याला हे कळत नाही की त्याचे डोळे त्याला फसवतायत की जगच अंधुक होत चाललंय ... तरीही, इतक्या वर्षांच्या प्रतीक्षेत, त्याला, दुसऱ्या कुठल्याही माणसाला कायद्याच्या क्षेत्रात प्रवेश मिळालेला दिसत नाही ... हे पाहून त्या द्वारपालाला तो त्याबद्दल विचारतो ... विचारतो म्हणजे, विचारण्यासाठी त्या द्वारपालालाच तो स्वत:कडे बोलावतो कारण त्याच्या अंगात आता उठून उभं राहायचंही त्राण नसतं ... द्वारपाल पाहतो की आता हा माणूस शेवट गाठण्याच्या बेतात आहे. त्यामुळं, मग तो त्याला सांगतो, ‘‘ इथून दुसरं कुणी आत

जाऊच शकणार नव्हतं, कारण हे दार फक्त तुझ्यासाठीच होतं. आता मी हे बंद करतोय ... ''

के : त्या द्वारपालानं त्या माणसाला फसवलं ! तशीच फसवणूक माझीही होतेय कायद्याकडून ! दरवाजा, प्रवेश असलं काही अस्तित्वातच नाहीय !

पुजारी : पण तो द्वारपाल त्याला सांगत नाही का की हा दरवाजा तुझ्यासाठीच होता म्हणून ? त्यात फसवणुकीचा कुठं उल्लेख नाहीय. कायद्याचा सेवक काय म्हणतोय ते तुला खरं धरावंच लागेल, नाही तर मग, कायद्याच्या अस्तित्वालाच आव्हान द्यावं लागेल. प्रत्येक गोष्ट खरी आहे म्हणूनच स्वीकारली पाहिजे असं नाही, ती आवश्यक आहे म्हणूनही स्वीकारली पाहिजे.

के : मला जायचंय -- मुख्य दरवाजा कुठं आहे ?

पुजारी : एवढ्यात निघालास ?

के : अर्थात ! मी एका मोठ्या बँकेत चीफ क्लार्क आहे. मला कामं आहेत. तुम्ही असं करा, या समोरच्या दगडाला करा उपदेश -- माझ्याकडून तुम्हाला काय मिळणार ?

पुजारी : काहीच नाही. मी कोर्टाचा माणूस आहे. मी कोण आहे हे आलंच असेल लक्षात तुझ्या.

के : तुरुंगातले पुजारी.

पुजारी : म्हणजेच मी कायद्याचा माणूस आहे. तुम्ही याल तेव्हा कायदा तुम्हाला स्वीकारतो आणि जाल तेव्हा तो तुम्हाला सोडून देतो.

के : अंधार पडायला लागलाय, मला बाहेर जायचा मार्ग दाखवा.

पुजारी : या भिंतीला धरून पुढे जा -- तुला दरवाजा लागेल --

के : मला असं सोडून नका देऊ -- या अंधारातून मला बाहेरचा रस्ता सापडत नाहीय -- ( तो जात राहतो ... शेवटी सापळ्यात अडकल्यासारखा थांबतो. )

आवाज : मी शेवटपर्यंत शांत आणि तर्कनिष्ठ राहिलं पाहिजे. आयुष्याकडून मला खूप काही असंख्य हातांनी ओरबाडून घ्यायचं होतं ... चूक होती ती ? आता एक वर्षभर सुनावणी होऊन गेल्यावरही मला काहीच समजलेलं नाही ? त्यांनी असं म्हणू नये म्हणजे झालं, की त्याची केस सुरू झाली तेव्हा त्याला ती संपवायची होती आणि आता शेवट आल्यावर त्याला ती पुन्हा सुरू करायचीय !

के : थांबा ! माझी बाजू पक्की करणारे काही युक्तिवाद निश्चितच दुर्लक्षिले गेलेले आहेत !

आवाज : तर्काच्या कसोटीवर टिकणारे अजिंक्य युक्तिवाद ! प्रॉब्लेम असा आहे की तर्क ही गोष्ट अभेद्य असली तरी, जगत राहण्याची इच्छा बाळगणं हे तर्कात बसत नाही ! पण त्या इच्छेसाठीच तर्क वापरणं झालं हे ! युक्तिवाद करणं म्हणजे !! दुर्दैव म्हणजे हे समजतंय मला !

के : थांबा ! माझे न्यायमूर्ती कुठायत ? मी अजून त्यांना बघितलेलंही नाही ! आणि कुठाय ते अत्युच्च न्यायालय ? तिथं तर मी अजून प्रवेशही नाही केलेला ! कुणीतरी मला मदत करेल का ? बघा ! मी माझे याचक हात पसरून विनवत उभा आहे ... एखाद्या लाचार कुत्र्यासारखा ...
( चंद्रभानसह कोरस आणि इतर येतात ... )

चंद्रभान : तर, काय येतं लक्षात याच्यावरून ?

अश्विन : अटक होऊच नये हे बरं !

कार्तिक : एक वेळ अपराधी असलं तरी चालेल !

रोहिणी : कामात, करमणुकीत, वाचनात, पिकनिकमध्ये असं गुंतवून घ्यायचं !

स्वाती : राजकारणात, समाजकार्यात, संशोधनात गुंतवून घ्यायचं !

अश्विन : क्रांतिकारक व्हायचं किंवा धर्मयोद्धे व्हायचं !

चंद्रभान : देश, भाषा यांचे झेंडे फडकवायचे !

अश्विन : सगळ्यांचं भलं व्हावं अशी प्रार्थना करण्यात डुंबून राह्यचं !

कार्तिक : माणूस वाईट असला तरी तोच माणूस चांगलंही काही करत असतो -- याची उदाहरणं द्यायची !

रोहिणी : माणूस मुळात चांगलाच असतो पण तो विषमता निर्माण करतो -- हे वाईट आहे, म्हणायचं !

स्वाती : धुंद व्हायचं, दु:खी व्हायचं, आरडाओरडा करायचा --

चंद्रभान : गोंधळ उडवून द्यायचा आणि आता हे अमुक एका पद्धतीनं सुधारू शकेल म्हणायचं ! प्रचार करायचा ! विरोधी लोकांशी नुसते डावपेचच नाही, मारामाऱ्याही करायच्या ! खून करायचे ! पण ... पण एक हमखास काळजी घ्यायची --

सगळे : अटक होता कामा नये !
अटक होता कामा नये !

चंद्रभान : आणि जयेश के.चं अपयश पाहिल्यावर तर --

सगळॆ : मुळीच अटक होता कामा नये !

( जातात. आता दोन रक्षक के.ला मुसक्या बांधून आणतात. ते जणू काही वळणे घेत गल्लीबोळांतून आणि हमरस्त्यांवरून जात आहेत. मग एका ठिकाणी ते थांबतात. ती जागा योग्य असल्याचे एक रक्षक सुचवतो. तिथे काही दगड पडलेले आहेत. के.ला एका दगडाजवळ बसवतात. रंगमंचाच्या मागच्या भागात एक चौकट आहे -- तीवर प्रकाश पडतो तेव्हा तीत, दोन्ही हात पुढे केलेल्या मानवाकृतीशी साधर्म्य वाटावे असे चित्र आहे. )

चंद्रभान : कोण असेल त्या खिडकीत ? मित्र ? कुणी चांगला माणूस ? सहानुभूती वाटणारा ? मदत करायची इच्छा असलेला ? पुरुष की स्त्री ? ती एकच व्यक्ती आहे की सगळेच आहेत तिथे ? म्हणजे मदत अगदी हाताशीच होती की काय ? आणि मला या दगडांच्या खाणीत आणून का बसवलं गेलंय ? ( एक रक्षक दुधारी सुरा काढतो. दुसरा रक्षक केचे डोके मागे ओढून उभा. केच्या हृदयात सुरा खुपसला जातो. चौकटीतल्या चित्रावर लाल प्रकाश पसरतो. केची हालचाल मंद होऊन बंद पडणे आणि त्या चित्रावरचा प्रकाश हळूहळू जाणे असे एकत्र घडत जाते. )

आवाज : कुत्र्याची मौत !

सगळे : कुत्र्याची मौत !

रक्षक १ : कुत्र्याची मौत !

रक्षक २ : चल ! ( दोघेही एकदा केकडे पाहतात आणि जातात. अंधुक प्रकाशात केचे प्रेत पडलेले ... शांतता ... हळूहळू पडदा पडत जातो ... )

--- **समाप्त** ---

चं. प्र. देशपांडे,
३, स्नेहदीप अपा., चिंतामणी नगर, सहकारनगर नं. २, पुणे -- ४११००९.

फोन : ९३७१००५७७३.